

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0007929

चरित्र
१५१५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक १५१५ ........ नोंद दि: ........................

# स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७८२८

लेखक :

त्र्यं. ग. बापट,
बी.ए., बी.टी.

REFBK-0007929

किंमत दीड रुपया

प्रकाशक :

दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर,
५२९ सदाशिव, पुणें २.

इयत्ता १० वी साठीं पुरवणी वाचन म्हणून मंजूर
( S-66—B-S/L947 of 25-2-53 )

प्रथमावृत्ति १९५२

पुनर्मुद्रण १९५३

[ सर्व हक्क लेखकाधीन ]

मुद्रक :

दत्तात्रेय कृष्ण काकनूर
'प्रकाश मुद्रणालय',
२९५/४ सदाशिव, पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# प्रस्तावना

रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद हीं तीन चरित्रें श्री. य. गो. जोशी यांनीं 'प्रसाद' मासिकाच्या दिवाळी अंकांत (१९५०, ५१, ५२) प्रसिद्ध केलीं. पहिलीं दोन चरित्रें पुस्तक-रूपानें प्रसिद्ध झालीं. आतां हें तिसरें प्रसिद्ध होत आहे. हीं तिन्ही चरित्रें प्रसिद्ध करण्याचें श्री. दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर यांनीं ठरविलें. श्री. वसंतराव नूलकर आणि श्री. भा. द. लिमये यांनीं पुस्तकें दिलीं. संदर्भग्रंथांची यादी पुस्तकाच्या शेवटीं दिलेली आहे. हे सर्व लेखक, मित्र, संपादक आणि प्रकाशक यांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

विवेकानंदांच्या चरित्रलेखनांत आठ महिने कसे गेले तें समजलें नाहीं. विवेकानंदांचें व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व मला जसें दिसलें तसें मीं लिहिलें; किंबहुना कोणीतरी माझ्याकडून लिहवून घेत आहे असा भास झाला. चरित्रलेखन हीच माझी देवपूजा! हीच ध्यानधारणा! हेंच नामस्मरण!

[illegible]रित्र माझी कन्या कुमारी निवेदिता हिच्या स्मृतिसमाधीवर अर्पण केलें आहे.

दि. १-११-१९५२.

त्र्यं. ग. बापट,
शिक्षक, भावे स्कूल, पुणें २.

# श्री. त्र्यं. ग. बापट यांचें वाङ्मय

## प्रकाशित

| | |
|---|---|
| श्रीरामकृष्ण परमहंस | (चरित्र) |
| स्वामी विवेकानंद | ( ,, ) |
| साने गुरुजी | ( ,, ) |
| निबंध-संपदा | (शालेय निबंध-संग्रह) |
| पुतळा आणि पारवा | (लघुकथा-संग्रह) |
| श्रीमहागणपति | (गणपतीची गोष्ट) |
| इसापच्या सहवासांत | (बाल-कथा) |
| क्रांति | (संपादित) |
| तीन मुलें | ( ,, ) |
| समाजधर्म | ( ,, ) |
| इतिहासाचार्य राजवाडे | ( ,, ) |

## आगामी

| | |
|---|---|
| गोष्टीरूप बिरबल | |
| विश्वास-निश्वास | (काव्य-संग्रह) |

# स्वामी विवेकानंद

## पितामह संन्यासी झाले : १ :

"भगवान् मदनान्तका, पुरे झाला हा ऐहिक संसार." कलकत्त्यामधील एका शंकराच्या देवालयांत बाबू दुर्गाचरण दत्त प्रार्थना करीत होते. कशाकरतां प्रार्थना करीत होते ? त्यांची स्थिति कशी होती ? ते नाणावलेले वकील होते. त्यांची पत्नी सुस्वरूप आणि धर्मपरायण होती. त्यांना एक मुलगा होता. दुर्गाचरणांच्या अंगांत पंचविशींतील तारुण्य मुसमुसत होतें. अशा वेळीं देवाच्या सख्यत्वासाठीं बाबू दुर्गाचरणांनीं वनवास पत्करला. ते काशीला गेले. त्यांनीं बुद्ध गया पाहिली. वृन्दावनाचें दर्शन घेतलें. शरीरावर भगवीं वस्त्रें, गळ्यांत रुद्राक्षांची माळ, हृदयांत रुद्राचा जप, हातांत दण्ड, अशा वेशांत त्यांनीं हरिद्वार गांठलें. हृषीकेशाच्या परिसरांत प्रवेश केला. हिमालयांतून प्रवास करतां करतां त्यांनीं कैलास शिखर गांठलें. योग्यांचा राणा जो भगवान् शंकर त्याचें हें निवासस्थान आहे. हें स्थान पाहून दुर्गाचरण परतले आणि काशीला येऊन राहिले.

दुर्गाचरणांच्या पत्नीनें पतीला कधींही दोष दिला नाहीं. सात वर्षें आपल्या मुलाचा– विश्वनाथाचा– सांभाळ केला. नंतर तिलाही वाटलें कीं काशीक्षेत्राचें दर्शन घ्यावें. कलकत्त्यापासून काशीपर्यंत अनेक मैलांचा प्रवास होता. मायलेकरें गलबतांत बसलीं. गंगेच्या प्रवाहांतून प्रवास सुरू झाला. कांहीं वेळीं विश्वनाथ जहाजाच्या कांठावर उभा राही. आई त्याला आवरून धरी. होतां होतां प्रवास संपत आला. एक दिवस

सकाळची वेळ होती. विश्वनाथ हूडपणानें जहाजाच्या फळीला टेकून उभा राहिला. त्याचा तोल गेला. तो पाण्यांत पडला. मातेनें किंकाळी फोडली. मुलाच्या मागोमाग उडी मारली. मुलाचा हात गच्च पकडला. पण तिला पोहोतां येत नव्हतें. मायलेकरें बुडूं लागलीं. मातेचे केस वर दिसत होते. एका धाडसी खलाशानें उडी मारली आणि दोघांना वर काढलें. बऱ्याच वेळानें आई सावध झाली. मुलानें डोळे उघडले.

## आजोबा व आजी यांची आकस्मिक भेट : २ :

दोन दिवसांनीं जहाज काशीला पोचलें. मायलेकरें काशीला उतरलीं. तेथेंच राहूं लागलीं. ती माता नित्य नियमानें गंगेवर जाई. देवाचें दर्शन घेई. पतिदेवाचें स्मरण करी. एके दिवशीं तिला गंगेवर जाण्यास उशीर झाला. ती झपझप पावलें टाकीत निघाली. सूर्यनारायण तेजानें तळपत होता. देवळाचे घुमट दिसत होते. एका घाटावर कांहीं योगी ध्यानस्थ बसले होते. कांहीं सूर्यनारायणाला अर्घ्य देत होते. कांहीं साधू जटा बांधून, विभूति चर्चून पद्मासन घालून बसले होते; आणि परावाणीनें 'चिदानंदरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।' असा जप करीत होते. या साधूंमध्यें आपला पति असेल काय, असा विचार त्या मातेच्या मनामध्यें येऊन गेला. ती एका घाटावर गेली. तिनें स्नान केलें. वस्त्र बदललें. परत येतांना सूर्याच्या उन्हामुळें तिला भोंवळ आली. ती खालीं पडणार इतक्यांत तिला एका संन्याशानें सावरून धरलें. पायरीवर बसवलें. कांहीं वेळानें ती शुद्धीवर आली. तिनें कृतज्ञतेनें त्या संन्याशाकडे पाहिलें. त्याला नमस्कार केला. कृतज्ञतेचें आश्चर्यांत रूपान्तर झालें. तिची पूर्वस्मृति जागृत झाली. तिच्या लक्षांत आलें कीं आपल्यासमोर आपला पति उभा आहे. त्यानें संन्यासदीक्षा घेतली आहे. बाबू दुर्गा-चरण यांनींही आपल्या पत्नीला ओळखलें. क्षणभर तिच्याकडे पाहिलें.

विश्वेश्वराच्या शिखराकडे पाहिलें. 'भगवंता! तुझी माया किती अद्भुत आहे!' असें म्हणत ते पुढें निघून गेले. त्यांची धर्मपत्नी उठून उभी राहिली. विश्वनाथाच्या मंदिरांत गेली. तिनें प्रार्थना केली, "भगवन् शिव-शंकरा, तुझ्या कृपेमुळें पतिदेवाचें दर्शन झालें. आमच्या वंशांत वैराग्यवृत्ति अखंड राहो असा आशीर्वाद द्या."

यात्रा संपल्यावर तीं मायलेकरें कलकत्त्याला परत आलीं. विश्वनाथ शाळेंत जाऊं लागला. संगीत शिकला. फारशी व संस्कृत यांचाही त्यानें अभ्यास केला. विश्वनाथ बारा वर्षांचा झाला. हातांत शंकराचें चित्र घेऊन एक दिवस तो वाड्यांतील चौकांत उभा होता. इतक्यांत समोरून भगवीं वस्त्रें धारण केलेला आणि जटा बांधलेला असा एक संन्यासी पुढें आला. विश्वनाथानें त्याच्याकडे पाहिलें. मस्तक नम्र केलें. संन्याशानें आशीर्वाद दिला. त्या संन्याशाचें पूर्वाश्रमांतील नांव बाबू दुर्गाचरण! पितापुत्रांची भेट झाली; पण दुर्गाचरणांना आपली पत्नी कोठें दिसेना! एक वर्षापूर्वींच ती देवाघरीं गेली होती. दुर्गाचरण घरीं कां आले? गृहस्थाश्रम स्वीकारण्याकरितां? मुळींच नाहीं. संन्याशानें बारा वर्षांनीं आपल्या घराचें दर्शन घ्यावें असें धर्मांत सांगितलें आहे म्हणून ते घरीं आले. मुलाला भेटले. सर्व पाश मागें ठेवले. पत्नी तर कैलासवासी झाली होती. दुसऱ्या दिवशीं पहाटे कैलासनाथाचें स्मरण करीत बाबू दुर्गाचरण घरांतून बाहेर गेले. त्यांनीं अनेक धर्मक्षेत्रें पाहिलीं. 'ओम् नमः शिवाय।' या मंत्राचा जप केला; पण त्यांचा शेवट नंतर कसा झाला हें इतिहासाला माहीत नाहीं.

## विश्वनाथाचें औदार्य : ३ :

विश्वनाथ मोठा झाला. त्यानें वकिलीची परीक्षा दिली. त्याचें लग्न झालें. पत्नीचें नांव भुवनेश्वरी. बाबू विश्वनाथ कोर्टांतून घरीं आल्यावर

संगीताचा अभ्यास करीत. इतिहासाचीं पुस्तकें वाचीत. तत्त्वज्ञानाची चर्चा करीत. भुवनेश्वरी घरांतलें काम झाल्यावर महाभारत आणि रामायण या धर्मग्रंथांचें वाचन करी. अशा रीतीनें या दांपत्याचा संसार सुखानें व समाधानानें चालला होता. 'जोडोनियां धन उत्तम व्यवहारें । उदास विचारें वेच करी ।' या तुकारामांच्या उक्तीप्रमाणें बाबू विश्वनाथ वागत असत. कोणताही याचक त्यांच्या दारांतून विन्मुख जात नसे. दान करतांना ते पात्रापात्रतेचा कधींच विचार करीत नसत. आपला हात दान देण्याकरतां आहे इतकेंच त्यांना माहीत होतें.

एकदां बाबू विश्वनाथ आणि त्यांचे मित्र बोलत बसले होते. दारांत एक भिकारी आला. त्याचें तोंड विडा खाऊन रंगलें होतें. हातांतील एकतारीवर सूर धरून' तो शिवशंकराला उद्देशून पद म्हणूं लागला, "शंकर नाथ हरी। भजो रे भैय्या शंकर नाथ हरी ॥ धृ० ॥ जपतप साधन कछु नहि लागत। खरचत नहि गठरी। भजो रे भैय्या ऽऽ शंकर नाथ हरी ॥" हें पद ऐकल्यावर बाबू विश्वनाथांनीं खिशांतून चार आणे घेतले. त्या भिकाऱ्याला दिले. 'अल्ला तेरा भला करेगा।' असा तोंडभर आशीर्वाद देत भिकारी निघून गेला. विश्वनाथांचा मित्र म्हणाला, "बाबूजी, हा भिकारी दारूबाज आहे. याला कशाकरतां मदत केलीत ?" बाबूजी म्हणाले, "मित्रा, तूं म्हणतोस तसा हा दारूबाज असेलही; पण या जगांत किती तरी दुःखें त्या दारुड्यापुढें उभीं असतील ! त्या दुःखांचा विसर पडण्याकरितां तो दारू पीत असेल !"

## भुवनेश्वरीनें शंकराची सेवा केली : ४ :

अशा उदार वृत्तीनें विश्वनाथांचा संसार चालला होता. उदार स्वभावामुळें घरांत समाधान नांदत होतें. पण या समाधानांत एक उणीव होती. ती कोणती ? भुवनेश्वरी एका सुंदर मुलीची माता झाली. दुसऱ्या

खेपेलाही मुलगीच झाली. यामुळें भुवनेश्वरीच्या मुखावर उदासपणाची छटा दिसूं लागली. आपल्याला कुलदीपक मुलगा व्हावा असा तिच्या मनाला ध्यास लागला. तिनें शंकराची आराधना सुरू केली.

दत्तांची एक वृद्ध आत्या काशीक्षेत्रांत रहात होती. भुवनेश्वरीनें तिला पत्र लिहिलें. पोष्टाच्या पेटींत टाकलें. तिचें मन त्या पत्राबरोबर प्रवास करीत होतें. दुसऱ्या दिवशीं तें पत्र आत्याला मिळालें. आत्या पत्र वाचूं लागली—

श्री विश्वेश्वर प्रसन्न ।

कलकत्ता
५ जानेवारी १८६२.

श्रीमती आत्यास भुवनेश्वरीचा साष्टांग नमस्कार.

मला दोन मुली आहेत; पण मुलगा नाहीं. दत्त घराण्याचा वंशवेल वाढावा अशी इच्छा आहे. आत्या, तुम्हीं माझ्याकरतां काशीविश्वेश्वराला लक्ष बिल्वदलें वहा. लघुरुद्र करा. रुद्राचा आशीर्वाद मागा. उत्तराची वाट पहाणारी,

आपली,
सौ. भुवनेश्वरी.

वृद्ध आत्याबाईंना पत्र पोंचलें. त्यांनीं काशीविश्वेश्वराची आराधना सुरू केली. त्याच्या चरणांवर लक्ष बिल्वदलें वाहिलीं. संल्कप पूर्ण झाल्यावर त्यांनीं भुवनेश्वरीला पत्र लिहिलें.

काशी क्षेत्र
८ फेब्रुवारी १८६२.

चि. सौ. भुवनेश्वरीस सप्रेम अनेक आशीर्वाद.

तुझ्या विनंतीप्रमाणें लक्ष बिल्वदलांचा नियम पूर्ण केला. तुझ्या घराजवळ जें महेश्वराचें मंदिर आहे तेथें जा. आराधना कर. तुझे मनोरथ

पूर्ण होतील. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा जप कर. यज्ञामाजीं जपयज्ञ थोर । मंत्र जपावा शिवपंचाक्षर । शिवसामर्थ्यें सुत सुंदर । वंशामाजीं प्रगटेल ॥१॥ शास्त्रामाजीं वेदान्त । तीर्थामाजीं प्रयागतीर्थ । काशीक्षेत्र क्षेत्रांत । मंत्रराज तैसा हा ॥२॥ जागृतीं स्वप्नीं येतां जातां । उभें असतां निद्रा करितां । कार्या जातां बोलतां चालतां । सर्वदाही जपावा ॥३॥ शिव शिव गर्जतां चारी वाचें । तेज अवतरे महेशाचें । माहात्म्य ऐसें मंत्राचें । निगमागम वर्णिती ॥४॥ कळावें.

तुझी,
आत्याबाई.

भुवनेश्वरीनें पत्र वाचलें. आनंदाच्या लहरी तिच्या हृदयांत वाहूं लागल्या. 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचें ध्यान लागलें; मन हारपलें; उन्मन झालें. या तंद्रींत चार दिवस निघून गेले. पहाट झाली. सोमवार उजाडला. भुवनेश्वरीनें आंघोळ केली. वस्त्र बदललें, कुंकू लावलें; पूजा-साहित्य घेतलें आणि ती महेश्वराच्या मंदिराजवळ आली. मंदिर कांहीं फार मोठें नव्हतें. ती प्रवेशद्वारांतून आंत गेली. चित्त प्रसन्न झालें. तिनें नंदीला नमस्कार केला. सभामंडपांतील रविवर्म्याच्या तसबिरी पाहिल्या. मार्कंडेय, रामपंचायन, धनुर्भंग, गोपीचंद, सरस्वती, विश्वामित्र-मेनका इ०. गंगावतरणानें तिचें चित्त वेधून घेतलें. तिनें पदर सावरला आणि गाभाऱ्यांत प्रवेश केला. दिंडीच्या दोन बाजूंला दोन समया स्थितप्रज्ञाच्या वृत्तीनें निवांतपणें तेवत होत्या. पिंडीवर बिल्वपत्रांची शीग लागली होती. रसरशीत पिवळीं पानें पिंडीभोंवतीं चक्राकार लावलीं होतीं. जाईजुईच्या व मोगऱ्याच्या फुलांनीं ती शाळुंका डंवरली होती. केशरमिश्रित चंदनाचें गंध चर्चिलें होतें. चांदीचा नाग पिंडीवर फडा धरून बसला होता. धूपदीपांनीं वातावरण सुगंधित झालें होतें. सारवळीला लावलेल्या कळशींतून पिंडीवर अभिषेकाची सतत धार चालू होती.

'हर हर कैलासनाथ' असें म्हणून भुवनेश्वरीनें पूजा केली. शिवभक्तांचें स्मरण केलें. व्याध आणि हरिणी, श्रियाळ आणि चांगुणा, सीमंतिनी, महानंदा, इत्यादि भक्त तिच्या अंतश्चक्षूंसमोर उभे राहिले. चंद्रसेनाच्या राज्यांतील एका दरिद्री गवळ्याचा मुलगा तिला दिसला. त्यानें पार्थिवलिंग तयार केलें. परिमळद्रव्यें कैचीं जवळीं। शिवावरी मृत्तिकाच उधळी। मृत्तिकाच घेऊनि करकमळीं। पुष्पांजली समर्पीत ॥ १ ॥ त्या पूजेमुळें कैलासनाथ संतुष्ट झाला. त्या मुलाचें घर गवताचें होतें. तृणगृह होतें तें जर्जर। झालें रत्नखचित शिवमंदिर। हिऱ्यांचे स्तंभ वरीं शिखर। कळस झळकती रत्नांचे ॥ २ ॥ याप्रमाणें भक्तांचें स्मरण केल्यावर तिनें सांब सदाशिवाची पुढील ओव्या म्हणून प्रार्थना केली. प्रत्येक ओवी संपल्यावर तिनें बिल्वदलांची अंजली पिंडीवर वाहिली. ती म्हणाली– ॐ नमो जी शिवा अपरिमिता। आदि अनादि मायातीता। पूर्णब्रह्मानंदा शाश्वता। हेरंबताता जगद्‌गुरो ॥ १ ॥ भक्तवल्लभ तूं हिमनगजामात। भाललोचन नीलग्रीव उमानाथ। मस्तकीं स्वर्धुनी विराजित। जातिसुमनहारवत्‌ ॥ २ ॥ पक्षिरथप्रिय त्रिपुरान्तक। यक्षपतिमित्र प्रतापार्क। दक्षमखविध्वंसक मृगांक। निष्कलंक तव मस्तकीं ॥ ३ ॥ जो जगत्पालनाचें कारण। त्रिशूलपाणी चर्मवसन। स्कंदतात सुहास्यवदन। मायाविपिनदहन जो ॥ ४ ॥ नीलकंठा अहिभूषणा। नंदिवाहना मदमर्दना। योगियांचा तूंच राणा। दानवदमना दयानिधे ॥ ५ ॥ वंश वाढो माझे भुवनीं। विवेकांचा भव्य तरणी। संचार ज्याचा त्रिभुवनीं। अखंड मातृसेवेंत ॥ ६ ॥

याप्रमाणें दत्त घराण्याची गृहलक्ष्मी श्रीशंकराच्या उपासनेंत दंग झाली. तिला जगाचा विसर पडला. तिच्या मनांतील चिंता नाहींशी झाली. तिची मुद्रा सुप्रसन्न दिसूं लागली. हळू हळू तिच्या चालण्याची

गति मंद होऊं लागली. आणि सश्रद्ध आप्तेष्टांना वाटलें कीं तिच्या शरिरांत भगवान् शंकरांचा अंश योगमायेनें अवतीर्ण झाला आहे.

भुवनेश्वरीच्या भव्य चेहऱ्यावर उदात्तपणाचें तेज झळकूं लागलें. तिची स्मरणशक्ति अपूर्व होती. रामायण आणि महाभारत यांच्या नित्य पठनानें तिचें मन उदात्त विचारांत रममाण झालें होतें. सीतासावित्री आणि द्रौपदी यांच्या काळामध्यें ती विहार करीत होती. तिचें अंत:करण उच्च अध्यात्मसंस्कारांनीं आर्यांच्या उज्ज्वल संस्कृतीचें माहेरघर बनलें होतें.

गर्भवती भुवनेश्वरीच्या मुखमंडलावरील तेज पाहून विश्वनाथांना आनंद झाला. तिला कांहीं विचारण्याकरितां ते घरांत आले; पण ती त्यांना कुठें दिसेना. "वैखरीच्या ओसरीवर नाहीं; मध्यमेच्या माजघरांत नाहीं; पश्यंतीच्या अंतर्गृहांत नाहीं; परेच्या पर्यंकावरही नाहीं. विश्वनाथांनीं द्वैताची अर्गळा मोडली, शब्दांची शृंखला तोडली, अद्वैताची सुमनशाळा उघडली, तेव्हां मग निर्विकल्पाचें निजसुख भोगणारी भुवनेश्वरी त्यांना दिसली."

## भुवनेश्वरीला स्वप्न पडलें : ५ :

याप्रमाणें शिवशंकराच्या सेवेंत भुवनेश्वरी निमग्न झाली. तिची शिवनिष्ठा इतक्या सीमेला पोचली कीं पुत्रप्राप्तीच्या कामनेनें आपण हें करीत आहोंत याचाही तिला विसर पडला. आरंभींची सकाम उपासना निष्काम उपासनेमध्यें परिणत झाली. अशा स्थितींत एक दिवस भुवनेश्वरीमातेनें आपला नित्यक्रम संपविला. संध्याकाळ झाली. रात्र झाली. पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. भुवनेश्वरीच्या मनांत धवलगिरीवर रहाणाऱ्या कर्पूरगौर आणि करुणावतार अशा शिवशंकराचें स्वरूप प्रतिबिंबित झालें होतें. रात्रीं दहा वाजतां तिला झोंप लागली. आकरा वाजले. बाराचा ठोका पडला. या वेळीं तिला एक स्वप्न पडलें. काय दिसलें तिला

स्वप्नांत? एक प्रचंड पर्वत होता. त्याच्यावर आकाशांतून हिमाचा वर्षाव झाला. त्या हिमांतून एक उंच शिखर निर्माण झालें. त्या शिखराचें टोंक आकाशापर्यंत उंचावत गेलें. त्या शिखरावर एका भस्माच्या चौथऱ्यावर एक तेजस्वी ऋषि ध्यानस्थ बसला होता. त्याच्या कपाळावर चंद्रकला शोभत होती. गळ्यांत रुद्राक्षांची आणि सर्पाची माळ होती. वातावरणांत कोलाहल सुरू झाला. धर्मग्लानीमुळें पृथ्वी अस्थिर झाली. त्या ऋषीनें—त्या योग्यानें—आपला तिसरा डोळा उघडला. भुवनेश्वरीच्या लक्षांत आलें कीं हे भगवान् शंकर आहेत. तिनें शंकरांना वंदन केलें. शंकराच्या तिसऱ्या डोळ्यांतून एक तेजस्वी किरण बाहेर पडला. त्या किरणानें एका तेजस्वी आणि कमलनेत्र अशा बालकाचें रूप धारण केलें. तें बालक हळू हळू भुवनेश्वरीच्या मनांत अंतर्धान पावलें. नंतर पुन्हां जोराचा हिमवर्षाव सुरू झाला. विजा कडाडल्या आणि भुवनेश्वरी दचकून जागी झाली.

## नरेन्द्राचा जन्म : ६ :

हळू हळू नऊ महिने पूर्ण झाले. विश्वनाथांच्या घरांत गडबड उडाली. मुलगा कीं मुलगी इकडे सर्वांचें लक्ष लागलें होतें. भुवनेश्वरी मात्र शांतपणानें प्रसूतिवेदना सहन करीत होती. सर्व कलकत्ता शहर आनंदांत होतें. घरें रंगविलीं होतीं, शृंगारलीं होतीं. बैलांच्या शिंगांना फुलांच्या माळा बांधल्या होत्या कारण मकरसंक्रान्तीचा उत्सव शहरांत चालू होता. त्या शुभ दिवशीं सोमवार १२ जानेवारी १८६३ रोजीं भुवनेश्वरी प्रसूत झाली. ‘को ऽ हं’ असा बालकाचा पहिला रोदनस्वर बाहेर पडला. सुइणीनें बाहेर येऊन विश्वनाथांना सांगितलें कीं मुलगा झाला. हें वृत्त ऐकून घरांत सगळीकडे आनंद झाला. गोविंदासारखा एखादा कवि त्या समयाला उद्देशून असें म्हणेल कीं,

उठा कवींनो, निज दिव्याचा निधि उघडा काव्याचा
सुमंगलाचा आज सुखाचा जन्मोत्सव कृष्णाचा ॥ १ ॥
जन्मोत्सव हा आज अजाचा, अजराचा अमराचा
किंवा स्वदेश स्वातंत्र्याच्या विजयाच्या समराचा ॥ २ ॥
चराचराच्या हृदीं दाटले सुखामृताचे पान्हे
परमात्म्याचें हृदय जाहलें नभश्याम शिशु तान्हें ॥ ३ ॥
वृक्षलतांनो, अनंत कुसुमें, कुसुमांनो, मकरंद
मकरंदा, सौगंध उधळ तूं सौगंधा आनंद ॥ ४ ॥
संतभक्तिला नंदन झाला संतांना आनंद
मला आवडे तो संतांचा सदानंद गोविंद ॥ ५ ॥

भुवनेश्वरीनें आपल्या मुलाला हृदयाशीं घट्ट धरिलें. त्याचे रेखीव अवयव आणि बाळसेदार शरीर पाहून. तिच्या हृदयसागराला भरती आली. ती तासन्तास त्याच्याकडे पहात राहीली. त्या वेळीं सुईण म्हणाली, "बाई, हा मुलगा कोणासारखा दिसतो?" भुवनेश्वरी म्हणाली, "हा त्याचे विरक्त आजोबा बाबू दुर्गाचरण यांच्याप्रमाणें दिसतो. संन्यासदीक्षा धारण केलेल्या दुर्गाचरणांनीं आपल्या जीर्ण देहाचा त्याग करून हा नवा देह धारण केला आहे असें वाटतें."

तो बालक प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें वाढूं लागला. बारशाचा दिवस उगवला. सकाळ झाली. अंगणांत सडा घातला. रांगोळीनें सुदर्शनचक्र काढलें. मंजुळ सनया वाजूं लागल्या. सुवासिनी जमल्या. रंगीत पाळणा सुशोभित केला. सुवासिनींच्या ओट्या भरल्या. भुवनेश्वरीनें त्या मुलाला पाळण्याजवळ नेलें. एक मैत्रीण म्हणाली, "गोविंद घ्या," दुसरी म्हणाली, "गोपाळ घ्या," आणि भुवनेश्वरी म्हणाली, "नरेन्द्राला पाळण्यांत ठेवा." विश्वनाथांनीं दिवाणखान्यांत बसलेल्या इष्टमित्रांना

सांगितलें कीं मुलाचें नांव नरेन्द्र असें ठेविलें आहे. त्या वेळीं सगळ्यांना पेढे वांटण्यांत आले. गुलाबाचीं फुलें दिलीं. अत्तर लावलें. नरेन्द्रनाथाला कांहीं अहेर देऊन लोक आपापल्या घरीं गेले.

रात्र झाली. मंद अशा तीन समया पाळण्याच्या पलीकडे तेवत होत्या. भुवनेश्वरीनें नरेंद्राकडे पाहिलें. त्याच्या मुखमंडलावर तेज सांडत होतें. त्या वेळीं त्या वत्सल मातेनें पाळणा हालवतांना नरेन्द्राला उद्देशून कवि माधवांचें पुढील अंगाई गीत म्हटलें असेल !

ये ये ये राजा । दे भेटी । जीव झुरे तुजसाठीं ।
राजस हातांनीं । मार मिठी । दृढतर माझ्या कंठीं ।
इंदीवरतुल्य । नयनांनीं । अवलोकीं ही अवनी ।
एकचि दृक्पातें । पहा क्षणीं । जाइल कैशी फुलुनी ।
मंजुळ तव हास्यें । प्रसन्नता । येइल साऱ्या जगता ।
पावे तुजपाशीं । विश्राम । माझा आत्माराम ।

## नरेन्द्राच्या खोड्या : ७ :

नरेन्द्र एक वर्षाचा झाला. कमरेची सांखळी घट्ट झाली. रडणें आणि खोड्या करणें इतकें वाढलें कीं भुवनेश्वरीनें त्याला संभाळण्याकरतां दोन दायांची मदत घेतली. वाढतां वाढतां नरेन्द्र पांच वर्षांचा झाला. एक दिवस संध्याकाळची वेळ होती. नरेन्द्र चड्डी घालून अंगणांत उभा होता. शेजारचीं मुलें आलीं. खेळ सुरू झाला. होतां होतां कांहीं कुरापत निघाली. मारामारी सुरू झाली. नरेन्द्राच्या डोळ्यांत वीज चमकली. तो बेभान झाला. हातीं सांपडेल तें घेऊन फेकून मारूं लागला. इतक्यांत दोन्ही दाया तेथें आल्या. त्यांनाही तो आवरेना. त्यांनीं भुवनेश्वरीला हांक मारली. ती बाहेर आली. तिनें नरेन्द्राकडे पाहिलें. त्याच्या ओठांच्या पाकळ्या क्रोधानें थरथरत होत्या. भुवनेश्वरीनें ओळखलें कीं याचा क्रोध

अटोक्याबाहेर गेला आहे. ती घरांत गेली. तिनें भरलेली घागर उचलली. ती बाहेर आली. आणि तिनें 'शिवहर कैलासनाथ, शिवहर कैलासनाथ' असें मोठ्यानें नामस्मरण करून ती घागर नरेन्द्राच्या डोक्यावर ओतली. नरेन्द्र शांत झाला. भुवनेश्वरीनें त्याला घरांत आणलें; आणि त्याचें आंग पुसत असतांना ती म्हणाली, "मीं भगवान् शंकराजवळ एका थोर पुत्राची याचना केली, पण तें लक्षांत न राहून त्या भोळ्या शंकरानें हें अष्टौप्रहर क्रोधानें धुमसणारें पिशाच्च माझ्या ओटींत टाकलें."

नरेन्द्राच्या दोन बहिणी कापड विणीत होत्या. हा तेथें गेला. त्यांचें कापड हिसकावून घेतलें. बहिणी त्याला मारण्याकरतां धावल्या. नरेन्द्र जिन्यावरून खालीं आला. त्यानें अंगणांत झेप घेतली. बहिणी तेथेंही आल्या. त्यांनीं त्याची मान धरली. नरेन्द्रानें हिसका दिला. तो रस्त्यांत आला. त्यानें गटारांत उडी मारली. जीभ लांब करून वाकुल्या दाखवल्या. वडील बहिणींचा पराजय झाला. त्या घरांत गेल्या. नंतर नरेन्द्र अंगणांत आला. गोठ्यांत गेला. गाईच्या पाडसाबरोबर खेळूं लागला. त्यानें बोकडाच्या पाठीवर थाप मारली, माकडाची सांखळी ओढली, मोराच्या पिसाऱ्याला हात लावला, कबुतरांचें खुराडें निरखून पाहिलें, आणि तो तबेल्याकडे वळला. मोतद्दाराशीं गप्पा मारूं लागला. अंगांत रंगीत डगला घालावा, मोठा फेटा बांधावा, हातांत चाबूक ध्यावा आणि ऐटींत गाडी हाकलावी असें त्याला वाटे.

## नरेन्द्राचें औदार्य :८:

एक सणाचा दिवस होता. भुवनेश्वरीनें एक रेशीमकांठी धोतर विकत आणविलें. नरेन्द्राला आंघोळ घातली. केशरी गंध लावलें. गळ्यांत सुवर्णाची तीनपदरी कंठी घातली. कुरळे केस भांग पाडून व्यवस्थित बसविले. रेशीमकांठी धोतर उलगडलें. त्याच्यावर हळदकुंकू

वाहिलें. नंतर भुवनेश्वरीनें तें धोतर नरेन्द्राला नेसविलें. कांचा मारून नरेन्द्र ओटीवर आला. इतक्यांत एक साधू दारांतून आंत आला. त्याच्या कमरेला एक फाटकें वस्त्र गुंडाळलेलें होतें. एका हातांत चिमटा व दुसऱ्या हातांत लोटा. 'नमः शिवाय । नमः शिवाय ।' असें म्हणून तो नरेन्द्राकडे पाहूं लागला. नंतर तो म्हणाला, "बाळ, मला नेसायला एखादें धोतर देतोस का?" पांच वर्षांच्या त्या बालकानें आपलें नेसूंचें धोतर सोडलें आणि त्या बैराग्याला देऊन टाकलें. बैराग्यानें तें आपल्या डोक्याला गुंडाळलें आणि तो झट्दिशीं निघून गेला. इतक्यांत भुवनेश्वरी बाहेर आली, संतापली आणि तिनें नरेन्द्राला चांगला चोप दिला.

## मातेनें शिक्षण दिलें : ९ :

१८७० साल उजाडलें. नरेन्द्र सात वर्षांचा झाला. वडिलांनीं त्याला शाळेंत घातलें. नरेन्द्रानें चार पांच दिवसांत शाळेच्या वातावरणांत ऐकूं येणाऱ्या निवडक शिव्या आत्मसात् केल्या. घरीं आल्यावर तेच शब्द त्याच्या मुखांतून बाहेर पडूं लागले. भुवनेश्वरीनें मुलाचें नांव शाळेंतून काढून टाकलें. घरीं शिकविण्याकरितां एक सद्वृत्त शिक्षक ठेवले; पण मुख्यतः भुवनेश्वरीनेंच नरेन्द्राला शिकविलें. बंगाली व इंग्रजी भाषेचीं पहिलीं दोन पुस्तकें तिनेंच त्याला शिकवलीं. आनुवंशिक संस्कार, गृहस्थिति, शाळा आणि समाज या चार घटकांचा परिणाम बालमनावर होतो. पहिल्या घटकाचीं सूत्रें ईश्वराच्या हातांत असतात. उरलेल्या तीन घटकांत माता आणि पिता यांचें महत्त्व अतिशय आहे. पित्यापेक्षां मातेची वागणूक मुलावर अधिक परिणाम करूं शकते. पिता हा मानवतेचें मस्तक आहे, पण माता ही मानवतेचें अंतःकरण आहे, सामर्थ्य आहे, समाधान आहे. पित्यानें नरेन्द्राच्या बुद्धिमत्तेला चिकित्सेची

धार लावली; मातेनें भावनांची जोपासना केली. त्या शुद्ध भावनांतून पावित्र्याचीं रसाळ आणि गोमटीं फळें निर्माण झालीं.

भुवनेश्वरीनें रामायण आणि महाभारत यांतील गोष्टी नियमितपणें नरेन्द्राला सांगितल्या. रात्रीच्या वेळीं गोष्ट ऐकल्याशिवाय नरेन्द्राला झोपच येत नसे.

रात्रीं दहा वाजले. नरेन्द्राला झोप येईना. पापण्या मिटल्याबरोबर त्याच्या डोळ्यांसमोर एक तेजोवलय दिसूं लागलें. त्यानें डोळे उघडले. तो म्हणाला, "आई, रामाची गोष्ट सांग ना. काल झाली त्याच्यापुढें सांग." भुवनेश्वरी नरेन्द्राजवळ बसली. तिनें त्याच्या मस्तकावर हात ठेवला आणि ती गोष्ट सांगूं लागली.

## रामाची गोष्ट : १० :

दशरथ राजा म्हातारा झाला. तो सभेंत बसला होता. तो लोकांना म्हणाला, "मी आतां म्हातारा झालों. मला राज्याचें काम होत नाहीं. म्हणून मी उद्यां सकाळीं चांगल्या मुहूर्तावर रामाला युवराज नेमतों." हें भाषण ऐकून लोकांना फार आनंद झाला. नरेन्द्रानें विचारलें, "आई, या वेळीं कौसल्या कुठें होती?" भुवनेश्वरी म्हणाली, "तें सगळं मी सांगेन; पण तूं मधें मधें बोलूं नकोस." नंतर काय झालें? दशरथानें रामाला बोलावलें. राम आला. त्याचें चालणें, बोलणें, वागणें किती तेजस्वी! किती विनयशील! दशरथ म्हणाला, "रामा, मी तुला युवराजपद देणार आहें. प्रजेच्या कल्याणाकरितां वाटेल तितके कष्ट सोस. जा आतां आणि उद्यांपर्यंत सीतेसह उपवास कर, परमेश्वराच्या चिंतनांत निमग्न रहा!"

"पण आई, राम हाच परमेश्वर होता ना?" नरेन्द्रानें विचारलें. भुवनेश्वरी म्हणाली, "बाळ नरेन्द्रा, इतक्या बालवयांत किती शंका

विचारतोस रे ? तुझ्या शंकांचीं उत्तरें देणारा गुरु तुला केव्हां भेटणार आहे कोणास ठाऊक ! पण ही रामाची गोष्ट ऐक. ”

अयोध्या नगरींत आनंदाच्या लाटा उसळत होत्या. लोकांनीं राजरस्त्यावर सुगंधी पाण्याचे सडे घातले. घरोघर गुढ्या उभारल्या, तोरणें लावलीं. चौघडे झडूं लागले. मंगल वाद्यांची ललकारी ऐकूं आली.

अशा वेळीं राजा दशरथ कैकयीच्या महालांत गेला. मंथरा दासीनें तिच्या मनांत मत्सर निर्माण केला होता. ती संतापली. राजा म्हणाला, “ तुला काय झालें ? काय पाहिजे ? आज आपला राम युवराज होणार. अशा वेळीं तूं कां रडतेस ? ” कैकयी म्हणाली, “ महाराज, मागें तुम्हीं मला दोन वर दिले आहेत ते मी आज मागूं का ? ” दशरथ म्हणाला, “ कैकयीं, माग. वाटेल तें माग. आज मी अतिशय आनंदांत आहें. ” कैकयी म्हणाली, “ महाराज, माझ्या भरताला युवराज करा, आणि रामाला आजच चौदा वर्षें दण्डकारण्यांत वनवासाला पाठवा.”

हें भयंकर भाषण ऐकून दशरथ बेशुद्ध पडला. कैकयीनें रामाला बोलावणें पाठवलें. राम आला. त्याला सर्व समजलें. तो म्हणाला, “ माते कैकयी, भरताला युवराज करा. मला राज्य नको. मी, लक्ष्मण आणि सीता वल्कलें नेसून आतांच्या आतां वनांत जातों. ” रामानें कौसल्येला नमस्कार केला. दशरथाच्या चरणांवर डोकें ठेवलें. सगळ्या प्रजेचा निरोप घेतला. राम वनांत गेला. लोकांनीं गुढ्या, तोरणें काढून टाकलीं. वाद्यें बंद झालीं. अयोध्येला श्मशानाची कळा आली. राम, सीता व लक्ष्मण वनांत आले. एका वटवृक्षाखालीं थांबले. राम दमला होता. म्हणून एका शिळेवर त्यानें आपलें डोकें टेकलें. त्याला झोप लागली. —भुवनेश्वरीनें नरेन्द्राकडे पाहिलें. त्याला शांत झोप लागली होती. त्याचा श्वासोच्छ्वास मात्र भराभर चालला होता.

## ध्यानस्थ नरेन्द्र : ११ :

नरेन्द्राच्या बालमित्रांमध्यें एक ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याला घेऊन नरेन्द्र बाजारांत गेला. त्यानें दुकानांत मांडलेल्या अनेक देवांच्या मूर्ति मान उंच करून पाहिल्या. रामाची मूर्ति दोन पैशांला विकत घेतली. दोघे घरीं आले. गच्चीवर गेले. दरवाजाला कडी लावली. पाट मांडला. त्याच्यावर तांदूळ ठेवले. रामाची मूर्ति ठेवली. ब्राह्मणाच्या मुलानें कोणते तरी मंत्र म्हटले. नरेन्द्रानें फुलें वाहिलीं. मूर्तीची स्थापना झाली. नरेन्द्रानें मांडी घातली, पापण्या मिटल्या आणि रामाचें ध्यान सुरू केलें. चार वाजतां तो ध्यानस्थ बसला. पांच वाजले, सहा वाजले. मुलें दिसलीं नाहींत म्हणून मंडळी शोध करूं लागली. त्यांनीं मोठमोठ्यानें हांका मारल्या. पण नरेन्द्र ब्रह्मानन्दांत निमग्न झाला होता. भुवनेश्वरीला काळजी वाटूं लागली. ती व्याकुळ झाली. जिन्याजवळ आली? चढून गच्चीजवळ गेली. तों दार बंद दिसलें. लोकही जमले. सर्वांनीं दार वाजवलें. शेवटीं दार फोडून लोक आंत शिरले. तो ब्राह्मणाचा मुलगा घाबरून पळून गेला. भुवनेश्वरी नरेन्द्राजवळ गेली. तो निष्कंप असा बसला होता. भुवनेश्वरीला वाटलें कीं परमात्मचिंतनांत निमग्न झालेल्या प्रत्यक्ष शंकरानेंच जणूं कांहीं नरेन्द्राच्या रूपानें बालस्वरूप धारण केलें आहे. भुवनेश्वरीनें त्याला गदगदा हालविलें. नरेन्द्र भानावर आला.

दुसऱ्या दिवशीं नरेन्द्र घोड्याजवळ खेळण्याकरतां गेला. तेथें घोड्याचा मोतदार बसला होता. तो म्हणाला, "रामानें लग्न केलें. फार वाईट गोष्ट झाली. लग्न करणें हें घातकी आहे." – अशा तऱ्हेचे विचार ऐकल्यावर नरेन्द्र म्हणाला, "मी योगी होईन. भगवीं वस्त्रें धारण करीन. हिंदुस्थानांत यात्रा करीन; हिंडेन. मी लग्न करणार नाहीं." नंतर रात्रीच्या वेळीं नरेन्द्रानें रामाची मूर्ति टाकून दिली. या मानसिक

आंदोलनामुळें नरेन्द्राला चैन पडेना. तो रडूं लागला. भुवनेश्वरीनें विचारलें, "नरेन्द्र, काय झालें ?" नरेन्द्र म्हणाला, "आई, मोतद्दार म्हणतो कीं राम हा पूर्णावतार नसून अंशावतार आहे. रामानें लग्न केलें. मला राम आवडत नाहीं." हें ऐकून भुवनेश्वरी म्हाणाली, "बाळा नरेन्द्रा, तूं आपलें शिवाचें ध्यान करीत जा." मातेचे हे शब्द ऐकतांच नरेन्द्राचें समाधान झालें.

दुसऱ्या दिवशीं नरेन्द्रानें शिवाची मूर्ति आणली. त्या मूर्तीची पाटावर तांदूळ ठेवून स्थापना केली. नरेन्द्र पद्मासन घालून ध्यानस्थ बसला. त्या खोलींत दोन मूर्ति दिसूं लागल्या. एक भगवान् शंकराची आणि दुसरी ध्यानस्थ नरेन्द्राची. त्या ध्यानाच्या स्थितींत त्या दोन मूर्ति एक तर झाल्या नसतील ना ? कुणीं सांगावें ? शंभो, तुझे भक्त तुझ्या स्वरूपांत लीन होतात. एक दिवस सर्वच जीव तुझ्या शिवस्वरूपांत मिळून जावयाचे आहेत. परंतु कांहीं थोर महात्मे पिपीलिका मार्गाचा अवलंब न करतां ध्यानाचे पंख लावून तुझ्या स्वरूपाकडे एकदम धाव घेतात.

## नागानें फडा उभारली : १२ :

एके दिवशीं संध्याकाळ झाली. मुलें ध्यानाचा खेळ खेळत होतीं. बाल नरेन्द्र लंगोटी नेसून, अंगाला राख फासून देवघरांत बसला. त्यानें शिवाचें ध्यान सुरू केलें. तो तन्मय झाला. त्याची समाधि लागली. इतक्यांत सळसळ करीत एक मोठा थोरला नाग तेथें आला.

त्याला पाहून असें वाटलें कीं "वितळलेल्या रुप्याचा एक ओघळ जमिनीवरून चालला आहे. चालण्यांत यत्न नाहींत, कष्ट नाहीं. गति किती गमतीची ! पाण्याची लाट कीं वाऱ्याची झुळूक ! पुन्हा लाट म्हणावी तर गर्जना नाहीं. ओघ म्हणावा तर आवाज नाहीं. सर्व शरीर

एका वेळीं गतींत असूनही कांहीं भाग या कलावर झुकलेला, कांहीं उलट कलावर; निम्मा सरळ पुढल्या झोकावर व निम्मा मागें मुरडलेला. तथापि कोणत्याही भागाला कृत्रिम ताण नव्हता किंवा संकोच नव्हता. सर्व शरीर सारखें एका तोलांत चाललें होतें. कोणाला असेंही वाटलें असतें कीं टिकल्यांचा चंद्रहाराचा सर घसरत चालला आहे, किंवा सुबक बुंदक्यांचा गळपट्टा पडला आहे. कांहीं ओळखत नव्हतें. रेशमाहून मृदु, कदलीगर्भाहून शीतल, पुष्पहाराहून सुखतर स्पर्श. पण या सौम्यपणाला फसून चालणार नाहीं. दाढेंत जिवंत मृत्यु उभा आहे. कोणाचा धक्का त्याच्या शेपटीला लागूं द्या म्हणजे समजेल चंद्रहार आहे कीं कट्यार आहे, गळपट्टा आहे कीं गळा उतरणारा पट्टा आहे! तो रुपेरी पाण्याचा ओघळ आतां नव्हे. आतां झाली विषाची लाट. कोणाला वाटेल कीं एखादा विषारी बाण सणाणत चालला आहे. आतां पुष्पाचें मृदुत्व जाऊन पाषाणाचें कठोरपण उभें राहिलें.'' वळसे घालीत तो नाग पुढें गेला. त्या मृत्यूच्या मानकऱ्यानें मान मुरडून मागें पाहिलें. मुलांनीं त्याच्याकडे पाहिलें. त्यांना भीतीमुळें बोलण्याचें सुचलें नाहीं. तीं मुलें एकमेकांचा हात धरून मागें सरकूं लागलीं, आणि नरेन्द्राला सावध करण्याचें विसरून पळून गेलीं. त्यांनीं भुवनेश्वरीला सांगितलें. इतर शेजाऱ्यांना सांगितलें. लोक धांवत आले. देवघरासमोर थबकले. त्यांना काय दिसलें? नरेन्द्राच्या ध्यानानें नाग मोहित झाला. त्यानें आपली फडा उभारली. नरेन्द्राच्या डोळ्यांकडे पाहून तो डोलूं लागला. या वेळीं आकाशांत चंद्राची कोर वर चालली होती. कांहीं वेळानें तो नाग नाहींसा झाला. धास्तावलेले लोक पुढें गेले. त्यांनीं नरेन्द्राला हालविलें. तेव्हां तो देहस्थितीवर आला. त्याच्या मुखमंडलावर आनंद ओसंडत होता. तो आनंद, तो नाग, ती शशांकरेखा हीं त्या चन्द्रमौलीच्या साक्षात्काराचीं सूचक चिन्हें आहेत काय?

## बुद्धदर्शन : १३ :

पुढें कांहीं दिवसांनीं रात्रीं दहा वाजतां नरेन्द्र ध्यानस्थ बसला होता. त्याला समोर एक प्रकाश दिसला. त्या प्रकाशांतून एक बोधिवृक्ष निर्माण झाला. पौर्णिमेचें चांदणें पडलें होतें. त्या वृक्षाखालीं एक दयामय अंतःकरणाचा संन्यासी बसला होता. त्याच्या हातांत कमंडलू होता. त्याच्या मुखमंडलाभोंवतीं तेजाचें प्रशान्त वलय दिसत होतें. त्याच्या डोळ्यांतून कारुण्याचा वर्षाव चालला होता. तो संन्यासी म्हणाला, "मी एक शेतकरी आहें. मानवता ही माझी जात. भ्रान्त झालेल्या माणसांचीं अंतःकरणें हें माझें शेत, धैर्य हा बैल, धर्म हें जल आणि श्रद्धा हें बीज. मी ज्ञानरूपी नांगर फिरवून अज्ञानरूपी कांटे काढून टाकतों आणि तेथें श्रद्धाबीजाचीं पेरणी करतों." असें सांगून तो संन्यासी निर्वाण-मार्गाकडे चालूं लागला. त्याच्या चेहेऱ्यावर अनिर्वचनीय शांतता दिसत होती. हळू हळू तो संन्यासी नाहींसा झाला. त्या संन्याशाचें नांव गौतम बुद्ध.

## शालेय शिक्षण : १४ :

आठव्या वर्षीं ईश्वरचंद्र विद्यासागर यांनीं स्थापन केलेल्या शाळेंत नरेन्द्र जाऊं लागला. एका वर्षांत या बृहस्पतीनें अमरकोश आत्मसात् केला. एक मुसलमान गवई त्याला गायन शिकवीत असे. नरेन्द्राच्या गायनांतून सामवेद निर्माण होऊं लागला. संध्याकाळीं तो आखाड्यांत जाई, कुस्ती खेळे. वर्गांत कुठें भांडण झालें तर तेथें जाई आणि आपल्या हुकमी आवाजानें तें भांडण बंद करी. बॉक्सिंग या विदेशी कलेची सुद्धां त्यानें ओळख करून घेतली. पण या सर्व हूडपणाच्या-मागें दयामय अंतःकरण उभें होतें; मनाचें पावित्र्य ओसंडत होतें. Purity was the very backbone of his life. कोणीही वर्गमित्र आजारी पडो,

नरेन्द्र त्याच्या सेवेला हजर. नरेन्द्र हा आपल्या वर्गाचा राजाधिराज होता. राजा आणि प्रजा हा त्याचा आवडता खेळ; पण हा राजाधिराज आपल्या प्रजेचें पुत्राप्रमाणें पालन करी.

नरेन्द्र नऊ वर्षांचा झाला. एकदां वर्गांत तो इतर मुलांशीं बोलत होता. मास्तर शिकवीत होते. मास्तर रागावले. त्यांनीं छडी घेतली आणि बोलणाऱ्या प्रत्येक मुलाला चोपण्यास सुरवात केली. नरेन्द्राची पाळी आल्यावर तो उभा राहिला आणि त्यानें वर्गांत चाललेली सबंद कविता पाठ म्हणून दाखविली. नरेन्द्राची अलौकिक पाठशक्ति पाहून मास्तर स्तिमित झाले. त्यांनीं नरेन्द्राला शिक्षा केली नाहीं.

## गुडगुड्या ओढल्या : १५ :

नरेन्द्राचे वडील वकील होते. त्यांच्याकडे अनेक जातींचे व धर्मांचे पक्षकार येत. ते गुडगुड्या ओढीत. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती अशा प्रत्येक धर्माकरितां निराळी गुडगुडी ठेवली होती. एके दिवशीं सकाळीं नरेन्द्र दिवाणखान्यांत आला. तेथें कोणी नव्हतें. त्यानें एकेक गुडगुडी ओढण्यास आरंभ केला. सगळ्या गुडगुड्यांचे झुरके ओढून पाहिले. इतक्यांत कांहीं पक्षकार आले. ते त्याच्यावर रागावले. एक म्हातारा पक्षकार म्हणाला, "तूं जाती मोडतोस काय?" नरेन्द्र म्हणाला, "गुडगुडी ओढल्यानें जाती कशा मोडतात तें मला समजत नाहीं." या वेळीं नरेन्द्राचें वय दहा वर्षांचें होतें.

## खोक पडली : १६ :

एके दिवशीं सहा वाजले. मुलें जमलीं. नरेन्द्राच्या घरांत लपंडाव सुरू झाला. सात वाजले. अंधार पडूं लागला. तरी खेळ संपेना. एक मुलगा तिसऱ्या मजल्यावर लपला. तो कोणाला सांपडेना. त्याला

शोधण्याकरतां नरेन्द्र वेगानें उड्या मारीत जिना चढूं लागला. त्याचा पाय मुडपला. तो गडगडत तळमजल्यापर्यंत आला. उजव्या भुवई-जवळ खोक पडली. भळाभळा रक्त वाहूं लागलें. नरेन्द्र बेशुद्ध पडला. मुलें घाबरलीं. ओरडूं लागलीं. माणसें जमा झालीं. वडिलांनीं भराभरा तीन चार वैद्यांना बोलावून आणलें. त्यांनीं जखम धुतली व टाके घातले. नंतर औषध लावलें. पंधरा दिवसांनीं जखम बरी झाली. पण व्रण राहिला. ही जखम योगशास्त्रांत सांगितलेल्या दोन भुवयांमधील एका चक्राला झाली होती. या जखमेसंबंधीं बोलतांना एक द्रष्टा योगी म्हणाला कीं या अपघाताच्या रूपानें नरेन्द्राच्या हूडपणाला खोडा पडला नसता तर त्यानें सर्व जगाच्या चिंधड्या केल्या असत्या.

## ब्रह्मराक्षस : १७ :

नरेन्द्राचा एक मित्र होता. त्याच्या घरांतील आवारांत मोठी बाग होती. त्या बागेंत एक चांफ्याचें झाड होतें. नरेन्द्र आणि त्याचे मित्र त्या बागेंत गेले. खेळूं लागले. संध्याकाळ झाली तरी त्यांचा खेळ संपेना. नरेन्द्र त्या चांफ्याच्या झाडावर चढला. त्यानें शंकराला वाहण्याकरितां कांहीं फुलें काढलीं. नंतर तो एका फांदीवर गेला. त्या फांदीला उलटें टांगून घेऊन नरेन्द्र झोके घेऊं लागला. इतक्यांत घराचे वृद्ध मालक तेथें आले. त्यांना भीति वाटली कीं नरेन्द्राला दुखापत होईल. म्हणून ते म्हणाले, "नरेन्द्र, या झाडावर चढूं नकोस. येथें एक ब्रह्मराक्षस रहातो. तो वीस फूट उंच आहे. त्याच्या बोटांचीं नखें करवतीसारखीं आहेत. त्याचा रंग डांबरासारखा काळा आहे. त्याचे डोळे शेंदरासारखे लाल आहेत. तो लहान मुलांना पकडतो आणि या झाडावर आपटून ठार मारतो." असें सांगून ते वृद्ध आजोबा निघून गेले. मुलें घाबरलीं. कांहींनीं डोळे मिटून धरले. कांहींना तो ब्रह्मराक्षस कोठून तरी येत

आहे असा भास झाला. इतक्यांत नरेन्द्र पुढें आला. त्या झाडावर पुन्हां चढला आणि उलटें टांगून घेऊन त्यानें झोके घेण्यास सुरवात केली. एक मुलगा म्हणाला, "नरेन्द्र, तुला ब्रह्मराक्षसाची भीति वाटत नाहीं का?" नरेन्द्र म्हणाला, "अरे, आजोबांनीं आपल्याला उगीच भीति दाखवली. येथें खरोखरच ब्रह्मराक्षस असता तर यापूर्वीच त्यानें माझें डोकें या चांफ्याच्या बुंध्यावर आपटलें असतें."

## मित्राचा जीव वांचविला : १८ :

एका सोमवारीं महादेवाच्या जत्रेचा दिवस आला. नरेन्द्र एका मित्राला घेऊन जत्रेला गेला. त्यांनीं देवळांत प्रवेश केला. शंकराचें दर्शन घेतलें. नरेन्द्राच्या डोळ्यांत विरागी ऐश्वर्य चमकूं लागलें. नरेन्द्र देवळांतून बाहेर आला. अफाट गर्दी झाली होती. दुतर्फा दुकानें लागलीं होतीं. नरेन्द्रानें भगवान् त्रिनेत्राची एक मूर्ति विकत घेतली. त्यानें सभोंवतीं पाहिलें; पण त्याचा बालमित्र दिसेना. तो पुढें गेला. तों त्याला काय देखावा दिसला? डाव्या बाजूनें एक घोड्याची गाडी भर-धाव येत होती. घोडा बेफाम झाला. उधळला. त्याच्या टापांचे डांबरी रस्त्यावर होणारे आवाज ऐकून यात्रेकरू घाबरले, बावरले. स्तिमित झाले. एक मुलगा त्या बेफाम घोड्याच्या टापेखालीं सांपडणार असें वाटूं लागलें. इतक्यांत नरेन्द्र बाणासारखा त्या ठिकाणीं धांवत गेला आणि त्यानें मृत्यूच्या टापेखालून त्या मुलाला खेचून बाहेर काढलें. तोच मुलगा नरेन्द्राबरोबर जत्रेला आला होता.

## नाटकांतील विघ्न : १९ :

नरेन्द्र बारा वर्षांचा झाला. वडिलांच्या बरोबर जगांतील व्यापक विषयांवर तो चर्चा करी. शाळेमध्यें हसत खेळत, दंगामस्ती करूनही पहिला नंबर मिळवी. एकदां वडिलांच्याबरोबर त्यानें भीषण नाट्याची

(tragedy) चर्चा केली. त्याच सुमारास शनिवारीं रात्रीं एका प्रसिद्ध नाटकाची जाहिरात लागली. बापलेक नाटक पहाण्यास गेले. त्या दुःखप्रधान नाटकांतील धीरोदात्त नायकाचें काम तन्मयतेनें चाललें होतें. पण तें काम करणारा नट प्रत्यक्षांत कर्जबाजारी होता. त्याच्यावर वॉरंट बजावण्याकरतां कोर्टाचा बेलीफ रंगभूमीवर आला. इतक्यांत "अरे बेलीफ, रंगभूमीवरून चालता हो. खेळ संपेपर्यंत थांब. हजार प्रेक्षकांचा हिरमोड करतोस याचा अर्थ काय ?" असें सांगणारा आवाज प्रेक्षकांच्या कानीं आला. तो खड्या सुरांतील आक्रमक आवाज ऐकल्यावर बेलीफ घाबरला. रंगभूमीवरून मागें गेला. प्रेक्षकांनीं मागें वळून पाहिलें. तो आवाज नरेन्द्राचा होता. त्याच्या उपजत आक्रमण शक्तीमुळें तें नाटक निर्वेध पार पडलें.

## पूर्वजन्माची आठवण : २० :

नाट्यगृहांतून बाहेर पडल्यावर कांहीं प्रेक्षकांनीं नरेन्द्राची चौकशी केली. त्याच्याशीं ओळख करून घेतली. नरेन्द्राला वाटलें, हे लोक आपल्याला पूर्वी केव्हां तरी भेटलेले आहेत. घरीं आल्यावर दुसऱ्या दिवशीं तो आपल्या एका मित्राला म्हणाला, "मला असा भास कां होतो समजत नाहीं. एखादें नवीन ठिकाण पाहिलें कीं वाटतें कीं हें मीं पूर्वी केव्हां तरी पाहिलें आहे. एखादा बैरागी धुनीजवळ बसलेला दिसला कीं मला वाटतें, याच्याशीं मीं केव्हां तरी बोललों आहें. एखादें संस्कृतचें पुस्तक वाचावें तों मला अशी जाणीव होते कीं हें पुस्तक मीं अनेक वर्षांपूर्वी केव्हां तरी वाचलें आहे, अभ्यासलें आहे." मोठेपणीं नरेन्द्र म्हणाला, "I believe that before I was born I must have had visions of those subjects and people with whom I would have to come in contact in my present birth. That memory comes, every

now and then, before me throughout my whole life. मला असें वाटतें कीं पूर्वीच्या जन्मांत हे लोक मला भेटले असावे."

## सृष्टीचें स्वरूप पाहून समाधि लागली : २१ :

१८७७ साल उजाडलें. विश्वनाथ बाबू रायपूर येथें जाऊन राहिले. नरेन्द्रानें शाळेंतून दाखला घेतला. बालमित्रांचा जड अंत:करणानें निरोप घेतला. नरेन्द्र आणि त्याचीं भावंडें नागपूरपर्यंत आगगाडीनें आलीं. पुढील प्रवासाकरितां ते बैलगाडींत बसले. निबिड अरण्य दिसूं लागलें. विन्ध्य पर्वताच्या घाटामधून बैलांच्या गळ्यांतील घंटिकांच्या नादांत गाडी चालली होती. हरित तृणाच्या मखमालीचे हिरवेगार गालिचे भोंवतालीं पसरले होते. वर्षाऋतूला प्रारंभ झाला होता. विन्ध्य पर्वताचें एक भव्य शिखर आकाशामध्यें गेलेलें होतें. नरेन्द्राला वाटलें, तें भव्य शिखर म्हणजेच स्वयंभू शंकराची ध्यानस्थ बसलेली मूर्ति! शिखरावरून झुळझुळ वहाणारें पाणी म्हणजे शंकराच्या जटेंतील गंगा. आकाशांतील विस्तीर्ण पोकळीच्या पात्रांतून पर्जन्याचा अभिषेक सुरू झाला. वृक्षांच्या शाखांवरील द्विजगण पर्णासनावर विराजमान झाले. कित्येकांनीं त्या भव्य पर्वतमूर्तीसभोंवतीं प्रदक्षिणा घातल्या. पहिल्या पावसानें भिजलेल्या मातीचा सुगंध पसरला. त्या सुगंधयुक्त मातीचें विलेपन शंकराच्या कपाळावर शोभूं लागलें. वनलतांनीं आपलीं सुवासिक पुष्पें त्या स्वयंभू प्रभूच्या मस्तकावर समर्पण केलीं. आसपासच्या दऱ्यांतून हळू हळू लोळत येणारे धुक्याचे लोट 'धूपोऽयं प्रतिगृह्यताम्।' अशी नम्र प्रार्थना करूं लागले. चमकणाऱ्या विजेनें पंचारती ओंवाळली. बालभास्कराचा नंदादीप पाजळला. मेघगर्जनेचे चौघडे झडूं लागले. कोकिळेच्या गायनांत सारंगीचे सूर निनादूं लागले. सृष्टिदेवतेनें चालविलेली शंकराची ही महापूजा पाहून नरेन्द्राचें मन तल्लीन झालें, तन्मय झालें. अनेक रंगांचे चित्र-

विचित्र पक्षी नादावत भराऱ्या मारीत पुढें निघून गेले. बैलगाडी घाट चढून उताराला लागली. दोन्ही बाजूंला डोळे फिरवून टाकणाऱ्या खोल दऱ्या दिसूं लागल्या. एका भयाण दरीच्या कपारींत एक मधमाशांचें मोहोळ दिसूं लागलें. हें येथें कसें आलें ? हा मध कसा निर्माण झाला ? या भयाण एकान्ताचा अर्थ काय ? या ठिकाणीं या मधमाशा कशाकरतां जमल्या ? यांचें भरणपोषण कोण करतो ? असे विचार करतां करतां नरेन्द्राचें मन विश्वंभराच्या स्वरूपांत विरघळून गेलें. निसर्गाच्या या रम्य आणि रौद्र स्वरूपाकडे पाहातां पाहातां तो समाधीमध्यें मग्न झाला. या वेळीं त्याच्या मनामध्यें असे विचार आले असतील कीं,

उभवोत मंदिरें प्रभुसाठीं धनवंत ।
परि उभा वस्तुजातांत दिसे भगवंत ! ॥

"Lost to all outward consciousness, he lay in the bullock cart,—how long he could not remember,—and when he returned,—blessed, as it were, and bissful,—to the normal state of things, he found that, in the mean time, considerable distance had been traversed."

## प्रवेश-परीक्षा : २२ :

नरेन्द्र रायपुरास पोंचला. येथें शाळा नव्हती. वडिलांची संगति हीच शाळा. वडिलांच्याकडे अनेक विद्वान् येत. नरेन्द्र त्यांचें बोलणें मन लावून ऐके. हळू हळू तो त्यांच्याशीं वादविवाद करूं लागला. वडिलांच्या संगतीनें व्यापक आणि खोल असा विचार करण्यामध्यें त्याची प्रगति झाली. हळू हळू विद्वानांचा या बालबृहस्पतीपुढें बुद्धिवादांत टिकाव लागेना. त्याची सुदृढ प्रकृति तेजःपुंज दिसूं लागली. त्याच्या चालण्यांत आणि बोलण्यांत पराक्रमानें मिळविलेली नरेन्द्रता प्रतिबिंबित झाल्यामुळें नरेन्द्र हें नांव सार्थ झालें.

१८७९ साल सुरू झालें. सोळा वर्षांचा नरेन्द्र वडिलांच्या बरोबर कलकत्त्याला आला. शाळेंत गेला. त्याची प्रभावी धारणाशक्ति शिक्षकांच्या ध्यानांत होती. म्हणून नियम बाजूला सारून त्याला एकदम वरच्या वर्गांत बसविलें. नरेन्द्राच्या विचारांचें चक्र वाचनालयांतून फिरूं लागलें. इंग्रजी आणि बंगाली भाषांतील अभिजात ग्रंथांचा सहवास त्यानें मिळवला. दोन हजार वर्षांतील भारताच्या इतिहासाचें सिंहावलोकन केलें. वाणी पंडिताची, छाती सेनापतीची आणि दृष्टि सम्राटाची असा तो विद्यार्थी नरेन्द्र ज्यांनीं पाहिला ते शिक्षक धन्य होत ! पण ग्रंथालयांतील अभ्यासांत लक्ष लागल्यामुळें वर्गांतील अभ्यासाकडे दुर्लक्ष झालें. प्रवेश-परीक्षा जवळ आली. तारीख जाहीर झाली. नरेन्द्रानें पुस्तकें चाळण्यास सुरवात केली. पुस्तकांचीं पानें चाळतां चाळतां विषय आत्मसात् झाले. परीक्षेला तीन दिवसांचा अवकाश होता. नरेन्द्राला भूमितीचा अभ्यास अजून करावयाचा होता. त्याचे वर्गमित्र आणि वर्गशिक्षक चिंताक्रान्त झाले कारण नरेन्द्र हा त्यांच्या शाळेचें आशास्थान होता. नरेन्द्रानें भूमितीचीं पुस्तकें आणलीं; अभ्यास सुरू झाला. नरेन्द्र म्हणाला, " Then I began to study the subject keeping awake for the whole night and in course of twenty-four hours I mastered the four books of Geometry ". चोवीस तासांत भूमितीच्या चार भागांचा अभ्यास पूर्ण झाला. परीक्षेचा दिवस उजाडला. दहा वाजले. नरेन्द्रानें शांतपणानें जेवण केलें. कपडे घातले. भुवनेश्वरीच्या चरणांवर डोकें ठेवलें. मातेचा मंगल आशीर्वाद घेतला. नरेन्द्रानें परीक्षेच्या मांडवांत धीरगंभीर पावलें टाकीत प्रवेश केला. प्रश्नांचीं उत्तरें आत्मविश्वासानें लिहिलीं. याप्रमाणें चार दिवस निघून गेले. एक महिन्यानें प्रवेश-परीक्षेचा निकाल जाहीर झाला. निकालपत्रक पाहाण्याकरितां विद्यार्थ्यांची गर्दी झाली होती. वर्गमित्र आशेनें आणि अधाशीपणानें वाचूं लागले.

'कुमार नरेन्द्र विश्वनाथ दत्त' हें नांव पहिल्या वर्गांत अग्रभागीं झळकत होतें.

## वक्तृत्वाची चमक : २३ :

याच वेळीं एक थोर शिक्षक शाळेंतून निवृत्त झाले. मुलांनीं त्यांना निरोप देण्याचें ठरविलें. समारंभाचें अध्यक्षस्थान सुरेन्द्रनाथ बानर्जी यांनीं स्वीकारलें होतें. सभा सुरू झाली. प्रास्ताविक भाषण झाल्यावर नरेन्द्र बोलावयास उभा राहिला. तो म्हणाला, "सुरेन्द्रनाथ यांच्यासारखे वक्तृत्वसम्राट् आज अध्यक्ष म्हणून लाभलें आहेत. त्यांच्यापुढें मी काय बोलणार ! आपले गुरुजी आज निवृत्त होत आहेत. गुरुजींचे विचार आपल्या कानांवर पडत होते. त्यांचे आचार आपल्या मनांत रुजत होते. त्यांनीं आम्हांला अभ्यासजडत्वानें वांकविलें नाहीं. त्यांनीं विचार करण्यास शिकविलें. त्यांच्या रूपानें साधी राहणी आणि उच्च विचारसरणी आमच्या विद्यामंदिरांत वावरत होती. त्यांच्या वागण्यांत कधींही लाचारी दिसली नाहीं. त्यांच्या अखंड अध्ययनाची आणि प्रेमळ स्वभावाची आम्हांला कधींही विस्मृति होणार नाहीं." वरील आशयाचें नरेन्द्राचें भाषण झालें. सभेंतील मुलें कृतज्ञतेनें आणि कुतूहलानें ऐकत होतीं. नरेन्द्राच्या वक्तृत्वाची चमक या पहिल्या सभेंतही दिसून आली.

## महाविद्यालयांतील बुद्धिवाद : २४ :

काळ घडीचा छम् छम् आज न
न बुजायाची तिची आठवण
कोण म्हणे तें रम्य बालपण ?
अतां रम्यतम खरा काळ पण
पोर बने जव शिष्ट समाजन ॥ १ ॥

आणि सुख न हें मानिव लटकें
आतां दडपण निघुन मनाचें
बेफिकीरीचें स्वैरपणाचें
नसांनसांतून वारें नाचे
हृदयीं बसती मधु मधु चटके ॥ २ ॥ (माधव ज्युलियन्)

१८८० सालीं नरेन्द्रानें कॉलेजच्या वातावरणांत प्रवेश केला. परीक्षेचा ताण पडल्यामुळें कांहीं दिवस आजारीपणांत गेले. नंतर स्वच्छन्दपणानें अभ्यासाला सुरवात झाली. नरेन्द्र हा विद्यार्थी होता; परीक्षार्थी नव्हता. मर्दानी आणि मैदानी खेळांत तो पुढाकार घेई. दांड-पट्टा, बोथाटी हे त्याचे आवडते खेळ. घोड्यावर बसण्यांतही तो मागें नव्हता. वादसभेंत त्याच्यापुढें कोणीही टिकत नव्हतें. त्याच्या आवाजांतील स्वर्गीय स्वरमाधुर्य गंधर्वांनाही लाजवील असें होतें. त्यानें खगोलविद्येकडे डोकावून पाहिलें. इतर राष्ट्रांचे उदय आणि अस्त यांची भारताच्या इतिहासाशीं तुलना करून पाहिली. संस्कृतमधील दर्शनांची ओळख करून घेतली. युरोपमधील तर्कतीर्थांच्या ग्रंथांचा आपल्या कुशाग्र बुद्धीनें उलगडा केला. तत्त्वज्ञानाचा मागोवा घेत घेत विश्वाचें मूळ शोधण्याकरतां त्याच्या प्रदीर्घ प्रतिभेची धडपड सुरू झाली. त्याच्या नीलकमलाप्रमाणें प्रफुल्ल अशा डोळ्यांकडे पाहिलें कीं हा कोणी योगी भूलोकावर अवतरला आहे असें वाटे. त्याच्या अंतःकरणांत श्रद्धा होती; पण त्या श्रद्धेवर तर्कनिष्ठेचें निष्ठुर आक्रमण चालू होतें. कणाद, पातंजली, गौतम, कपिल, शंकराचार्य, स्पेन्सर आणि कान्ट यांच्या विचारांशीं झटापट करणारी त्याची कुशाग्र बुद्धिमत्ता देवदानवांचा पराजय करणाऱ्या गरुडा-प्रमाणें चैतन्याच्या आकाशांत दिशा आणि काल यांचा आरपार भेद करून स्वैर संचार करीत होती. पण त्या गरुडाला अजून सत्यस्वरूप विष्णूचें दर्शन झालें नव्हतें.

## वर्गांत गायन केलें : २५ :

कॉलेज सुरू होऊन दोन महिने झाले. एक दिवस पहिला तास संपला. दुसऱ्या तासाचे प्रोफेसर येण्यास अवकाश होता. दोनशें विद्यार्थी तिष्ठत बसले. मोठ्यानें बोलूं लागले. मग एकजण म्हणाला, "अरे नरेन्द्र, एखादें पद म्हणून दाखव. म्हणजे आमची करमणूक होईल, वर्गांत शांतता नांदेल." दुसरा मुलगा म्हणाला, "अरे, प्रोफेसर आतां येतील. मग ते रागावतील आपल्याला. त्यांच्या रागाची भीति वाटते." हें बोलणें ऐकल्यावर नरेन्द्र उभा राहिला. भीति हा शब्द त्याच्या शब्दकोशांत लिहिलेला नव्हता. त्यानें सभोंवार पाहिलें. डोळे मिटून गीताचें स्मरण केलें. टेबलावर ताल धरून गाणें म्हणण्यास आरंभ केला. दोन्ही कानांमधून एक तीक्ष्ण परंतु आल्हाददायक सुवर्णशलाका घुसून तिनें थेट अंत:करणाचा ठाव घ्यावा असें तेज आणि माधुर्य त्या आवाजांत सामावलेलें होतें. तो तेजस्वी आणि पल्लेदार आवाज लवचिक असून अणकुचीदार होता. त्याच्या गळ्यांतील तानांचें सुदर्शनचक्र वेगानें फिरूं लागलें. त्या भक्तिरसपूर्ण पदांतील वर्णोच्चार टिपून घ्यावेत इतके स्पष्ट होते. वर्गाचा कानाकोपरा स्वरांच्या सुरांनीं भरून गेला. त्या सुरांतून गीतांतील भावना प्रकट झाली. इतक्यांत वर्गाच्या दारांतून प्रोफेसर प्रकट झाले. तिथेंच थांबले. थोडे रागावले. नंतर आनंदित झाले. गाणें संपल्यावर नरेन्द्राच्या स्वरांनीं धुंद झालेल्या वातावरणांत त्यांनीं प्रवेश केला. त्यानंतर त्यांचें व्याख्यान सुरू झालें. विद्यार्थ्यांचे कान व्याख्यान ऐकत होते, पण त्यांचें भान नरेन्द्राच्या गाण्यानें खेचून घेतलें होतें.

## निसर्गाचा गायक कविराज वर्डस्वर्थ : २६ :

सहामाही परीक्षा संपली. दुसऱ्या सहामाहीला Excursion या वर्डस्वर्थ कवीच्या काव्याचा अभ्यास सुरू झाला. प्रिन्सिपल हेस्टी यांनीं

वर्गांत प्रवेश केला. त्यांच्या विद्वत्तेचा दरारा मोठा होता. व्याख्यान सुरू झालें. मुलांनीं वह्या काढून मुद्दे टिपण्यास आरंभ केला. एकटा नरेन्द्र मात्र दोन्ही हात छातीजवळ बांधून आपल्या स्मरणवहींत तें व्याख्यान टिपून घेत होता. त्या व्याख्यानाचा सारांश माझ्या कल्पनेप्रमाणें थोडक्यांत सांगतों. प्रिन्सिपल हेस्टी म्हणाले, “ हें काव्य वाचण्यापूर्वी कवीच्या निसर्गप्रेमाची माहिती सांगतों. वर्डस्वर्थ हा कवि निसर्गाचा भोक्ता असून भक्त होता. ऋषींच्या संदेशापेक्षां वाऱ्याची झुळूक अधिक महत्त्वाचा संदेश देईल असें त्याला वाटे. आकाशांत कमानीप्रमाणें वांकलेलें इंद्रधनुष्य पाहिलें कीं तो बालकाप्रमाणें आनंदानें नाचूं लागे. समुद्रकिनाऱ्याजवळ लाटांच्या संगीतानें डोलणारीं डॅफोडिल फुलें पाहिलीं कीं याच्या अंतःकरणामध्यें काव्य-कल्पनांच्या लाटा उचंबळूं लागत. नांगर धरणारा शेतकरी, मेंढ्या वळणारा धनगर, पावरी वाजविणारा गोपाळ, गवत कापणारी खुरपेवाली, यांच्या संगतीमध्यें वर्डस्वर्थचें जीवनसंगीत निर्माण झालें. त्याचीं कांहीं खंडकाव्यें टाकाऊ आहेत; पण स्फुट गीतें टिकाऊ आहेत. स्वच्छ आकाश, पौर्णिमेचा चन्द्र, ज्योत्स्नेचे अमृतप्रवाह, सुंदर दिग्वधू , मंजुळ वायु– हे सगळे या कवीचे खेळगडी होते. यांचे मूक संदेश कवीनें काव्यांत सांगितले. किंवा असें वाटतें कीं निसर्गदेवीनें लेखणी हातांत घेतली आणि वर्डस्वर्थकरतां जानपदगीतें लिहिलीं. या कवीनें निसर्गदेवतेची अखंड उपासना केली. अंतरिक्षांतील वादळें आणि भूपृष्ठावरील धरणीकंप या दोहींचें कवीनें हसतमुखानें स्वागत केलें. सृष्टीच्या रौद्रस्वरूपांतही त्याला परमेश्वराचें स्वरूप दिसे. पूर्वेच्या क्षितिजावर सूर्यबिंब दिसूं लागलें म्हणजे त्याला वाटे कीं विश्वग्रंथाचें पान उघडलें आहे. कोकिळेचा दोन स्वरांतील ( twofold sound ) आवाज ऐकल्यावर ती कोकिळा कोणत्या झाडावर बसून हें मधुर गायन करीत आहे हें पहाण्यासाठीं तो रानां-वनांतून वेड्यासारखा हिंडत राही. एखादे वेळीं तो तुंग पर्वताच्या

शिखराजवळ जाई. तेथें एखाद्या पर्जन्यधूत शिलातलावर बसून त्या पर्वताचे सुळके गगनोदराला कसे टोंचीत आहेत, कडे कसे तुटलेले आहेत, खोल दऱ्या कशा लांबवर पसरल्या आहेत, त्यांतून अरण्यें कशीं वाढलीं आहेत, पाण्याचे धबधबे कसे पडत आहेत, नद्यांचे उगम कसे होत आहेत, हिरव्या रंगाची मखमल सभोंवतीं कशी पसरली आहे, इत्यादि सृष्टिसौंदर्याचे अत्यद्‌भुत देखावे वर्डस्वर्थ हा कवि तल्लीन मनानें पाहात बसे. त्याची वृत्ति तदाकार होई. सृष्टीच्या देखाव्याचें चित्र अंतर्यामामध्यें प्रतिबिंबित झाल्यावर अद्वितीय आनंदाचा आस्वाद घेत हा कवि देहभान विसरून जाई, समाधीमध्यें मग्न होई."

"सर, समाधि म्हणजे काय?" नरेन्द्रानें विचारलें. व्याख्यानाचा ओघ चालू असतांना मधें असा प्रश्न विचारण्याचें धाडस नरेन्द्राशिवाय कोण करणार? सर्व विद्यार्थी नरेन्द्राकडे पाहूं लागले. इतक्यांत प्रिन्सिपल हेस्टी म्हणाले, "समाधि म्हणजे काय तें मला सांगतां येणार नाहीं; पण जवळच दक्षिणेश्वर म्हणून एक ठिकाण आहे. तेथें कालीमातेच्या मंदिरांत एक पुजारी रहातो. त्यानें समाधीचा अनुभव घेतला आहे. त्याला भेट म्हणजे तुझ्या सर्व शंका दूर होतील."

"तो पुजारी किती शिकला आहे?"

"त्याला सही सुद्धां करतां येत नाहीं."

"त्याचें नांव काय?"

"रामकृष्ण परमहंस."

## ब्राह्म समाजांत प्रवेश : २७ :

तास संपला. नरेन्द्र घरीं गेला. त्याच्या मनाची तळमळ चालली होती. याच वेळीं त्यानें ब्राह्म समाजांत प्रवेश केला होता. त्या समाजाचे पुढारी केशवचंद्र सेन हे त्याला परब्रह्म वाटत होते. ते रविवारीं प्रार्थनेच्या

वेळीं सांगत कीं, " मूर्तीमध्यें देव नाहीं. देवाकडे जाण्याकरतां गुरूची जरूर नाहीं. हिंदु धर्मांतील जातिभेद मोडले पाहिजेत. स्त्रियांना शिक्षण द्या. विधवांचे पुनर्विवाह करा. त्यांना गुलामगिरींतून मुक्त करा. " अशा तऱ्हेचे विचार ऐकून नरेन्द्र संशयवादी बनला होता. देव आहे का नाहीं ? तो कोठें रहातो ? तो मला भेटेल का ? मला कोणी देवाची भेट करवून देईल का ? असे विचार नरेन्द्राच्या मनांत येत. कॉलेजमध्यें अज्ञेयवादाचे आणि निरीश्वरवादाचे विचार त्याच्या कानांवर पडत. त्याचें समाधान होईना. म्हणून एकदां ब्राह्म समाजाचे एक नेते देवेन्द्रनाथ ठाकूर यांच्याकडे तो गेला आणि त्यानें प्रश्न विचारला, " महाशय, आपण देव पाहिला आहे काय ? " देवेन्द्रांना त्या प्रश्नाचें उत्तर देतां आलें नाहीं. ते म्हणाले, " नरेन्द्र, तुला योग्याचे डोळे लाभले आहेत." याच वेळीं घरामध्यें नरेन्द्राच्या लग्नाबद्दल चर्चा सुरू झाली. नरेन्द्राला लग्नाचें आकर्षण नव्हतें. 'सावधान' हा लग्नांतील शब्द कानांवर पडण्यापूर्वीं नरेन्द्र सावध झाला होता. कोणती तरी अदृश्य शक्ति त्याला मार्गदर्शन करीत होती. त्याला झोप आल्यावर एक स्वप्न बऱ्याच वेळां पडलें होतें. त्या स्वप्नामध्यें त्याला एकदा डोळे दिपवून सोडणारा वैभवशाली अशा सम्राटाचा दरबार दिसे. कांहीं वेळानें तो देखावा नाहीसा होई आणि वटवृक्षाखालीं ध्यानस्थ बसलेला एक महान् तपस्वी त्याला दिसूं लागे. कांहीं दिवसांनीं पहिलें स्वप्न विरून गेलें आणि दुसरें स्वप्न स्पष्टपणें साकार होऊं लागलें. याचा परिणाम असा झाला कीं नरेन्द्रानें अद्ययावत् पद्धतीचा पोशाक टाकून दिला. एका घोंगडीवर झोप घेण्यास सुरवात केली. मनाच्या अशा अवस्थेंत असतांना प्रिन्सिपल हेस्टी यांच्या व्याख्यानामुळें नरेन्द्रानें रामकृष्णांची भेट घेण्याचें ठरविलें. नरेन्द्र पाश्चिमात्यांच्या जडवादामुळें गुरूला तुच्छ मानीत होता; पण त्याच्या अप्रकट मनामध्यें गुरूचा शोध चालला होता.

## श्रीरामकृष्ण परमहंस : २८ :

एकोणिसाव्या शतकांत पाश्चिमात्यांच्या सहवासानें भारतीय जनता जडवादी झाली. संशयवाद बळावला. धर्माला ग्लानि आली. अशा वेळीं विश्वधर्माची स्थापना करण्यासाठीं रामकृष्णांचा अवतार झाला. रामकृष्ण हे आध्यात्मिक अनुभवांची मूर्तिमंत प्रतिमा होते. ते जणूं कांहीं दिव्य लोकांतच रहात असत. त्यांचा ध्यानाचा अभ्यास इतका वाढला होता कीं एखाद्या देवतेचें स्मरण करतांच ती त्यांना मूर्तस्वरूपांत दिसूं लागे. ते द्वैतवादी होते; अनेकदेवतावादी होते; दुसऱ्या एका दृष्टीनें सर्व चराचर पदार्थ एकाच मूलतत्त्वापासून निघाले आहेत असें मानणारे एकतत्त्ववादी होते. निरनिराळ्या देवता हीं एकाच ब्रह्माचीं निरनिराळीं स्वरूपें आहेत याचा त्यांनीं अनुभव घेतला होता. सदैव विदेहस्थितींत असल्यामुळें समाधि ही त्यांची सहजावस्था होती. तें १८८० साल होतें. या वेळीं जडजीवांच्या हिशोबानें रामकृष्ण चव्वेचाळीस वर्षांचे होते. पण पांगारकर म्हणतील कीं तत्त्वत: पाहतां महात्म्यांच्या आयुर्दायाचा हिशोब आपण काय लावणार? मरणाला मारून उरलेले व काळाच्या माथां पाय देऊन जगत्कल्याणार्थ स्वेच्छेनें या भूलोकीं संचरणारे जे महात्मे आहेत त्यांना जन्म कोठचा व मृत्यु कोठचा? मुक्तकोटींतले हे महात्मे जगत्कल्याणाची विमलवासना चित्तीं ठेवून वेळोवेळीं मृत्युलोकीं अवतरतात आणि कांहीं सभाग्य जीवांना दुर्लभ संगलाभ देऊन ठायींच्या ठायींच विराम पावतात. त्यांच्यावर आम्ही जन्ममृत्यूंचे मिथ्या आरोप करीत असतों. रामकृष्णांसारखे पूर्ण भक्त एका जन्मांत तयार होत नाहींत. ते अनेकजन्मसंसिद्ध असतात. अजत्वें जन्मणें, अक्रियता कर्म करणें, व न मरतां मरणें हेंच त्यांचें खरें चरित्र होय.

## नरेन्द्र रामकृष्णांना भेटला : २९ :

रामकृष्णांच्या भक्तीचें कमळ सोळा पाकळ्यांनीं प्रफुल्ल झालें. भक्तरूप भृंगे त्या कमळाकडे धाव घेऊं लागले. निरनिराळ्या धर्मांचे आणि शास्त्रांचे प्रगाढ पंडित रामकृष्णांच्या चरणीं लीन झाले. याच वेळीं रामकृष्णांना भेटण्याच्या इच्छेनें आपल्या मित्रांना बरोबर घेऊन नरेन्द्र दक्षिणेश्वरीं आला. संध्याकाळची वेळ होती. देवळाजवळ भक्तांच्या समूहांत रामकृष्ण बसले होते. पद्मासन घातलेले, नेसलेल्या धोतराचा एक सोगा डाव्या खांद्यावर टाकलेला, मुखांतून हरिनामाचा गजर चाललेला, दृष्टि अनंता-कडे ओढ घेत असलेली— अशा सहजावस्थेंत रामकृष्ण ब्रह्मानन्दीं लीन झालेले असतांना नरेन्द्रानें तेथें प्रवेश केला. रामकृष्णांना नमस्कार करून तो खालीं बसला. नर आणि नारायण यांची भेट झाली. कठोर तार्कि-कता आणि भावमधुर श्रद्धा यांचा संयोग झाला. ही ऐतिहासिक भेट पाहण्यास भारताच्या उद्धाराकरतां तळमळणारे हुतात्मे अदृश्य रूपानें पारिजातकाचीं फुलें घेऊन उभे राहिले असतील. त्या हुतात्म्यांना वाटलें असेल कीं वसंताच्या वायुलहरी आणि प्रलयकालीन वादळ, कोकिलेचें कूजित आणि रणवाद्यांचा कल्लोळ, नंदादीपाची शांत ज्योत आणि ज्वालामुखीचे रुद्र उद्रेक, हे सारे मोहक विरोध नरेन्द्राच्या आकृतींत एकवटले आहेत. त्या अतृप्त हुतात्म्यांनीं नरेन्द्राच्या डोळ्यांकडे पाहिलें. त्यांना वाटलें कीं हे सामान्य चर्मचक्षू नाहींत. हे डोळे तरुण भारताचे ध्येयदर्शी ध्रुवतारे आहेत. अध्यात्माच्या धुनींतून धुमसत असलेली स्वातंत्र्याची कल्पना तेथें प्रतिबिंबित झाली आहे.

रामकृष्णांनीं नरेन्द्राच्या डोळ्यांकडे पाहिलें. आपण काचेंतून पहातों त्याप्रमाणें रामकृष्ण शरिरांतून आणि मनांतून पाहूं शकत. नरेन्द्राच्या विशाल भालप्रदेशावर लिहिलेला पूर्वजन्मांतील तपश्चर्येचा इतिहास

त्यांनीं वाचून पाहिला. ते आपल्या भक्तांना म्हणाले, " विषयाच्या कर्दमांत लोळणाऱ्या या कलकत्ता शहरांत इतका शुद्ध अंतःकरणाचा मुलगा सांपडणें कठीण आहे. तुम्ही सर्व लुकलुकणारे तारे आहांत, तर अंतर्मुख वृत्तीचा नरेन्द्र हा सत्त्वसूर्य आहे. हा ध्यानसिद्ध मुक्तात्मा मानवतेच्या उद्धाराकरतां अवतीर्ण झाला आहे. नरेन्द्राकडे वळून रामकृष्ण म्हणाले, " नरेन्द्र, झोप घेतांना एखादी ज्योत तुझ्या डोळ्यांसमोर दिसते का ? " " होय. लहानपणापासून दिसते; पण महाराज, मी एक प्रश्न विचारतों. आपण परमेश्वर पाहिला आहे काय ? "

" होय, मीं परमेश्वर पाहिला आहे. त्याच्याशीं बोललों आहें. मी तुला पहातों आहें हा कदाचित् भास असेल. पण तुझ्या आकृती-पेक्षांही अधिक स्पष्टपणानें मीं परमेश्वर पाहिला आहे. तो परमेश्वर तुलाही भेटेल. "

" केव्हां भेटेल ? "

" एखाद्याची बायको मेली तर तो ढसढसा रडतो. तितकी तीव्र आर्तता तुझ्या मनाला वाटली आणि परमेश्वराच्या भेटीसाठीं तुझ्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहिले तर तो परमेश्वर दूर नाहीं. " याप्रमाणें बोलतां बोलतां परमेश्वराच्या नामस्मरणामुळें रामकृष्ण समाधीच्या अवस्थेंत गेले. ते देहभान विसरले. 'ब्रह्मानन्दीं लागली टाळी। कोण देहातें सांभाळी ?' अशी त्यांची स्थिति झाली. ही समाधीची अवस्था पाहून नरेन्द्राला वाटलें कीं हें थोतांड आहे. ही नजरबंदी आहे. या म्हाताऱ्याला वेड लागलें आहे. पण या पुराणपुरुषाच्या सहवासांत नरेन्द्राला अनिर्वचनीय आनंद वाटत होता. पुण्यसलीला गंगामातेच्या पावन-तीर्थावर प्रातःकालीं स्नान करून पार्थिवाची पूजा करणाऱ्या ऋषीला जें समाधान वाटतें तें तपःसंपादित समाधान नरेन्दाला रामकृष्णांच्या सहवासांत वाटत होतें. हें समाधान कां वाटतें याचें कारण मात्र

पाश्चिमात्य विचारांच्या जाळ्यांत गुरफटलेल्या नरेन्द्राच्या आत्म्याला समजेना.

रामकृष्णांनीं नरेन्द्राला पद म्हणावयास सांगितलें. नरेन्द्रानें 'मन, चल निज निकेतने' हें पद म्हणावयास आरंभ केला. त्याचा भावार्थ असा कीं, "हे मना, आपल्या घरीं चल. या संसाररूपी प्रदेशांत स्पर्श, रूप, रस, इत्यादि विषय तुला मोह पाडतील. भक्तीच्या प्रकाशांत पावलें टाकीत चल. तुझें पुण्यरूपी धन जपून ठेव. वाटेंत सहा चोर भेटतील. ते चाल करून आले तर शम, दम या मित्रांची मदत घे. शेवटीं साधुसंग या नांवाची धर्मशाळा दिसेल. तिथें विश्रांति घे." पदाचें पहिलें कडवें सुरू होतांच सर्वत्र शांतता पसरली. अनुरूप अशा स्वरांतून मनाच्या असहायतेच्या तीव्र भावना उसळून आल्या. आणि पुढील 'हे मन' हें संबोधन तारषड्जाला नेऊन नरेन्द्रानें अशा आर्त स्वरानें उच्चारलें कीं मनाच्या विवशतेचें दृश्य एका पुकारासरशीं भक्तांच्या ममश्रक्षूंसमोर उभें राहिलें. भक्तांचीं शरीरें रोमांचित झालीं. रामकृष्णांना तर नरेन्द्राच्या मुखांतून निघणारा प्रत्येक शब्द दिव्य ज्योतीप्रमाणें वाटत होता. त्यांचें शरीर काष्ठाप्रमाणें जड झालें. त्यांचा आत्मा परमात्मस्वरूपी लीन झाला. कांहीं वेळानें ते देहभानावर आले. देवदर्शन घेऊन जितक्या प्रसन्नतेनें साधक देवळाच्या बाहेर जातो तितक्याच प्रसन्नतेनें परमहंसांचें दर्शन घेऊन नरेन्द्र घराकडे निघाला.

१८८१ साल सुरू झालें. नरेन्द्र वरच्या वर्गांत गेला. याच वेळीं मधुमेहानें आजारी पडला. हा विकार दत्त घराण्यांत आनुवंशिक होता. बरा झाल्यावर त्यानें कॉलेजच्या अभ्यासाला सुरुवात केली. मिल् आदि करून पाश्चात्य नैयायिकांचे ग्रंथ त्यानें वाचून टाकले. आतां डेकार्टचा 'अहंवाद', ह्यूम व बेन यांचा 'नास्तिकवाद', स्पायनोझाचा 'अद्वैत चिद्वस्तुवाद', डार्विनचा 'उत्क्रान्तिवाद' कॅन्ट आणि स्पेन्सर

यांचा 'अज्ञेयवाद', इत्यादि मतांच्या परिशीलनांत नरेन्द्राची प्रखर बुद्धिमत्ता परिभ्रमण करूं लागली. शरीरांतील निरनिराळे अवयव व स्नायू यांची पूर्ण माहिती करून घेण्यासाठीं तो मधून मधून मेडिकल कॉलेजमध्येंही जात असे आणि आठवड्यांतून दोन वेळां दक्षिणेश्वरच्या आध्यात्मिक विश्वविद्यालयांतही निरक्षर रामकृष्णांच्या मार्गदर्शनाचा दुर्लभ लाभ घेत असे. कॉलेजमधील वाद, प्रतिवाद आणि अतिवाद मानव-बुद्धीच्या सीमेपलीकडे असलेल्या सद्वस्तूची ओळख करून देण्यास सर्वथैव असमर्थ आहेत हें त्यानें जाणलें.

## रामकृष्णांची भविष्यवाणी : ३० :

ब्राह्म समाजांतील साधक रामकृष्णांच्या भेटीला येत. त्यांचा उपदेश ऐकत. परमेश्वर आपली माता आहे या भावनेनें देवाची प्रार्थना करण्याची पद्धत ब्राह्म समाजानें रामकृष्णांपासून घेतली. त्या समाजाचे एक विख्यात संस्थापक केशवचंद्र सेन रामकृष्णांना भेटावयास आले. त्यांनीं रामकृष्णांच्या चरणांवर डोकें ठेवलें. नरेन्द्र आणि भक्तमंडळी पलीकडे बसली होती. बोलतां बोलतां भावावेशांत रामकृष्णांची दृष्टि केशवचंद्रांकडून नरेन्द्राकडे वळली. त्याच्या भावी जीवनाचें उज्ज्वल चित्र मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें. कांहीं वेळानें केशवचंद्र सेन निरोप घेऊन कलकत्त्याला गेले. त्यानंतर रामकृष्ण म्हणाले, "मीं असें पाहिलें कीं ज्या एका शक्तीच्या उत्कर्षानें केशव जगद्विख्यात झाला आहे तसल्या अठरा शक्ती नरेन्द्राच्या अंगीं पूर्ण उत्कर्ष पावल्या आहेत. त्याच्यासारखा अधिकारी पुरुष कलियुगांत आजपर्यंत झाला नाहीं. मीं कालीमातेला प्रार्थना केली कीं आई, याला मायेनें बद्ध करून ठेव; नाहीं तर समाधिमग्न होऊन हा देहत्याग करील." हें भाषण ऐकून नरेन्द्र म्हणाला, "महाराज, हें काय भलतेंच बोलतां? कोठें जगविख्यात

केशवचंद्र सेन आणि कोठें माझ्यासारखा सामान्य विद्यार्थी !" हें ऐकून रामकृष्ण म्हणाले, "नरेन्द्रा, मी तरी काय करूं ? मला जगन्माता जसें दाखविते तसें मी बोलतों." स्पष्टवक्ता असलेला नरेन्द्र म्हणाला, "गुरुजी, तुम्ही माझ्यावर आईपेक्षांही अधिक प्रेम करतां, म्हणून तुम्हांला अशीं दर्शनें होतात. विश्वमाउली कांहीं दाखवीत नाहीं. हा सारा तुमच्या मनाचा खेळ आहे."

## बुद्धि आणि श्रद्धा यांतील भेद : ३१ :

केदार नांवाचे एक भक्त डाक्क्याला रहात असत. ते पूजा करीत असतांना त्यांना देव्हाऱ्याच्या मागें रामकृष्ण उभे आहेत असें दिसलें. ते डाक्क्याहून दक्षिणेश्वरीं आले. त्या वेळीं नरेन्द्रानें रामकृष्णांच्या आज्ञे-वरून दोन भक्तिपूर्ण पदें म्हटलीं. केदार तन्मय झाले. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. गाणें संपल्यावर त्यांनीं निरोप घेतला. रामकृष्ण म्हणाले, "पाहिलास ना केदार कसा भक्त आहे तो ? देवाचें नुसतें नांव ऐकलें कीं त्याच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहूं लागतात." नरेन्द्र म्हणाला, "गुरुजी, नुसत्या रडण्यावरून चांगलेपणा किंवा वाईटपणा ओळखतां येणार नाहीं. नुसतें एखाद्या वस्तूकडे टक लावून पहात बसलें तरी डोळ्यांना पाणी येतें. राधेच्या विरहावस्थेचीं गाणीं ऐकून कित्येकांचे डोळे भरून येतात; पण तेथें भक्तीचा उमाळा नसतो. आपल्या स्त्रीचा विरह आठवल्यामुळें त्या लोकांच्या डोळ्यांत पाणी येतें. मला लग्नाचा अनुभव नाहीं; म्हणून अशीं अनेक गाणीं ऐकून सुद्धां मी रडणार नाहीं !"

## रामकृष्णांचा अद्‌भुत स्पर्श : ३२ :

एक दिवस 'जीव आणि ब्रह्म यांचें ऐक्य आहे' ही गोष्ट रामकृष्णांनीं नरेन्द्राला अनेक प्रकारांनीं समजावून सांगितली. पण नरेन्द्राच्या

तार्किकतेला तें पटलें नाहीं. तो इतर भक्तांच्याकडे गेला आणि अद्वैत-मताचा उपहास करूं लागला. तो म्हणाला, "काय विचित्र कल्पना आहे ! काय म्हणे घर ईश्वर, दार ईश्वर, दगड ईश्वर, झाड ईश्वर, तूं ईश्वर, मी ईश्वर ! असें होणें कधीं तरी शक्य आहे काय ?" दुसऱ्या भक्तानें या म्हणण्याला पुष्टि दिली आणि ते खो खो हसूं लागले. तें हसणें ऐकून रामकृष्ण बाहेर आले. नरेन्द्राजवळ गेले. त्यांनीं नरेन्द्राच्या हृदयाला स्पर्श केला. त्याबरोबर चमत्कार झाला. नरेन्द्र म्हणाला, "रामकृष्णांच्या त्या अद्भुत स्पर्शानें क्षणार्धांत माझें विलक्षण भावान्तर होऊन गेलें. मला खरोखरीच असें दिसूं लागलें कीं या साऱ्या ब्रह्माण्डांत परमेश्वर भरून उरला आहे. नंतर घरीं निघालों. रस्त्यांत गाडी दिसली; पण तिच्यापासून बाजूला होण्याची प्रवृत्तीच होईना. घरीं गेलों. तिथेंही तेंच. प्रत्येक वस्तूंत ईश्वरच आहे असें वाटे. जेवावयास बसलों तर असें दिसूं लागलें कीं ताट, वाटी, अन्न वाढणारी आणि जेवणारा, हे सारे ईश्वर आहेत. माझें हें असें वागणें पाहून आई घाबरून गेली. माझे हात, पाय ढिले पडले. किती खाल्लें तरी तृप्ति होईना. हा सर्वेश्वरभाव कमी होऊं लागला तेव्हां असें वाटूं लागलें कीं सारें जग हें एक स्वप्न आहे. या अवस्थेंत बरेच दिवस गेल्यावर मी देहभानावर आलों. तेव्हांपासून माझ्या मनांत अद्वैततत्त्वासंबंधीं कधींही संशय आला नाहीं."

## नरेन्द्राच्या शरीरांतून आत्मा वेगळा केला : ३३ :

नरेन्द्राचे मित्र त्याच्या घरीं गेले. संध्याकाळपर्यंत गप्पागोष्टी झाल्या. मग तळ्यावर फिरावयास गेले. नरेन्द्र आनन्दांत होता. कारण त्याला घरांत बसून रामकृष्णांचा अलभ्य सहवास घडला होता. त्याची वृत्ति तल्लीन झाली होती. त्या भरांत तो एक पद म्हणूं लागला– "प्रेमधन

विलाय गोरा राय ". त्याच्या हृदयांतील भक्तिप्रेमाच्या तारा कंपायमान झाल्या. तें स्पन्दन इतर मित्रांच्या हृदयांत निर्माण झालें. भक्तीच्या लाटा वाहूं लागल्या. त्या पदाचा अर्थ हृदयापर्यंत पोंचला. पदाचा भावार्थ असा होता कीं गौरांग प्रेमधन वांटीत आहे. त्या प्रेमाच्या प्रवाहांत सारें शांतिपुर वाहून चाललें आहे. नरेन्द्र घोळून पद म्हणत होता. पद संपल्यावर तो म्हणाला, " मित्रांनो, खरोखर प्रेम, भक्ति आणि मुक्ति यांची रामकृष्णांनीं लूट मांडली आहे. रात्रीं दाराला कडी लावून बिछान्यावर पडलों होतों. इतक्यांत एकाएकीं माझ्या शरीरांतील आत्मा कोणीं तरी आकर्षण करून घेतला. त्याला दक्षिणेश्वरीं नेलें. तिथें अद्वैताचा उपदेश केला. त्यानंतर परत या खोलींत आणून पोंचविलें. काय ही अद्भुत शक्ति ! या दक्षिणेश्वरच्या रामकृष्णाला काय वाटेल तें करतां येतें."

## बालविधवा खोलींत आली : ३४ :

नरेन्द्राची दुसरी परीक्षा झाली. तो बी. ए. च्या वर्गांत गेला. वर्गांतील अभ्यासाकडे त्याचें फारसें लक्ष नसे. तीन तासांत आठ प्रश्न लिहिण्याचें कौशल्य त्याला नको होतें. तो थोडेच प्रश्न लिही. पण त्यांतही त्याची मूलग्राही बुद्धिमत्ता दिसून येई.

त्याच्या घरांत भावंडें फार त्रास देत म्हणून निवांत अभ्यास करण्याकरतां तो आजीच्या घरीं जाई. त्या ठिकाणीं दुसऱ्या मजल्यावर एक स्वतंत्र खोली त्याला मिळाली. त्या खोलीमध्यें फारच थोड्या वस्तू होत्या. एक सतरंजी, एक पेटी, अभ्यासाचीं पुस्तकें, दिवा, कोपऱ्यांत ठेवलेला तंबोरा आणि भिंतीवर मध्यभागीं दिसणारा श्रीरामकृष्णांचा फोटो. तेथें नरेन्द्र संध्याकाळीं अभ्यासाला येई. ती खोली रस्त्याच्या आडबाजूला होती. म्हणून तेथें पूर्ण एकान्त होता; शान्तता होती. नरेन्द्र रोज संध्याकाळीं भक्तिरसाचीं पदें तंबोऱ्याची साथ घेऊन म्हणत असे. नंतर तो

अभ्यास करी. पण एक दिवस शालेय परीक्षेपेक्षां एक निराळी परीक्षा देण्याचा त्याच्यावर प्रसंग आला. त्याच्या खोलीसमोर एक घर होतें. तेथें एक अठरा वर्षांची तरुण आणि रूपसंपन्न अशी बालविधवा रहात होती. ती जातांयेतांना नरेन्द्राकडे डोळे भरून पाही. त्याचें गायन ऐकत खिडकींत उभी राही. पण नरेन्द्रानें रस्त्यानें जातांना कोणत्याही स्त्रीच्या चेहेऱ्याकडे निरखून पाहिलें नाहीं. एक दिवस नरेन्द्र खोलींत आला. त्यानें तंबोरा घेतला आणि गाण्यास सुरवात केली. गजेन्द्रमोक्ष या प्रसंगाचें एक भावमधुर गाणें तो म्हणूं लागला. संध्याकाळची वेळ होती. माणसांची वर्दळ नव्हती. नरेन्द्राच्या गायनाचे आलाप त्या बालविधवेच्या हृदयापर्यंत जाऊन पोंचले. ती तल्लीन झाली. तिचीं गात्रें पुलकित झालीं. आपण काय करीत आहोंत हें समजण्यापूर्वींच बेभानपणानें ती धावत सुटली. नरेन्द्राच्या खोलींत आली. पुढें त्यांच्यामध्यें कोणतें संभाषण झालें तें कवि गिरीश यांनीं आपल्या काव्यमय भाषेंत नटविलें आहे :

नरेन्द्र—कोण तूं कुठोनि येसि, कां हळूच मंदिरीं ?
विलासतेस कीं उषाच मूर्तिमन्त माधुरी
तूं सती जगांतली
अप्सरा नभांतली
स्वर्गदेवता सजून येसि कां घरेवरी ?
मंजु गान रंगलें
एकतान, मंगले,
प्रगटलीस त्यांतुनी सुरेल रागिणी खरी !
सुंदरी वसुंधरा
पातलीस मंदिरा
काव्यभा प्रसन्न वा विराजलीस ईश्वरी ?
कोण तूं कुठोनि येसि कां हळूच मंदिरीं ?

बालविधवा—हाय ! गीत ऐकिलें
आणि चित्त भारलें
लोभलें कितीक दीस त्यांत आपुल्या घरीं
सूर आज नादले
दारिं तोंच पातलें
अन् कुणी कसें कळे न आणिलें इथें वरी !
नरेन्द्र— काय मोहवी असें
गीत लावुनी पिसें
ठाउकें न झंकृती मदीय ही कृती करी !
चारुशील देवते
भगिनी गानमोहिते
बंधु मी, असाच लोभ अंतरीं सदा धरीं.

आत्मदान करण्यास आलेल्या त्या तरुणीला नरेन्द्रानें नमस्कार केला. त्याच्या या कृतीनें ती बालविधवा शुद्धीवर आली. शृंगाराचें भक्तींत रूपांतर झालें. ती दाराकडे परतली. शांतपणानें आपल्या घरीं गेली. नरेन्द्रानें रामकृष्णांच्या छायाचित्राकडे पाहिलें. नमस्कार केला. आपला तंबोरा घेतला. बैठक गुंडाळली. पुस्तकें व फोटो बरोबर घेतले. खोलीला कुलूप लावलें. नरेन्द्र घरीं गेला. त्यानें ती खोली सोडून दिली. शुक्रा-सारखें पूर्ण वैराग्य असल्यामुळेंच नरेन्द्राची बुद्धि अभ्यासामध्यें खोलवर जाऊं शकली. अध्यापक, आचार्य आणि प्राचार्य नरेन्द्राची मुक्तकंठानें स्तुति करीत. कॉलेजच्या दैनंदिनीमध्यें प्रिन्सिपल हेस्टी यांनीं लिहून ठेवलें कीं, "मीं त्रिखंडांत प्रवास केला; जगांतील सर्व महत्त्वाचीं विश्व-विद्यालयें पाहिलीं. परिश्रमांची शर्थ करणारे असे जर्मनींतील महान् बुद्धिवान् विद्यार्थी पाहिले; पण नरेन्द्रासारखा प्रतिभावान् विद्यार्थी मला एकही आढळला नाहीं."

## नरेन्द्राचें लग्न ठरलें : ३५ :

आईबापांची इच्छा होती कीं नरेन्द्रानें वकील व्हावें. लग्न करून वैभवांत संसार करावा. असे विचार चालू असतांना एक श्रीमंत गृहस्थ आपल्या सुस्वरूप मुलीला घेऊन नरेन्द्राच्या घरीं आला. आईवडिलांनीं मुलगी पाहिली. त्यांना ती पसंत पडली. त्या वेळीं नरेन्द्र कॉलेजमध्यें गेला होता. त्याची वार्षिक परीक्षा जवळ आली होती. आईवडील मुलीची परीक्षा करीत होते. तो श्रीमंत गृहस्थ म्हणाला, " मी वाटेल तितका हुंडा देतों. नरेन्द्र विलायतेला गेला आणि आय्.सी.एस्. पर्यंत शिकला तरी मी पैसे पुरवीन." हें सांगितल्यावर लग्न जवळ जवळ ठरल्यासारखें झालें.

नरेन्द्र घरीं आला. लग्नाच्या वाटाघाटी समजल्यावर तो संतप्त झाला. रामकृष्णांना भेटला. रामकृष्णांनीं कालीमातेची प्रार्थना केली कीं, " हे माते, तूं नरेन्द्राचें ठरत असलेलें लग्न मोडून टाक. व्यक्तीचा संसार करून संकल्पविकल्पांच्या उतरंडी उतरण्याकरतां नरेन्द्राचा जन्म झालेला नाहीं. राष्ट्राच्या आध्यात्मिक संसाराचा उद्धार करण्याकरितां नरेन्द्राचा अवतार झाला आहे." ही प्रार्थना जगन्मातेनें ऐकली. लग्नाचीं बोलणीं वाऱ्यावर वाहून गेलीं. याच वेळीं नरेन्द्राची बी. ए. ची परीक्षा जवळ आली. भक्तिप्रेमाचीं गाणीं म्हणत असतांना नरेन्द्रानें अभ्यास केला. तो परीक्षेला बसला. पेपर लिहिले. घरीं आल्यावर त्यानें पुस्तकें टाकून दिलीं आणि रामकृष्णांच्या मठाकडे धाव घेतली.

नरेन्द्र म्हणाला, " श्रीरामकृष्णांच्या दिव्य संगतींत दिवस कसे आनंदांत जात होते याची कल्पना इतरांना देणें कठीण आहे. खेळणें, गप्पागोष्टी करणें, खाणें यांसारख्या साध्या घटना चालू असतांना सुद्धां त्यांनीं आम्हांला नेहमीं उच्च तऱ्हेचें शिक्षण न कळत देत असावें. आमचीं

मनें यत्किंचितही न दुखवितां त्यांनीं आमचे दोष आम्हांला दाखवावे. आमच्या लहानशा गुणांची प्रशंसा करून उत्तेजन द्यावें. ते आमचा प्रत्येक व्यवहार निरखून पहात असत; पण तें आम्हांला समजत नसे. रामकृष्णांचें साधनस्थळ जें पंचवटी त्या ठिकाणीं आम्हीं ध्यान करण्यास बसावें. त्या वेळीं आमच्या हृदयांत आनंदाचें तुफान निर्माण होई ! "

## वडिलांचा मृत्यु आणि दारिद्रयाचा जन्म : ३६ :

पण हे आनंदाचे दिवस फार दिवस टिकले नाहींत. नरेन्द्र पास झाला; पण परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वींच दत्त घराण्यावर एक आपत्ति ओढवली. नरेन्द्राचे वडील एकाएकीं इहलोक सोडून गेले. खर्चिक स्वभावामुळें त्यांना कर्ज झालें होतें. सहा माणसांच्या कुटुंबाचा भार नरेन्द्रावर पडला. बाहेर जातांना पायांत घालण्यास वहाणा सुद्धां नाहींत अशी स्थिति झाली. नरेन्द्रानें नोकरी मिळविण्याकरतां अर्ज केले, उंबरठे झिजविले; पण कोठेंही जमेना. नरेन्द्रावरचा प्रसंग पाहून रामकृष्णांचें चित्त कळवळलें. त्यांनीं आपल्याकडे येणाऱ्या मंडळींना ही गोष्ट सांगितली. त्याचे नोकरीचें प्रयत्न चालले आहेत हेंही सांगितलें. नरेन्द्राला हें समजल्यावर तो म्हणाला, " महाराज, माझ्यासारख्या यःकश्चित् माणसाबद्दल ज्याच्यात्याच्याजवळ असें तोंड वेंगाडणें आपल्याला शोभत नाहीं." हें ऐकून रामकृष्णांचे डोळे पाण्यानें भरून आले आणि ते म्हणाले, " नरेन्द्र, गरज पडली तर हातांत झोळी घेऊन तुझ्यासाठीं दारोदार भिक्षा मागायला माझी तयारी आहे."

या दिवसांत नरेन्द्राला दारिद्र्याची ओळख झाली. तें १८८४ साल होतें. पदवीधर झालेला एकवीस वर्षांचा नरेन्द्र नोकरीसाठीं वणावणा हिंडू लागला. लांब सदरा, शिवून नीट केलेलें धोतर, पायांमध्यें कांहीं नाहीं, केस विसकटलेले, अशा स्थितींत तो अनेक कचेऱ्यांत गेला.

'नोकराची जरूर नाहीं' हें उत्तर घेऊन परत आला. एक दिवस दुपारीं प्रखर उन्हांत चालल्यानें थकून गेला. पायाला फोड आले. मैदाना-जवळील एका पुतळ्याच्या सावलींत झोपीं गेला. मग घरीं गेला. एक दिवस सकाळीं उठला. बाहेर जातांना त्यानें सैंपाकघरांत पाहिलें. चार माणसांना पुरतील इतकेच तांदूळ होते. नरेन्द्र म्हणाला, "आई, मला आज एका मित्राकडे जेवायला जायचें आहे." नंतर तो बाहेर गेला. त्यानें नोकरीकरतां पायपीट केली. तो एक वाजतां घरीं आला. पाणी पिऊन स्वस्थ राहिला. मनांत आत्मारामाचें चिंतन चाललें होतें. एकदां एका मित्राकडे गाणें होतें. रात्रीं दहा वाजेपर्यंत नरेन्द्रानें अनेक भावमधुर पदें म्हटलीं. नंतर तंबोरा खालीं ठेवला. पुढें त्याचा श्रीमंत मित्र घरांत गेला आणि मेवामिठाई व कॉफीचे पेले घेऊन आला. सगळ्यांनीं खाण्यास प्रारंभ केला. नरेन्द्रानें मिठाईला स्पर्शही केला नाहीं. त्याच्या मनांत आलें कीं, 'माझ्या घरांत आज आई उपाशी आहे; मग मी कसा खाऊं?' मित्र आग्रह करूं लागले. नरेन्द्र म्हणाला, "आज मला अजीर्ण झालें आहे. हे पदार्थ मला पचणार नाहींत."

## नरेन्द्र संशयांत पडला : ३७ :

या कष्टांची हकीगत पुढें नरेन्द्रानें सांगितली. तो म्हणाला, "एक दिवस सकाळीं उठलों. देवाचें नामस्मरण करूं लागलों. आई एकदम ओरडून म्हणाली, 'गप्प बैस कारट्या. लहानपणापासून सारखें नाम-स्मरण करीत आहेस; त्या देवानेंच तुझी ही दशा केली.' हे तिचे शब्द माझ्या काळजापर्यंत पोचले. मी विचार करूं लागलों. ईश्वर खरोखर आहे का? असला तर तो माझी प्रार्थना कां ऐकत नाहीं? माझें मन संशयग्रस्त झालें. मी नास्तिकवादाकडे झुकलों. वाटेल तसें बरळूं लागलों. माझ्या मित्रांनीं ही हकीगत रामकृष्णांना सांगितली. रामकृष्ण म्हणाले,

' गप्प बसा पोरांनो ! आईनें मला सांगितलें आहे कीं नरेन्द्र कधींही वाईट मार्गानें जाणार नाहीं.'

" माझ्या मनांत विचारांचे हेलकावे सुरू झाले. मला वाटलें, ईश्वर नाहीं असें कसें होईल ? तो असलाच पाहिजे. सृष्टिरचनेचे त्याचे हेतु आपल्याला उलगडत नाहींत इतकेंच ! नंतर उन्हाळा गेला. पावसाळा संपला. पण नोकरी मिळेना. कांहीं वेळीं एक पैशाचे फुटाणे खाऊन मीं सबंध दिवसाची गुजराण केली. एक दिवस हिंडतां हिंडतां संध्याकाळ झाली. मी थकून गेलों. एक पाऊलही पुढें टाकवेना. डोळ्यांपुढें अंधेरी आली. तसाच एका घराच्या पडवींत पडून राहिलों. किती वेळ गेला कोणास ठाऊक ! एकाएकीं असें वाटूं लागलें कीं कोणीतरी मनावरील एक एक पडदा बाजला सारीत आहे. या सृष्टींत इतकी विषमता कां आहे याचा मला उलगडा झाला. " Suddenly I felt as if by some divine power the coverings of my soul were removed one after another." माझे सर्व संशय नाहींसे झाले. मन आनंदानें भरून गेलें. हुशारी वाटूं लागली. थकवा गेला आणि मी घरीं आलों; आणि पहातों तों रात्र संपत आली होती."

## नरेन्द्र तपश्चर्येला निघाला : ३८ :

" त्या दिवसापासून निंदा आणि स्तुति यांविषयीं मी पूर्ण उदासीन झालों. मला वाटलें कीं आजोबांच्याप्रमाणें घरांतून निघून जावें. दिवसही ठरविला. पण असेंही मनांत आलें कीं एकदां श्रीरामकृष्णांचें दर्शन घ्यावें आणि मग गौरिशंकराच्या शिखराजवळ तपश्चर्या करण्याकरितां निघून जावें. या कल्पनेप्रमाणें मी दक्षिणेश्वरीं गेलों. रामकृष्णांच्या चरणांवर मस्तक ठेवलें. त्यांनीं माझ्याकडे पाहिलें. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह सुरू झाला. त्यांनीं एक गाणें म्हटलें— ' कथा बलते डराई.' त्याचा भावार्थ असा कीं, " मीं बोलावें तरी भीति वाटते;

न बोलावें तरी भीति वाटते. माझ्या मनांत संशय येतो कीं कदाचित् मी तुला गमावून बसेन." हें पद ऐकून माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. माझी खात्री झाली कीं रामकृष्णांनीं अन्तर्ज्ञानानें सर्व कांहीं जाणलें आहे. कांहीं वेळानें ते म्हणाले, "बाळ नोरेन्! मला माहीत आहे, कीं तूं जगदंबेच्या कामासाठीं इथें आला आहेस. तूं संसारांत कधींच राहूं शकणार नाहींस; पण मी जोंपर्यंत आहें तोंपर्यंत माझ्यासाठीं म्हणून संसारांत रहा. तूं कायावाचामनानें अखंड ब्रह्मचर्याचें पालन केलें आहेस. तुझी मेधानाडी उघडेल, अत्यंत सूक्ष्म विषयाचें तुला आकलन होईल, आणि शेवटीं तुला ईश्वराचा साक्षात्कार घडेल."

## जगन्मातेचें दर्शन : ३९ :

अखेरीस एका वकिलाच्या घरीं कारकुनीचें काम नरेन्द्राला मिळालें. तेवढ्यानें घरची स्थिति सुधारली नाहीं. एक दिवस त्याच्या मनांत आलें कीं, "जगन्माता रामकृष्णांचें ऐकते ना? मग त्यांनाच माझ्याकरतां प्रार्थना करण्यास सांगतों." हा विचार मनांत येतांच नरेन्द्र दक्षिणेश्वरीं गेला आणि त्यानें आपली इच्छा रामकृष्णांना सांगितली. रामकृष्ण म्हणाले, "अशी प्रार्थना मला करतां येणार नाहीं. तूं तर मूर्तींत देवता असतात हें मानीत नाहींस!" नरेन्द्रानें पुन्हां आग्रह केल्यावर रामकृष्ण म्हणाले, "आज मंगळवार आहे. तूंच रात्रीं मंदिरांत जा. काय पाहिजे तें मागून घे. इच्छामात्रेंकरून जगत् निर्माण करणारी माता काय करूं शकणार नाहीं?" हें ऐकल्यावर नरेन्द्र तेथेंच राहिला. रात्र झाली. बारा वाजले. नरेन्द्र गाभाऱ्यांत गेला. शांतपणानें दोन समया तेवत होत्या. समोर पाहिलें तों चैतन्य असलेली जगन्माता दिसली. तिच्या अंगांतून प्रेम, लावण्य, करुणा हे गुण जणुं कांहीं निथळत होते. नरेन्द्राचें हृदय भक्तिप्रेमानें उचंबळून आलें. त्यानें जगन्मातेला साष्टांग

प्रणिपात केला, आणि प्रार्थना केली कीं, "आई, विवेक दे, वैराग्य दे. तुझ्या दर्शनाचा निरंतर लाभ दे." याप्रमाणें प्रार्थना करून नरेन्द्र रामकृष्णांच्या खोलीकडे परतला. त्याला पाहतांच रामकृष्ण म्हणाले, "काय रे, सांसारिक दुःख नाहींसें करण्याकरितां आईची प्रार्थना कां केली नाहींस? जा, पुन्हां जाऊन प्रार्थना कर." नरेन्द्र पुन्हां दोन वेळां गाभाऱ्यांत गेला; पण प्रत्येक वेळीं संसाराकरितां प्रार्थना करण्याचें विसरला. शेवटीं रामकृष्ण म्हणाले, "जा, तुम्हांला जाड्याभरड्या अन्नाची कमतरता पडणार नाहीं." यानंतर नरेंद्राची सांसारिक चिंता थोडी कमी झाली.

## रामकृष्णांना कॅन्सर झाला : ४० :

१८८५ साल सुरू झालें. नरेन्द्राला बावीसावें वर्ष लागलें. रामकृष्णांच्या देखरेखीखालीं त्याची आध्यात्मिक उन्नति झपाट्यानें होऊं लागली. निर्गुणसाक्षात्कार व्हावा म्हणून तो उग्र साधना करूं लागला. याच वेळीं प्रेमानन्द, योगिन्, शारदानन्द, अद्वैतानन्द, अभेदानन्द, त्रिगुणातीत, गंगाधर, लाटू, तुलसी, सुबोध इत्यादि शिष्य नरेन्द्राबरोबर तपश्चर्या करीत होते. प्रत्येकाला वाटे कीं गुरूचें आपल्यावरच अधिक प्रेम आहे. त्या प्रेमाची परीक्षा होण्याची वेळ आली. या वेळीं हजारों लोक रामकृष्णांच्या दर्शनाला येत. त्यांपैकीं कांहीं दुरात्मे होते. त्यांचा रामकृष्णांच्या शरीराला स्पर्श झाला. त्यामुळें रामकृष्णांना गळ्याचा कॅन्सर झाला. त्यांची प्रकृति क्षीण होऊं लागली.

## निर्विकल्प समाधीची तळमळ : ४१ :

१८८५ च्या डिसेंबर महिन्यांत रामकृष्णांना काशीपूर येथें नेण्यांत आलें. कलकत्त्यामधील प्रख्यात डॉक्टर औषध देत होते. गुरुजींना आराम पडावा म्हणून नरेन्द्र रात्र रात्र गुरुजींच्या घराभोंवतीं फेऱ्या घाली

आणि नामस्मरण करी. तो सगुणसाक्षात्काराचा अधिकारी झाला होता; पण उपनिषदांत सांगितलेल्या निर्गुण निराकार ब्रह्माचा अनुभव त्याला पाहिजे होता. या वेळीं आध्यात्मिकतेची जागती ज्योत त्याच्या चेहऱ्यावर झळकत होती. त्याचें बसणें, उठणें, चालणें एखाद्या सिंहाप्रमाणें असे. हा परमहंसांचा आध्यात्मिक पुत्र निर्विकल्प समाधीकरतां तळमळत होता. बागेंतील एका झाडाखालीं धुनी पेटवून तो रात्रभर ध्यान करीत बसे. त्याची निद्रा म्हणजे योगनिद्रा. काशीपूरची बाग हें पुण्यक्षेत्र झालें होतें. हजारों भक्त तेथें येऊन पावन झाले. पण नरेन्द्र मात्र तळमळत होता. एक दिवस तो रामकृष्णांना म्हणाला, " महाराज ! शुकदेवाप्रमाणें पांच पांच, सहा सहा दिवस समाधि लावून बसावें असें मला वाटतें. देह-धारणाकरतां क्षणमात्र जागृतीवर यावें व फिरून 'चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहं' या स्वरूपांत निमग्न व्हावें असें मला वाटतें. हा निर्विकल्पसमाधीचा अनुभव मला केव्हां मिळणार ? " हें ऐकून परमहंस रागावले. ते आपल्या क्षीण आवाजांत म्हणाले, " बेटा नोरेन् ! हें बोलणें तुला शोभतें का ? भारतांतील जीवांची शिवस्वरूपांत सेवा करणें हें तुझें कार्य ! आपल्या छायेचा आश्रय करणाऱ्या हजारों श्रान्त जीवांचा अन्त-रात्मा संतुष्ट करणारा प्रचंड वटवृक्ष तुझ्याशिवाय कोण आहे ? त्रिविध-तापानें पोळलेल्या हजारों परमार्थजिज्ञासूंना ज्ञानामृत पाजून तूं सुखी करशील. आत्मकल्याणाचा स्वार्थ सोडून तूं लोककल्याणाकडे पहा."

संध्याकाळची वेळ होती. भक्त ध्यान करूं लागले. नरेन्द्रही ध्यानांत तल्लीन झाला. त्याच्या डोक्याच्या मागें मोठा उजेड दिसला. अंगावर डासांचें पांघरूण झालें तरी तो हालला नाहीं. त्याच्या ठिकाणचा 'अहं' दिव्यत्वांत मिसळून गेला. दिशा दिसेनात. कालाचा लोप झाला. नामरूपाचें उच्चाटन झालें. नरेन्द्र आत्मानुभवाच्या अत्युच्च शिखरावर

आरूढ झाला. या दिव्य उन्मादामुळें फक्त ब्रह्मभाव शिल्लक राहिला. अशा स्थितींत नरेन्द्र एकदम ओरडला, " गोपाळ, ए गोपाळ, माझें शरीर कोठें आहे ? " गोपाळ नरेन्द्राजवळ आला. नरेन्द्राचे अवयव ताठ झाले होते. श्वासोच्छ्वास बंद पडला होता. गोपाळला वाटलें कीं नरेन्द्राचें देहावसान झालें. तो धांवत धांवत रामकृष्णांच्याकडे गेला. त्यांना घडलेला प्रकार सांगितला. त्रिकालज्ञानी परमहंसांनीं सर्व जाणलें होतें. ते म्हणाले, " आहे त्या स्थितींतच त्याला असूं द्या. तो निर्विकल्पसमाधीचा अनुभव घेत आहे." रात्रीं नऊ वाजेपर्यंत नरेन्द्र त्याच निश्चल स्थितींत होता. त्याचे गुरुबंधु त्याला हांका मारीत होते. अत्यंत दूरच्या लोकांत आनंदाच्या लहरींवर तो तरंगत होता. वहात वहात देहबुद्धीच्या किनाऱ्यावर आला. त्याच उन्मादांत उभा राहिला. धांवत धांवत रामकृष्णांच्याकडे गेला. रामकृष्ण म्हणाले, " नरेन्द्र, जगदंबेनें तुला सर्व कांहीं दाखविलें आहे. तुला आलेला हा दिव्य अनुभव मी तिजोरींत घालून ठेवतों. तिजोरीची किल्ली माझ्याजवळ राहील. आतां तुला माझा संदेश जगाला पोंचवण्याचें कार्य करावयाचें आहे. त्यानंतर तुला पुन्हां हा अनुभव प्राप्त होईल."

## नरेन्द्राला सर्व देऊन टाकलें : ४२ :

१८८६ साल सुरू झालें. रामकृष्णांचा आजार वाढत चालला. ते शांतपणानें सर्व सोशीत होते. होतां होतां ऑगस्ट महिना उजाडला. त्यांची जीवनज्योत लवकरच मालवणार हें सर्वांना कळून चुकलें. रामदासांच्या कल्याणाप्रमाणें नरेन्द्र रामकृष्णांची सेवा करीत होता. हळू हळू ऑगस्ट महिना उजाडला. नरेन्द्र चिंताक्रान्त बसला होता. रामकृष्णांनीं त्याला बोलावलें. ध्यान करीत बसण्यास सांगितलें. परमहंसांनीं त्याच्या हृदयाला स्पर्श केला. नरेन्द्राला समाधि लागली. बऱ्याच वेळानें नरेन्द्र देहभानावर आला. त्या वेळीं रामकृष्णांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू

वहात होते. तो म्हणाला, “ महाराज ! आपण कां रडतां ?” रामकृष्ण म्हणाले, “ बेटा नोरेन् ! मी आतां फकीर बनलों आहें. माझें सर्व सामर्थ्य मीं तुला देऊन टाकलें आहे. या सामर्थ्याच्या जोरावर तूं या राष्ट्राचा उद्धार करशील. मानवांना विश्वधर्माचा संदेश देशील. त्यानंतर तूं परत आपल्या उगमाकडे जाशील.” हें भाषण ऐकल्यावर नरेन्द्राला गहिंवर आला. तो बालकाप्रमाणें रडूं लागला. त्यानें गुरुमाउलीचे चरण आपल्या अश्रूंनीं भिजवून टाकले.

6028

## नरेन्द्राचे गुरुजी निजधामास गेले :४२:

१६ ऑगस्ट १८८६ हा दिवस उजाडला. रामकृष्णांच्या देहाची खोळ जीर्ण होत चालली. एखाद्या तयस्थाप्रमाणें ते आपल्या देहाकडे पहात होते. पहातां पहातां ज्योत मंद होत चालली. नरेन्द्र कालीमातेचें स्मरण करीत त्यांच्या पायांशीं बसला होता. रात्रीचे बारा वाजले. रामकृष्ण म्हणाले, “ बेटा नोरेन्, सर्व शिष्यांचा सांभाळ कर.” हें ऐकून नरेन्द्र स्फुन्दून रडूं लागला. साडेबारा वाजले. काळ देहाच्या दाराशीं येऊन टक्टक् असा आवाज करीत होता. एक वाजला. भगवान् श्रीरामकृष्ण-परमहंस कुशीला वळले. त्यांनीं ॐ असा प्रणवाचा उच्चार केला आणि शांतपणानें ते ब्रह्मनिर्वाणाप्रत जाऊन पोंचले.

परमहंसांच्या महासमाधीची बातमी चोहोंकडे पसरली. हजारों भक्त काशीपूर येथें धावून आले. रीतीप्रमाणें परमहंसांच्या मृत देहाला स्नान घालण्यांत आलें. उंची रेशमी वस्त्र गुंडाळून वर फुलें वाहिलीं. नंतर त्यांचा देह घाटावर नेण्यांत आला. कलेवर चंदनाच्या चितेवर ठेवलें. प्रिय शिष्य नरेन्द्र पुढें आला. त्यानें थरथरत्या हातानें चिता पेटवली. पांढऱ्या, तांबड्या, पिवळ्या आणि निळ्या अशा ज्वाला वर जाऊं लागल्या. चिता चारी बाजूंनीं पेटली. आपल्या गुरुदेवाची मूर्ति

अतःपर आपल्याला दिसणार नाहीं म्हणून कांहीं शिष्य दुःखातिरेकानें जमिनीवर कोसळले. कांहीं वेळानें सर्वांच्या अंतःकरणांत नितान्त शांतता प्राप्त झाली. नरेन्द्र शांतपणानें त्या ज्वालांकडे पहात होता. तो गळ्याचा कॅन्सर भस्म झाला. तो जराजीर्ण देह पंचमहाभूतांत विलीन झाला. भस्मराशी शिल्लक राहिला. त्या भस्मराशींतून एक मूर्ति निर्माण झाली आणि ती मूर्ति आपल्या हृदयकमलामध्यें विराजमान झाली आहे असें नरेन्द्राला वाटलें. त्या दिव्य मूर्तीचें स्मरण करतां करतां नरेन्द्र ज्ञानेश्वरांच्याप्रमाणें म्हणाला असेल कीं मी आपल्या हृदयाच्या चौरंगावर सद्‌गुरूचीं पावलें बसवितों, ऐक्यभावाच्या ओंजळींत सर्वेन्द्रियांच्या कळ्या ठेवतों, आणि तो अर्घ्य गुरुचरणीं अर्पण करतों. अनन्यभावाच्या पाण्यानें सर्व वासना धुवून टाकतों आणि गुरुपादुकांना चंदन लावतों. शुद्ध आनंदाचें अष्टदलकमल वहातों. अहंकाराचा धूप जाळतों. नाहं-भावानें ओवाळतों व समरसभावानें गुरुचरणांना मिठी मारतों. परमहंसांचा कृपाप्रसाद झाल्यावर त्रिविधताप आम्हांला त्रास देऊं शकणार नाहीं. गुरुमाउली आपल्या शिष्यास आधारशक्तीच्या मांडीवर कौतुकानें वाढविते. हृदयाकाशांतील पालखींत त्यास निजवून स्वतः झोके देते. त्याच्यापुढें आत्मज्योति ओवाळून मनपवनाचीं खेळणीं करते. आत्मसुखाचीं बाळलेणीं त्याच्या अंगावर घालते. अनाहतनादाचा खुळखुळा हातीं देऊन, सतराव्या कलेचें अमृतपान करवून समाधिसुखांत निजविते. कापुरास सुवास देणें, सूर्याच्या अंगास उटी लावणें किंवा कल्पतरूला हार घालणें हें जसें अशक्य आहे त्याचप्रमाणें श्रीरामकृष्णांचें वर्णन करणें अशक्य आहे. झाडाच्या मुळाशीं पाणी घातलें कीं तें सर्व शाखांना पोहोंचतें; समुद्रांत स्नान केलें कीं जगांतील सर्व तीर्थांत स्नान केल्याचें पुण्य मिळतें; त्याचप्रमाणें परमहंसांची सेवा केल्यामुळें माझ्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या.”
यापमाणें विचार करीत नरेन्द्र सर्व भक्तांच्या बरोबर घरीं परतला.

## नर्तकीचे नेत्रकटाक्ष : ४४ :

नरेन्द्र भक्तिमार्गांत पुढें चालला होता. पण त्याच्या कॉलेजमधील श्रीमंत आणि रंगेल मित्रांना त्याचे मार्ग पसंत नव्हते. त्यांना वाटे कीं नरेन्द्रानें कायद्याची परीक्षा द्यावी. वकील व्हावें. गडगंज पैसा मिळवावा. मदिरा आणि मदिराक्षी यांच्या सहवासांत मौज करावी. त्यांना असें वाटलें कीं नरेन्द्राला गायनाची आवड आहे. तेव्हां नर्तनाचीही आवड असणारच. एखाद्या नर्तन करणाऱ्या पण्यांगनेचा सहवास मिळाला कीं नरेन्द्र घुंगरांच्या तालावर नाचूं लागेल, आपल्या कळपांत येईल, त्याचा निराळेपणा संपेल. हें मनांत आल्यावर त्यांनीं एका नर्तकीची भेट घेतली. तिला सुवर्णदक्षणा दिली. नरेन्द्राला मोह पाडण्याची कामगिरी तिला सांगितली. तिला वाटलें, एका तरुण युवकाला भूल पाडण्याचें काम किती सोपें ! घुंगरांची रुमझुम सुरू झाल्याबरोबर हा तरुण आपल्या कृत्रिम हावभावांच्या जाळ्यांत अडकेल. नर्तकीबरोबर खलबत करून ते श्रीमान् मित्र नरेन्द्राकडे गेले आणि म्हणाले, "चल, आपण बागेंत फिरावयास जाऊं." नरेन्द्र त्यांच्याबरोबर निघाला. गाडींत बसला. ती गाडी सरळ मार्गानें न जातां एका आडगल्लींत शिरली. एका निळ्या रंगाच्या घरापुढें उभी राहिली. सर्व मंडळी गाडींतून उतरली. घरापुढील बागेंत बसली. दोन तास गाणेंबजावणें झालें. नरेन्द्रानेंही गाणें म्हटलें. कांहीं वेळानें त्याला थकवा आला. एक मित्र म्हणाला, "नरेन्द्र, तूं दमलेला दिसतोस. समोरच्या घरांत माझी ओळख आहे. तिथें दाराजवळ मोकळी खोली आहे. त्या खोलींत विश्रान्ति घे. थोड्या वेळानें आपण घरीं जाऊं." नरेन्द्र त्या खोलींत गेला. तिथें जाजम अंथरलेलें होतें. मध्यभागीं एका निळ्या भिंतीच्या पार्श्वभूमीवर दुर्वास, मेनका आणि बाल शकुंतला यांचें चित्र लावलें होतें. नरेन्द्रानें उशीवर डोकें टेकलें आणि तो झोप घेणार

इतक्यांत रुमझुम् असा आवाज त्याला ऐकूं आला. तो उठून बसला. त्या आवाजाच्या मागोमाग एका उन्मादक डोळ्यांच्या नर्तकीनें त्या खोलींत प्रवेश केला. तिच्या रेशमी रुमालावर शिंपडलेल्या अत्तराचा दरवळ त्या खोलींत पसरला. तिनें मेनकेच्या चित्राकडे पाहिलें आणि गायनाच्या लहरीवर नृत्य करण्यास सुरवात केली. नरेन्द्र पहात होता. तिच्या चेहऱ्यावरील ऊनपावसाचा खेळ खेळणारे भाव मनोवेधक होते. अन् त्या भावांच्या परिपोषास मदत करणारी डोळे, नाक, गाल, जिवणी, भुवया व कपाळ यांची एकसमयावच्छेदेंकरून होणारी हालचाल चैतन्य-पूर्ण होती. 'वस्त्र देओ बनवारी' हें गाणें ती म्हणत होती. कडवें म्हणतांना शीतल जलक्रीडेनें अंगांतून उठणारी गोड शिरशिरी आणि कृष्ण वस्त्र देत नाहीं म्हणून आलेला लटका राग, हे सारे भाव अंग-विक्षेपांतून उमटले. ती लाजली. त्या लाजण्यांतील खुमारी कांहीं और होती. तिनें आपला उसना राग नजरेच्या कटाक्षानें आणि मानेच्या झटक्यानें व्यक्त केला. त्यानंतर मधुपान करीत असतांना भ्रमराच्या डोळ्यांवर चढणारी मादकता तिच्या डोळ्यांत उतरूं लागली. चाळांची रुमझुम चालू असतां उन्मादक प्रेम आणि कृत्रिम लज्जा यांचा लपंडाव चेहऱ्यावर चालला होता. मखमलीच्या कुंचकीवर तिनें मोतिया रंगाचें पातळ परिधान केलें होतें. रमराज शृंगाराच्या भात्यांतील बाणाप्रमाचें शोभणारी ती उभार ठेवणीची नर्तकी आपल्या नेत्रकटाक्षांनीं नरेन्द्राला विद्ध करण्याचा प्रयत्न करीत होती. तिच्या नसांनसांतून जीवनरस नाचत होता. पण नरेन्द्राचें मन नाचलें नाहीं. तो पहात राहिला. रागावला. त्या रागाचें तिरस्कारांत रूपांतर झालें. तो म्हणाला, "बाई, तुमचा हा नाच पुरे करा. देवानें तुम्हांला सौंदर्य दिलें, त्याचा असा बाजार कशाकरतां मांडतां? तुमच्या तारुण्याकरतां गिधाडाप्रमाणें अनेक रंगेल तरुण तुमच्याभोंवतीं जमा होतात. पण हें तारुण्य ओसरल्यावर

तुम्हांला कोणी विचारणार नाहीं. जा, हा निंद्य मार्ग सोडून द्या. महेश्वराच्या मंदिरांत भक्तिप्रेमानें नाचा आणि आपल्या सुंदर डोळ्यांनीं सौंदर्यसागर अशा परमेश्वराचें रूप पहा." —इतकें सांगून आपल्या रंगेल मित्रांशीं एकही शब्द न बोलतां नरेन्द्र मठाकडे निघून गेला. ती नर्तकी भांबावून गेली. खर्जाल झाली. आपलें विषयान्ध जीवन तिला दु:सह वाटूं लागलें. नरेन्द्राचे मित्र तिच्यासमोर आले तेव्हां ती म्हणाली, "महाराज, आज एका साधु पुरुषाला मोहांत पाडण्यासाठीं मला या ठिकाणीं आणून आपण माझी चांगलीच शोभा केलीत !"

## तापलेला तवा : ४५ :

पुढें दोन महिन्यांनीं एक चमत्कारिक प्रसंग निर्माण झाला. रात्रीची वेळ होती. शेगडी पेटली होती. त्या शेगडीवर तवा ठेवला होता. नरेन्द्र तव्यावर कांहीं चमचमीत पदार्थ करणार होता. इतक्यांत कां कोणास ठाऊक त्याच्या मनांत विषयवासना जागृत झाली. त्यानें विवेकाचा अंकुश चालवून पाहिला. पण मन ताब्यांत येईना. हें पाहतांच नरेन्द्र भांबावला, संतप्त झाला. त्यानें तापलेल्या तव्याकडे पाहिलें. तो तव्यावर जाऊन बसला. मनांतील वासना जळून गेली. ती जखम बरी होण्यास दोन महिने लागले.

## भैरवाचा पराभव : ४६ :

रामकृष्णांच्या मृत्यूनंतर कांहीं भक्त घरीं गेले. कॉलेजांतील अभ्यास करूं लागले. पण नरेन्द्र त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, "या मायिक परीक्षांचा उपयोग नाहीं. हे परीक्षक पदव्यांची खिरापत वांटीत आहेत. या पदव्यांच्या माळा गळ्यांत घालून जीवन कृतार्थ होणार नाहीं. सर्व विद्यांमध्यें आत्मविद्या ही श्रेष्ठ आहे. त्या विद्येचा आपण रामकृष्णांनीं सांगितलेल्या पद्धतीनें अभ्यास करूं, अनुभव घेऊं." अशा अर्थाचें

त्याचें भाषण ऐकल्यावर बऱ्याच भक्तांनीं परीक्षेचा नाद सोडून दिला. ते भक्त कलकत्त्याजवळ बडानगर येथें गेले. त्यांनीं एक घर भाड्यानें घेतलें. येथें कित्येक वर्षे माणसांची वसती नव्हती. रात्रीं बारा वाजतां दण् दण् असे भुतांच्या पावलांचे आवाज ऐकूं येतात अशी वार्ता आजूबाजूचे लोक सांगत. पण या भुतांची भीति साधकांना नव्हती; नरेन्द्राच्या स्वप्नांतहि नव्हती. नरेन्द्राला पाहून हीं भुतेंच पळून गेलीं असतीं. रामकृष्ण असतांना पंचवटीमध्यें अशी एक घटना घडून आली होती. ती कोणती घटना? पंचवटीमधील एका वटवृक्षाखालीं कांहीं भक्त ध्यानास बसले; पण कोणाचेंही लक्ष चिंतनांत लागेना. असें कां होतें तें त्यांना दिसेना. रामकृष्णांना तें सर्व दिसत होतें. कांहीं वेळानें नरेन्द्र तेथें आला. त्याच्या हातांत एक दण्ड होता. नरेन्द्रानें मृगाजिन अंथरलें, दण्ड कडेला ठेवला, सिद्धासन घातलें आणि तो ध्यानास बसला. ध्यानास अडथळा होऊं लागला. चित्त स्थिर होईना. नरेन्द्र अस्थिर झाला, संतापला. त्याचे डोळे लाल झाले. आपल्याजवळ कोणी उभें आहे असा त्याला भास झाला. त्यानें दण्ड उचलला, आपलें मस्तक जोरानें हालवलें, आणि तो दण्ड जमिनीवर ताड्दिशीं आपटला. त्याबरोबर त्या वटवृक्षाच्या शाखा जोरानें हालूं लागल्या. तो वृक्ष उन्मळून पडतो असें वाटलें. नरेन्द्र बेशुद्ध पडला. कांहीं वेळानें सर्व शांत झालें. नरेन्द्र आणि इतर साधक ध्यानास बसले. त्यांना कोणताही व्यत्यय आला नाहीं. हा व्यत्यय कशामुळें आला असें एका शिष्यानें रामकृष्णांना विचारलें. तेव्हां रामकृष्ण म्हणाले, "या झाडावर एक तीस फूट उंच असलेला भैरव रहातो. तो भुतांच्या एका समूहाचा मुख्य आहे. तो शंकराच्या जटेंतून निर्माण झाला. हे साधक शंकराचें ध्यान करूं लागले कीं तो व्यत्यय आणीत असे. आज नरेन्द्राच्या ध्यानांतही त्यानें व्यत्यय आणला. पण नरेन्द्रानें दण्ड आपटतांच

तो घाबरला आणि आकाशांत उडून गेला. नरेन्द्र हा शंकराचा अंशावतार आहे. त्याच्यापुढें भैरवाचें काय चालणार ? ”

## बडानगर येथील मठ : ४७ :

बडानगर येथील भुतानें पछाडलेल्या घराची साधकांना भीति वाटत नव्हती. भाडें फार कमी म्हणून हें घर त्यांनीं पसंत केलें. त्या घराच्या तळमजल्यांत ओल होती. तसेंच विंचू, सरडे, साप आणि अंधार यांची वसती होती. पुढचा दरवाजा मोडला होता. मागील बाजूला जंगल म्हणतां येईल इतकें रान माजलें होतें. त्याच ठिकाणीं शेवाळानें व पानपाचोळ्यानें तुडुंब भरलेलें एक तळें होतें. या तळ्याजवळ एक बेलाचें झाड होतें. घराच्या दुसऱ्या मजल्यावर एक मोडका दिवाणखाना होता. या ठिकाणीं रामकृष्णांच्या अप्रसिद्ध भक्तांनीं आपला मठ स्थापन केला. जागा सारवली. रामकृष्णांच्या अस्थि ठेवलेलें भांडें मधें ठेवलें. त्याची पूजा केली. आश्रम सुरू झाला. नरेन्द्राच्या आकर्षणानें अनेक गुरुबंधू तेथें जमा झाले. त्यांनीं नरेन्द्राबरोबर संन्यासाची दीक्षा घेतली. या संन्याशांचा जीवनक्रम कसा होता ? ते झाडीत, सारवीत, भांडीं घाशीत. कावड घेऊन गंगेचें पाणी आणीत. सैंपाक करीत. हें चालू असतांना अध्यात्मचर्चा करीत. अखंड नामस्मरणाचा आनंद लुटीत. कित्येक वेळीं त्यांना उपास काढावे लागत. दोन लंगोट्या आणि छाटी हा त्यांचा पोशाख. चटई आणि फाटकी चादर हा त्यांचा बिछाना. रामकृष्णांच्या कांहीं गृहस्थाश्रमी भक्तांनीं भेट म्हणून दिलेलीं पुस्तकें हा त्यांचा ग्रंथसंग्रह. सभोंवतीं लावलेल्या देवतांच्या आणि साधुसंतांच्या तजबिरी, खिळ्यावर ठेवलेल्या जपाच्या माळा आणि भजनाकरितां खालीं ठेवलेला तंबोरा, हें त्यांचें वैभव ! सबंद मठांत फक्त एक धोतर व एक

उपरणें होतें. या दोन वस्तू दोरीवर ठेवलेल्या होत्या. कोणाला बाहेर जावयाचें असलें म्हणजे त्यानें त्या वस्तूंचा उपयोग करावा.

सुरेशबाबू या नांवाचा रामकृष्णांचा एक गृहस्थाश्रमी भक्त होता. तो गोपाळ नांवाच्या एका भक्ताला म्हणाला, " गोपाळ, तूं आश्रमांत जा. हे पैसे घे. त्यांना जरूर त्या वस्तू आणून दे. पण माझें नांव सांगूं नकोस. " गोपाळानें या अनामिकाची सेवा आश्रमांत पोंचविली. हे दिवस उग्र तपश्चर्येचे होते. सर्व संन्यासी वैराग्यपर पदें म्हणत. नरेन्द्र आपल्या मधुर वाणीनें जगदंबेचीं स्तोत्रें म्हणूं लागे. सर्वांचीं अंतःकरणें प्रसन्न होत. रामकृष्ण एकदां म्हणाले होते कीं ज्याप्रमाणें पुंगीचा आवाज ऐकून नाग आपली फणा उभारतो, डोलूं लागतो, त्याप्रमाणें नरेन्द्र गाऊं लागल्यावर सर्वांच्या अंतर्यामीं वास करणारा परमात्मा त्याच्या गायनानें मोहित होऊन डोलूं लागतो.

भजनध्यानानंदाच्या उच्च शिखरावर बसून हे संन्यासी कनक आणि कांता यांच्या त्यागासंबंधानें चर्चा करीत. नंतर ते देवाला प्रार्थना करीत कीं, 'हेंचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा । हे देवा, आम्हांला असताकडून सताकडे पोंचीव. मायेच्या अंधारांतून आत्मसूर्याच्या प्रकाशांत नेऊन सोड. तूं कसा आहेस तें तूंच आम्हांला सांग. आम्हांला काय पाहिजे तें तूंच ठरव. आम्ही कुठेंही गेलों तरी आमच्या सांगातीं रहा आणि आम्हांला हातीं धरून मार्ग दाखीव.' प्रार्थना संपल्यावर ते तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत. नास्तिकवाद आणि जडवाद यांच्या युक्तायुक्ततेसंबंधानें वाद करीत. नरेन्द्र दोन्ही बाजू आपल्या अधिकारवाणीनें समजावून सांगे. नंतर रामकृष्णांच्या एखाद्या उक्तीचा आधार घेऊन समारोप करी.

## भगवान् येशु ख्रिस्त

: ४८ :

यतीचा एकान्तप्रिय, निवृत्तिपर जीवनक्रम आणि सर्वात्मभावमूलक समाजसेवेची नवीन प्रवृत्ति असें द्विविध ध्येय रामकृष्णसंप्रदायानें आपल्या-पुढें ठेविलें होतें. शिव आणि सेवा या दोन शब्दांनीं हें तत्त्वज्ञान आचरणांत येत असतांना प्रेमानंद नांवाच्या गुरुबंधूनें सर्वांना आंटपूर येथें आपल्या घरीं बोलावलें. सर्व शिष्य तेथें गेले. नरेन्द्रानें रामकृष्णांचें चरित्र सांगितलें. त्याच्या रोमरोमांत संन्यासनिष्ठा भिनून गेली होती. तो म्हणाला, " दिव्यत्वाचा अनुभव घेणें हेंच जीविताचें ध्येय आहे. गुरु-देवाप्रमाणें आपल्याला देवाच्या भेटीची तळमळ लागली पाहिजे. "

ख्रिस्त, बुद्ध, श्रीकृष्ण, महंमद पैगंबर, इत्यादि धर्मसंस्थापकांच्या चरित्राचा ते अभ्यास करीत. एक दिवस संध्याकाळची वेळ झाली. सूर्य अस्ताला गेला. धुमी पेटली. तरुण संन्यासी सभोंवतीं बसले. धुमींतून निघणाऱ्या ज्वाला वर जात होत्या. संन्यासी आत्मचिंतनांत निमग्न झाले. दयामय परमेश्वराची त्यांना आठवण झाली. दयेचा विचार करतांना नरेन्द्र ख्रिस्ताचें चरित्र सांगूं लागला. वक्ता आणि श्रोते यांचें तादात्म्य झालें. " आतां तुझ्या पोटीं प्रभु जन्माला येईल " असा कुमारी मेरीला दृष्टान्त झाल्याचें ऐकतांच या श्रोत्यांचीं अंतःकरणें कुमारी मेरी-प्रमाणेंच आनंदानें भरून गेलीं. ख्रिस्ताच्या बाललिला त्यांनीं ऐकल्या. ख्रिस्त इजिप्तमधून पळाला, ज्यू पंडितांनीं त्याला घेरलें, शुष्क तर्कवादानें त्याला भंडावून सोडलें. ख्रिस्त वनवासी झाला. हे तरुण संन्यासी भगवान् ख्रिस्ताबरोबर वनवासी झाले. पुढें धर्मद्रोही म्हणून ख्रिस्ताला पकडण्यांत आलें. ज्यू लोकांनीं त्याचा छळ केला. ख्रिस्तानें आपला संदेश जगाला कळविण्याकरतां प्रिय शिष्य पीटर याला उपदेश केला. ( या प्रसंगाचें वर्णन चालू असतां परमहंसांनीं नरेन्द्राला सर्वस्व दिलें आणि

शिष्यांचा सांभाळ करण्यास सांगितलें, या प्रसंगाची आठवण झाली. ) नंतर ख्रिस्ताच्या डोक्यावर ज्यू लोकांनीं कांटेरी किरीट चढविला. त्याला वधस्तंभावर चढविलें. त्याची मान लुळी पडली. शेवटच्या क्षणीं तो म्हणाला, " हे दयामय परमेश्वरा, हे विश्वमाऊली, तूं माझ्या शत्रूंना क्षमा कर. "—हा प्रसंग सांगत असतांना ख्रिस्ताचें चित्र नरेन्द्राच्या समोर होतें. नरेन्द्रानें ख्रिस्ताच्या चरणांना स्पर्श केला. तो म्हणाला, " गुरुबंधूंनो, मी जर त्या वेळीं पॅलेस्टाइनमध्यें असतों तर माझ्या हृदयांतील रक्ताचें त्या करुणामय भगवान् ख्रिस्ताच्या चरणांवर सिंचन केलें असतें. "—याप्रमाणें ख्रिस्ताच्या शिकवणीचें मनन करण्यांत त्यांचे कित्येक दिवस गेले. यानंतर सेंट फ्रान्सिस याचें स्फूर्तिदायक चरित्र नरेन्द्रानें सांगितलें. फ्रान्सिसनें मरणसमयीं मृत्यूचें स्वागत केलें. या तरुण संन्याशांनीं फ्रान्सिसच्या उद्गारांवर एकाग्रता केली. ते म्हणाले, " हे प्रिय बंधो, मृत्यो, तुझें त्रिवार स्वागत असो. " या प्रार्थनेमुळें त्यांची मृत्यूची भीति नाहींशी झाली. मृत्यूच्या कृष्णछाया उज्ज्वल प्रकाशाप्रमाणें आल्हाददायक दिसूं लागल्या. यमाचें भीषण स्वरूप नाहींसें झालें.

## भंग्याची चिलीम : ४९ :

१८८८ साल सुरू झालें. नरेन्द्राला पंचविसावें वर्ष लागलें. मठापासून दूर जावें, भरतखंड डोळ्यांनीं पाहावा, असें नरेन्द्राला वाटूं लागलें. नरेन्द्र निघाला. काशीला पोंचला. गंगेचा पवित्र प्रवाह, असंख्य देवळें, देवळांत प्रार्थना करणारे यात्रेकरू, हें पाहून नरेन्द्राचें अंत:करण आनंदानें भरून गेलें. ज्या ठिकाणीं बुद्धदेवानें पहिला धर्मोपदेश केला, ज्या ठिकाणीं शंकराचार्यांनीं अद्वैतसिद्धान्त प्रस्थापित केला, तें पवित्र ठिकाण पाहून त्याच्या कल्पनाशक्तीला स्फुरण चढलें. त्यानंतर भगवान् बुद्धाच्या पदस्पर्शानें पुनीत झालेलें सारनाथ नरेन्द्रानें पाहिलें. तैलंग-

स्वामींचें दर्शन घेतलें, भास्करानंदांशीं वाद केला, अयोध्येला सीतारामाचा जयघोष ऐकला, आग्र्याच्या ताजमहालाचें सौन्दर्य अवलोकन केलें, आणि भिक्षेवर निर्वाह करीत हा अज्ञात परिव्राजक वृन्दावनाकडे वळला. वृन्दावन एक कोसभर राहिलें. नरेन्द्र दमून गेला होता. चिलमीचा झुरका मारल्यावर थोडा हुरूप येईल असें त्याला वाटलें. त्यानें रस्त्याच्या बाजूला पाहिलें. तेथें एक मनुष्य चैनीनें चिलीम ओढीत होता. नरेन्द्र त्याच्याजवळ गेला आणि म्हणाला, " मला तुझ्याजवळची चिलीम ओढण्यास दे. " ही विनंती ऐकून तो इसम घाबरला. त्याचे हात लट्-लट् कांपूं लागले. त्यानें हात जोडले आणि कांपऱ्या स्वरांत तो म्हणाला, " महाराज, मी भंगी आहें. " नरेन्द्र म्हणाला, " देवाच्या घरीं सर्व माणसें सारखीं आहेत. तेथें भेदभाव नाहीं. " नरेन्द्राचा प्रेमळपणा पाहून त्या भंग्यानें चिलीम भरून दिली. नरेन्द्रानें चिलीम ओढली आणि हजार वर्षांचे संस्कार पायांखालीं तुडविले. नरेन्द्र वृन्दावनास पोंचला. त्याला श्रीकृष्णाच्या बाललीलांचीं आठवण झाली. राधाकृष्णांचीं गाणीं त्यानें ऐकलीं. राधा म्हणजे जीवात्मा आणि कृष्ण म्हणजे परमात्मा हा आध्यात्मिक संकेत त्याच्या लक्षांत आला. श्रीकृष्णाच्या बाललीलांनीं पवित्र झालेलीं ठिकाणें पाहिलीं. नंतर गोवर्धनाची प्रदक्षिणा सुरू झाली. सूर्य माथ्यावर आला. नरेन्द्राला विलक्षण भूक लागली. कांहीं वेळानें मुसळधार पाऊस पडूं लागला. नरेन्द्राचे प्राण व्याकुळ झाले. त्यानें श्रीकृष्ण परमात्म्याचा धावा चालविला. इतक्यांत ' योगिराज, थांबा ' असा आवाज ऐकूं आला. नरेन्द्रानें मागें पाहिलें. एक मनुष्य धांवत पुढें आला. त्याच्या हातांत भोजनाचें ताट होतें. त्यानें आग्रह करून नरेन्द्रास भोजनास बसविलें. तो शेजारच्या झाडींत मागें गेला आणि नाहींसा झाला !

## अरण्यांत भोजन मिळालें : ५० :

गोवर्धन पर्वताची यात्रा झाली. नरेन्द्र राधाकुंडाच्या दर्शनार्थ गेला. कमरेभोंवतीं फक्त एक कौपीन होतें. येथें एकही मनुष्य नव्हता. नरेन्द्रानें तें कौपीन धुऊन वाळत घातलें. नंतर कुंडांत स्नान केलें. तो बाहेर आला. हाताच्या पंजांनीं पाणी झाडून टाकलें. समोर पाहिलें तों कौपीन नाहीं. वर पाहिलें तों झाडावर एक माकड बसलें होतें. त्याच्या हातांत कौपीन होतें. नरेन्द्रानें राधेचा धांवा केला; पण कौपीन मिळेना. नरेन्द्र निराश झाला. क्षुधा प्रदीप्त झाली होती. त्यानें माकडाची प्रार्थना केली कीं, " हे कपिराज, माझें कौपीन मला परत दे. हे कपिराज, तुला हनुमंताची शपथ आहे. कौपीन दे. " याही प्रार्थनेचा कांहीं उपयोग झाला नाहीं. नरेन्द्र वैतागला. त्या निराश अवस्थेंत प्रायोपवेशन करण्याकरतां एखादी गुहा शोधूं लागला. इतक्यांत ' योगिराज, थांबा ' असा आवाज त्याच्या कानांवर आला. एक पीतांबर नेसलेला मनुष्य धांवत पुढें आला. त्याच्या हातांत छाटी होती. दुसऱ्या हातांत पक्वान्नांनीं भरलेलें ताट होतें. नरेन्द्र छाटी नेसला. राधाकृष्णाचें स्मरण करून त्यानें भोजन केलें. इतक्यांत पीतांबरधारी नाहींसा झाला. नरेन्द्र नामस्मरण करीत राधाकुंडावर आला. पूर्वींच्या जागेवर त्याचें कौपीन वाळत होतें. वर पाहिलें तों झाडावर माकड नव्हतें. हा चमत्कार पाहून आपण जेथें जातों तेथें परमेश्वर आपल्या सांगातीं आहे, आपल्याला हातीं धरून चालवीत आहे, अशी नरेन्द्राची खात्री झाली.

## नगाधिराज हिमालय : ५१ :

नरेन्द्र हिमालयाकडे निघाला. त्या वेळीं त्याच्या मनांत आलें असेल कीं चंद्रगुप्तानें राष्ट्रोद्धाराचें चिंतन हिमालयांत जाऊन केलें, वेदव्यासांनीं आपला ग्रंथ येथेंच लिहिला, शंकराचार्यांनीं आपली विश्वविख्यात

प्रस्थानत्रयी हिमालयांतच लिहून काढली. “ हिमालय हें आर्यांचें आद्य स्थान, योग्यांची तपोभूमि, थकल्या-भागलेल्यांचा विसावा, निराश झालेल्यांचें सान्त्वन, धर्माचें माहेर, मुमूर्षु जनांची अंतिम दिशा, महादेवाचें धाम आणि अवधूताची पथारी आहे. कविकुलगुरूंनीं या देवतात्मा नगाधिराजाला पृथ्वीचा मानदंड म्हटलें आहे. ” सर्व दुःखांना सामावून घेईल इतका तो विशाल आहे; सर्व चिंताग्नींचें शमन करील इतका तो थंड आहे; कुबेरालाही आश्रय देण्याइतका तो धनाढ्य आहे; आणि मोक्षाला पोंचवूं शकेल इतका तो उंच आहे.

## शिष्य मिळाला : ५२ :

नरेन्द्र हाथरस या स्टेशनवर उतरला. एका कोपऱ्यांत ध्यान करीत बसला. तेथील स्टेशन मास्तर शरच्चंद्र गुप्त गुरूचा शोध करीत होते. त्यांनीं ध्यानस्थ नरेन्द्राला पाहिलें. त्याच्या विरागी ऐश्वर्यानें ते मंत्रमुग्ध झाले. त्यांनीं नरेन्द्राच्या चरणांवर मस्तक ठेवलें. घरीं नेऊन मिष्टान्नाचें भोजन दिलें. जेवण झाल्यावर नरेन्द्रानें विश्रांति घेतली. चार वाजतां तो चिंतनांत निमग्न झाला. त्याच्याकडे पाहून शरच्चंद्र गुप्त म्हणाले, “ स्वामी, आज आपण उद्विग्न कां दिसतां ? ” स्वामींनीं उत्तर दिलें, “ मला भारतमातेच्या उद्धाराचें काम रामकृष्णांनीं सांगितलें आहे, तें करण्याचें सामर्थ्य अजून माझ्यांत आलें नाहीं, म्हणून वाईट वाटतें. आध्यात्मिकतेचा भारतांत लोप झाला आहे. चोहोंकडे दारिद्र्याची कृष्ण-छाया पसरली आहे. यापुढें भारतानें जागृत होऊन आध्यात्मिक सामर्थ्याच्या जोरावर सर्व जग जिंकलें पाहिजे.” स्वामींच्या मुखांतून हे शब्द निघत असतांना त्यांच्या नेत्रांतून विद्युत्स्फुल्लिंग बाहेर पडत होते. हें ऐकून शरच्चंद्र गुप्त म्हणाले, “ या कार्याकरतां मी तुमची सेवा करण्यास तयार आहें. ” हें म्हटल्यावर शरच्चंद्रांनीं आपली नोकरी सोडली,

संन्याशाचीं वस्त्रें धारण केलीं आणि ते स्वामींच्या बरोबर हिमालयाकडे निघाले.

## विक्राळ जबड्याचा वाघ : ५२ :

हिमालयाच्या प्रवासांत स्वामींना एक विलक्षण अनुभव आला. शरच्चन्द्र गुप्त आजारी पडले. त्यांची एके ठिकाणीं तात्पुरती व्यवस्था करून स्वामी पुढें निघाले. अरण्यांतून एकाकी परिभ्रमण सुरू झालें. रात्र किरकिरूं लागली. प्रचण्ड वृक्षांच्या सावल्या भुतासारख्या लांबच लांब पसरल्या होत्या. पायवाट सांपडली. स्वामी कांटेरी रान तुडवीत पुढें चालले. त्यांचे विचारही पुढें चालले होते. गुरुदेवांच्या आदेशाप्रमाणें आपल्या हातून कांहीं घडत नाहीं, मग जगण्यांत अर्थ काय ? या देहाचें रक्षण कशाकरतां करावयाचें ? भारताच्या सेवेला हा देह उपयोगी पडत नसेल तर हा विधेचा भार व्यर्थ नाहीं का ? असे विचार करीत असतांना त्यांनीं समोर पाहिलें तों त्यांना काय दिसलें ? दोन ठिणग्या एका प्रचण्ड वृक्षाच्या मागून पुढें येत होत्या. आकाशांतील कांहीं मेघ विरळ झाले. वीज चमकली आणि त्या प्रकाशानें काय दाखविलें ? पिवळें धमक शरीर, त्यावर राजचिन्हाप्रमाणें शोभणारे काळेभोर पट्टे, विक्राळ जबडा, अशा वैभवांत एक वाघ पुढें येत होता. झुलत्या आणि मंद पावलांत सामर्थ्याची जाणीव दिसत होती. तो वाघ स्वामींच्यापासून त्रीस पावलांवर उभा राहिला. स्वामी डोळ्यांच्या पापण्याही न हालवितां त्याच्याकडे पहात राहिले. स्वामी मनांत म्हणाले कीं हा देह भारतांतील बांधवांच्या यातना कमी करूं शकत नाहीं; मग निदान या देहामुळें वाघाची क्षुधा तरी शांत होवो. असें म्हणून स्वामींनीं रामकृष्णांचें चिंतन केलें. ते शांतपणानें त्या वाघाकडे पहात बसले. अर्धा तास झाला, पाऊण तास झाला. वाघानें थोडी हालचाल

केली. एक तास झाला. वाघ उजव्या बाजूला वळला आणि सावकाश निघून गेला. स्वामींनीं ती सबंध रात्र त्या जंगलांत परमात्मचिंतनांत काढली. सकाळीं त्यांचें मानसिक दौर्बल्य नाहींसें झालें. प्रेममय परमेश्वराचा त्यांना साक्षात्कार झाला. दुष्ट वृत्तीचा वाघ परत गेला. तो कां परत गेला ? स्वामींच्या शुद्ध अंतःकरणांत विश्वप्रेमाचा सागर हेलावत होता. त्या सागराच्या लाटा वाघाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन पोंचल्या. तो त्या वेळेपुरता निर्वैर झाला आणि आक्रमक पवित्रा बदलून निघून गेला. तुकाराममहाराज एका अभंगांत सांगतात कीं,

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती
व्याघ्रही न खाती सर्प तया ॥ १ ॥
विष तें अमृत आघात तें हित
अकर्तव्य नीत होत त्यासी ॥ २ ॥
दुःख तें देईल सर्व सुखफळ
होईल शीतळ अग्निज्वाळा ॥ ३ ॥
आवडेल जीवा जीवाचीये परी
सकळ अंतरीं एक भाव ॥ ४ ॥
तुका म्हणे कृपा केली नारायणें
जाणिजे तें येणें अनुभवें ॥ ५ ॥

## शिष्यप्रेम : ५४ :

स्वामी नरेन्द्र आणि शरच्चन्द्र हृषीकेशला पोंचले. शरच्चन्द्रांनीं आपल्या प्रवासाचें वर्णन असें केलें आहे कीं, “ हिमालयाच्या आस-पास हिंडत असतांना अन्नपाणी न मिळाल्यामुळें माझे प्राण व्याकुळ होत. अशा वेळीं स्वामी मला आपल्या खांद्यावरून नेत. एकदां

आम्हांला नदीपार व्हावयाचें होतें. पाण्याला ओढ अतिशय होती. आम्हांला एक घोडें मिळालें होतें. मी घोड्यावर बसलों आणि स्वामींनीं घोड्याचा लगाम धरून मला नदीपार उतरविलें. स्वामी म्हणजे मूर्तिमंत प्रेम! मी जेव्हां फार आजारी पडलों तेव्हां माझी धाबळी, छाट्या, इतकेंच नव्हे तर माझ्या खडावाही स्वामी आपल्या डोक्यावरून नेत." हृषीकेश येथें स्वामी व शरच्चन्द्र दोघेही आजारी पडले. शरच्चन्द्रानें संन्यास घेतल्यावर सदानंद हें नांव धारण केलें. सदानंद आणि स्वामी नरेन्द्र प्रकृति सुधारण्याकरतां कलकत्त्याजवळील बडानगर मठांत परत आले.

## भारताचें भविष्य : ५५ :

स्वामी नरेन्द्र परत आल्यावर मठांतील संन्याशांना अतिशय आनंद झाला. त्यांनीं उत्सव साजरा केला. स्वामींची प्रकृति हळू हळू सुधारूं लागली. दुपारच्या वेळीं आपल्या गुरुबंधूंना ते आपल्या प्रवासांतील अनुभव सांगत आणि भारताच्या भव्य भविष्याचा विश्वास प्रकट करीत. एके दिवशीं सूर्य अस्तास चालला होता. वटवृक्षाखालीं एका शिला-खंडावर स्वामी बसले होते. सभोंवतीं अनेक गुरुबंधू बसले होते. विरागी ऐश्वर्यानें विलसणाऱ्या त्या राजराजेश्वराकडे ते उत्सुक आदरानें पहात होते. स्वामींच्या मुखांतून अमृतवर्षाव चालू होता. त्या बोलण्याचा सारांश असा कीं, "वंश, धर्म, संस्कृति, भाषा आणि समान भूमि या पांच घटकांनीं आपलें राष्ट्रीयत्व सिद्ध होतें. अनेक प्रांत, पंथ आणि भाषा दिसल्या तरी त्यांत एकत्वाचा धागा आहे. आपलीं तीर्थक्षेत्रें सर्व प्रांतांत पसरलेलीं आहेत. आपला वैदिक धर्म संग्राहक आहे. भारतांत बाह्यत: भेद दिसला तरी तत्त्वत: अभेद आहे. राम आणि कृष्ण या विभूति आबालवृद्धांना माहीत आहेत. वीरांच्या कथा व्यास आणि वाल्मीकि या थोर कवींनीं सांगितल्या.

महाभारताच्या तोडीचें महाकाव्य जगाच्या इतिहासांत सांपडणार नाहीं. कीर्तीच्या आणि वैभवाच्या शिखराला पोंचलेल्या एका अत्यंत कार्यक्षम, सुनियंत्रित आणि सुधारलेल्या समाजाचें महाभारतांत दिव्य दर्शन होतें. या ग्रंथाचा कर्ता महामुनि व्यास ! याचा लेखक विद्याधिपति गणपति ! याच्या रचनेची जागा हिमालयांतील बदरीनारायणाचीं शिखरें ! पांच पाण्डव म्हणजे सृष्टिरचनेच्या अधिकारावरील पांच मुख्य देवतांचे मूर्तिमंत अवतार ! धर्मानें वागणाऱ्या धर्माला बारा वर्षे वनवास ! शिष्टाई आणि सारथ्य करणारा प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण ! घनघोर रणसंग्रामामध्यें शांति-ब्रह्माचा उपदेश ! अशा अलौकिक कथासूत्रांनीं हा काव्यपट विणला आहे. या काव्यांत प्रतिबिंबित झालेलें जीवन भारतानें प्रत्यक्ष अनुभवलें आहे. आज आपण निराशेच्या कांठाशीं उभे आहोंत. पण हा पहांटे-पूर्वीचा काळोख आहे. आपले प्रचारक भारतांत आणि भारताबाहेरही पाठविले पाहिजेत. आपल्याला जय मिळेल असें रामकृष्णांच्या उद्गारांवरून वाटतें. रामकृष्णांना समाधि अवस्थेमध्यें भारताच्या बाहेरील शिष्यांचे चेहेरे दिसत होते. समुद्रप्रवासानंतर ते शिष्य आपल्याला भेटतील. आपल्या वैदिक तत्त्वज्ञानानें आपण विजयी होऊं. शापादपि शरादपि अशा सामर्थ्यानें समृद्ध झालेला भारत याच देहीं याच डोळां पहाण्याचा प्रयत्न करूं. रामकृष्णांच्या रूपानें आध्यात्मिक सूर्याचा उदय झाला. त्या प्रकाशांत पुढें चला. जागृत झालेल्या वंशचैतन्याच्या हांकेला ओ द्या. राष्ट्रीयत्वाची जाणीव उफाळून वर येऊं द्या. रोगीनारायणाची आणि दरिद्रीनारायणाची शिवस्वरूपांत सेवा करा म्हणजे तुमच्या आध्यात्मिक तेजाच्या प्रभावानें दशदिशा उजळून जातील. सावधान ! ती पहा आपल्या पुनरुज्जीवनाची प्रभात दिसूं लागली आहे. ''

## पवहारी बाबा : ५६ :

मठांतील कांहीं महंत हिंदुस्थान पहाण्याकरतां दाही दिशांनीं प्रवास करूं लागले. स्वामी नरेन्द्र यांनीं गाझीपूर येथें पव्हहारी बाबा म्हणून एक योगी रहातात असें ऐकलें. त्यांना भेटण्याकरतां स्वामी निघाले. तेथें पोंचल्यावर लगेच भेट झाली नाहीं. गांवाजवळ एक नदी होती. त्या नदीकांठीं एक गुहा होती. बाबा तेथें ध्यानमग्न असत. बाबांनीं वेदांचा अभ्यास केला. चारीं धामांच्या यात्रा केल्या. गिरनार पर्वतावर अवधूतांचें दर्शन घेतलें. काशीला एका योग्याजवळून अद्वैताचा उपदेश घेतला. बाबा लंगोटी नेसत. थंडी वाजल्यास अंगाला राख फाशीत. रघुपतीच्या मूर्तीची पूजा करीत. देवाचीं उपकरणीं तितक्याच तन्मयतेनें घाशीत. साध्याइतकेंच साधनाला महत्त्व आहे असें त्यांना वाटे. त्यांची वृत्ति निर्वैर झाली होती. एकदां रात्र झाली. बाबा गुहेंत ध्यानास बसले. एक चोर आला. त्यानें इकडे तिकडे पाहिलें. त्याला उपकरणीं सांपडलीं. त्यानें गाठोडें बांधलें. इतक्यांत बाबांचें ध्यान संपलें. त्यांनीं चोराकडे पाहिलें. चोर हातांतील गाठोडें टाकून पळत सुटला. बाबांनीं तें गाठोडें घेतलें. धावत धावत त्या चोराला गांठलें. ते त्याच्या पायां पडले आणि म्हणाले, " हें गाठोडें घे. याची तुला जरूर आहे. तुझ्या कार्यांत मीं व्यत्यय आणला याबद्दल क्षमा कर. " त्या चोराला आश्चर्यांत टाकून बाबाजी गुहेकडे परत आले. दुसऱ्या एका प्रसंगीं त्यांचें विश्वप्रेम असेंच प्रकट झालें. अमावास्येची रात्र होती. बाबाजी गुहेबाहेर आले. एक नाग सळसळत चालला होता. बाबाजींचा पाय त्याच्या शेपटीवर पडला. नाग फणा काढून उलटला. त्यानें कडकडून दंश केला आणि तो आपल्या वारुळांत निघून गेला. बाबा 'रघुपति, रघुपति' असें नामस्मरण करीत बेशुद्ध पडले. सकाळ झाली. कांहीं भक्त तेथें आले. बाबा सावध झाले,

आणि म्हणाले, " रघुपतिचा प्रेममय दूत मला भेटण्याकरतां आला होता. मीं त्याला सांगितलें कीं मी कांहीं दिवसांनीं आपल्या भेटीस येतों. "

याच वेळीं स्वामी नरेन्द्र बाबाजींच्या भेटीला गेले. स्वामींच्या मनांत संदेह उत्पन्न झाला होता. त्यांना वाटूं लागलें कीं रामकृष्णांच्या पेक्षां बाबा श्रेष्ठ आहेत. स्वामींनीं बाबांची भेट घेतली. बराच वेळ बाबा एक शब्दही बोलेनात. जवळच्या एका भक्तानें सांगितलें कीं, " बाबा, हे आलेले स्वामी रामकृष्णांचे शिष्य आहेत. " हे शब्द ऐकल्याबरोबर बाबांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. बाबांनीं स्वामींना नमस्कार केला. बाबांनीं स्वामींच्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. त्यांच्या मुखांतून ज्ञानगंगेचे लोट वाहूं लागले. " सिद्ध प्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे । सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें । " असा अनुभव स्वामींना आला. कांहीं वेळानें बाबांनीं एक पोथी बाहेर काढली. त्या पोथीच्या खालीं एक तजबीर होती. ती तजबीर हातांत घेऊन बाबा म्हणाले, " या तजबिरीची मी पूजा करीत असतों. माझा रघुपति भूलोकामध्यें या रूपानें पुन्हां आला होता. " स्वामी नरेन्द्रांनीं त्या तजबिरीकडे पाहिलें. भक्तिभावानें वंदन केलें. संदेह नष्ट झाला. त्या तजबिरीमध्यें भगवान् रामकृष्ण परमहंस ध्यानस्थ बसले होते. नरेन्द्रांनीं बाबांचा निरोप घेतला. ते पुढील यात्रेला निघून गेले.

इकडे बाबांची उग्र तपश्चर्या सुरू झाली. ते गुहेंतच महिनेच्या महिने राहूं लागले. त्यांना एकच डोळा होता. तोंही यज्ञधूमामुळें लाल झालेला दिसे. बाबांनीं आहार कमी केला. ते लिंबाचा पाला आणि तीन चार मिरच्या यांवर निर्वाह करूं लागले. लोक म्हणत बाबा पवनाचा आहार करतात. म्हणून भाविक लोक त्यांना पवन आहारी म्हणजे पवहारी

बाबा असें म्हणूं लागले. बाबा तपश्चर्येनें वाळून गेले. गुहेंतून बाहेर येईनात. फक्त होमाचा धूर वर येई आणि लोक त्या यज्ञधूमाला नमस्कार करीत. एकदां दुपार झाली. लोक दर्शनाकरतां जमले. यज्ञधूमाचे लोटच्या लोट बाहेर येऊं लागले. भक्तांना चिंता वाटूं कीं पवहारी बाबा या धुरांत गुदमरणार तर नाहींत ना? कांहीं वेळानें मांस जळाल्याची घाण आली. भक्तांनीं गुहेचें दार फोडलें. त्यांना काय दिसलें? होमकुंड धडधडत आहे आणि पवहारी बाबांनीं आपल्या नश्वर देहाची आहुति अग्निदेवाला अर्पण केली आहे.

१८९० साल सुरू झालें. स्वामी प्रवासाला निघाले. त्यांनीं रामकृष्णांच्या पत्नी शारदादेवी यांचा आशीर्वाद घेतला. मठांतून निघतांना स्वामी आपल्या गुरुबंधूंना म्हणाले, "माझ्या केवळ स्पर्शानें मनुष्याच्या चित्तवृत्ति बदलून जाऊन त्या परमार्थपर होतील अशा प्रकारचें दिव्य सामर्थ्य अंगीं बाणवून घेतल्याशिवाय मी मठांत परत येणार नाहीं."

## अद्‌भुत गायन : ५७ :

कलकत्त्याहून लहान सहान गांवें पहात स्वामी भागलपूर येथें पोंचले. तेथील प्रसिद्ध वकील चौधरी त्यांना भेटावयास गेले. स्वामींची चालण्याची ढब एखाद्या राजपुत्राप्रमाणें होती. त्यांचें भिक्षा मागणें भिकाऱ्याचा वेश घेतलेल्या राजाप्रमाणें होतें. अंतःकरणांत उसळणाऱ्या आनंदाच्या लहरींचें प्रतिबिंब स्वामींच्या मुखावर विलसत होतें. एक कौपीन, दण्ड आणि कमंडलू हेंच त्यांचें ऐश्वर्य. त्यांच्या डोळ्यांत असें विलक्षण तेज होतें कीं त्या तेजावरून जेथें मागल्या बाजूला कित्येक कोसपर्यंत निबिड अरण्य पसरलेलें आहे, वर आकाशाचें छत्र आहे, आणि सुखदुःखाच्या गोष्टी सांगणारा जोराचा सरित्प्रवाह आहे, अशा

निर्जन प्रदेशांत आत्म्याच्या एकान्तांत त्यांनीं कित्येक दिवस घालविले असावेत असें चौधरी यांना वाटूं लागलें. चौधरी यांनीं योगाभ्यासांतील कांहीं शंका विचारल्या. स्वामींनीं त्यांचें समाधान केलें. चौधरी स्वामींना घेऊन घरीं गेले. सकाळच्या वेळीं स्वामींनीं एक स्तोत्र म्हटलें. त्यांचा आवाज ऐकून चौधरी म्हणाले, " आपलें गायनही अपूर्व आहे. आज मी गांवांतील प्रसिद्ध गवई बोलावतों. आपण कृपा करून हीं भक्ति-रसाचीं गाणीं आम्हांला ऐकवा. " दुसऱ्या दिवशीं गांवांतील उत्तमोत्तम गवई तेथें जमले. कैलासबाबूंनीं पेटी हातांत घेतली. एका नांवाजलेल्या तबलजीनें तबल्यावर थाप टाकली. स्वामींनीं तंबोरा हातांत घेतला आणि जगन्मातेला उद्देशून पदें म्हणण्यास आरंभ केला. संध्याकाळचे सात वाजले होते. थोड्या वेळानें मंडळी आपापल्या घरीं जेवणास जाणार होती. नऊ वाजले. समाज तल्लीन होऊन ऐकत होता. दहा वाजले. घरोघरचे लोक चौधरींच्या घरीं आपापल्या नातलगांना बोलावण्यास आले. तेही बोलावणें करण्याचें विसरले. तेथेंच ऐकत राहिले. बारा वाजले. एक वाजला. दोन वाजले. स्वामी गात होते. शेवटीं त्यांनीं एक गोपींचें विरहगीत सुरू केलें. त्या गाण्यांतील आर्तता आणि कातरता श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोंचली. स्वामी गात असतांना हातवारे करीत नव्हते. त्यांच्या मुखाची हालचाल होत नव्हती. लक्ष पदांतील अर्थाकडे होतें, श्रीकृष्णाकडे होतें. आपण घरांतला रेडिओ विशिष्ट पातळींत लावला म्हणजे आपल्याला परदेशांतील गाणें ऐकूं येतें. स्वामींच्या आवाजाची पातळी ( wave length ) गंधर्वलोकाला जोडलेली होती. त्या गायनाच्या मोहिनीमुळें श्रोते मंत्रमुग्ध झाले. पेटीवाल्याचीं बोटें आखडून गेलीं. तबलजी दमून गेला. तीन वाजले. स्वामींनीं तंबोरा खालीं ठेवला. सर्व श्रोत्यांनीं अद्भुत गायकाला नमस्कार केला.

## फकिरानें प्राण वांचविले : ५८ :

दुसऱ्या दिवशीं स्वामींनीं जैन पंडितांशीं चर्चा केली. जैन धर्म आणि बौद्ध धर्म हे वैदिक धर्माचे भाग आहेत असें सिद्ध केलें. भागलपुराहून वैद्यनाथाकडे गेले. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं काशीला प्रयाण केलें. तेथून अयोध्या, नैनीताल, बदरिकाश्रम या ठिकाणची लोकस्थिति त्यांनीं अवलोकन केली. तेथून भिक्षेवर निर्वाह करीत स्वामी आलमोऱ्याला निघाले. वाटेंत थकून गेले. एका कबरस्थानाजवळ थांबले. स्वामींचे प्राण भुकेनें व्याकुळ झाले होते. अखंडानंद पाणी आणावयास गेला. कबरेजवळ फकीर रहात होता. त्याच्याजवळ एक काकडी होती. ती त्यानें स्वामींच्यापुढें ठेवली. स्वामी म्हणाले, “भाई, या काकडीच्या लहान फोडी करून माझ्या तोंडांत घाल.” तो फकीर म्हणाला, “महाराज, मी मुसलमान आहें.” स्वामी म्हणाले, “कांहीं हरकत नाहीं. आपण एकाच देवाचीं लेंकरें आहोंत.” फकिरानें काकडीच्या फोडी करून स्वामींना खाऊं घातल्या. स्वामींना हुशारी आली. त्या फकिराला नमस्कार करून स्वामी आलमोऱ्यास गेले. त्या ठिकाणीं बदरीसहाय यांच्या घरीं उतरले. तेथें लोकांची गर्दी जमूं लागली. एक चिंताग्रस्त मनुष्य आला आणि म्हणाला, “महाराज, माझ्या घरीं चला. माझा एक नातलग तापानें फणफणत आहे. त्याला भुतानें पछाडलें आहे.” स्वामींनीं प्रथम नकार दिला; पण फार आग्रह केल्यावर ते तेथें गेले. एक रोगी तळमळत होता. ताप १०३ पर्यंत चढला होता. समोर एक मांत्रिक तांदूळ, हळद-कुंकू, लिंबू इत्यादि वस्तू घेऊन भूत काढण्याचे मंत्र म्हणत होता. स्वामी पुढें गेले. रोग्याजवळ बसले. त्यांनीं सर्व सामर्थ्य एकवटून आपला वरदहस्त त्या रोग्याचे मस्तकावर ठेवला. इष्ट देवतेचें स्मरण केलें. रोग्याचा ताप हळू हळू

उतरूं लागला; रोगी उठून बसला. त्यानें स्वामींच्या पायांवर डोकें ठेवलें.

याच वेळीं स्वामींची एक बहीण हाल हाल होऊन मरण पावल्याची तार आली. स्वामींचें अंतःकरण दुःखानें करपून गेलें. कौटुंबिक धर्म आणि संन्याशाचा राष्ट्रीय धर्म यांत मन हेलकावे खाऊं लागलें. शेवटीं भगिनीप्रेमाचें मातृभूमिप्रेमांत रूपांतर झालें. भारतांतील स्त्रियांच्या उन्नतीकरतां आपल्याला काय करतां येईल याचा विचार सुरू झाला.

## तीव्र तपश्चर्या : ५९ :

तीन गुरुबंधूंना बरोबर घेऊन स्वामी कर्णप्रयाग येथें आले. येथें स्वामींना सडकून ताप आला. तीन दिवसांनीं रुद्रप्रयाग येथें पोंचले. पुढें केदारबद्री आणि गणेशप्रयाग या क्षेत्रांचा प्रवास सुरू झाला. वाटेंत एका गुहेमध्यें राहून स्वामींनीं एकान्तांत परमेश्वराचें चिंतन केलें. नंतर 'आपल्या कष्टी बांधवांच्याकरतां पुढें चला' अशी आंतून प्रेरणा झाली. स्वामी गुहेच्या अंधारांतून बाहेर आले. एका पर्वताच्या शिखरावर चढले. त्यांनीं भारताच्या परिस्थितीचें विहंगमदृष्टया निरीक्षण केलें अंगांतील भगवी कफनी वाऱ्यानें उडत होती. एका हातांत दण्ड आणि दुसऱ्या हातांत कमंडलू शोभत होता. भोंवतालच्या प्रदेशाचें निरीक्षण करतां करतां त्यांची दृष्टि अनंतत्वाच्या ठिकाणीं स्थिर झाली. भारताची उद्वेगकारक सद्यःस्थिति त्यांनीं पाहिली. डोळ्यांत अश्रू आले. थोड्या वेळानें कालीमाता त्यांच्यापुढें उभी राहिली. रामकृष्णांची मूर्ति त्यांच्या हृदयांत विराजमान झाली. भारताचा उज्ज्वल भविष्यकाल त्यांना दिसूं लागला. मन प्रफुल्लित झालें. आनंदाच्या लहरी वाहत असतांना स्वामी नरेन्द्र पुढील मार्ग आक्रमूं लागले. टिहिरी, मसुरी, राजपूर हीं ठिकाणें पहात

पुन्हां हृषीकेश येथें आले. तेथील गंगेचें पाणी स्फटिकाप्रमाणें शुभ्र होतें. तेथील वातावरण सर्वात्मभावानें भरून गेलें होतें. अन्न घालणाऱ्या हातांतून तेथील मासे अन्न घेऊन जात. तेथील पक्षी साधूंच्या पर्णकुटींत शिरून त्यांच्या हातांतून भाकरीचे तुकडे नेत. त्याच ठिकाणीं व्यासांचा आश्रम होता असें सांगतात. त्या ठिकाणीं चंडेश्वर महादेवाचें एक देऊळ आहे. त्या देवळाजवळ स्वामींनीं एक पर्णकुटी बांधली. उग्र तपश्चर्येला आरंभ केला. सकाळीं उठल्यावर सर्वेश्वराचें स्मरण करीत मुखमार्जन करावें, गंगेंत आंघोळ करावी, धुमी पेटवून ध्यानास बसावें, पांच घरीं भिक्षा मागावी, दुपारीं दोन वाजतां भोजन करावें, पुन्हां ध्यान धरणेस रात्र होईपर्यंत बसावें. याप्रमाणें क्रम सुरू झाला. सोळा सोळा तास ध्यानांत घालविल्यावर स्वामींचा देह सुकून गेला. मन बलवान् झालें पण शरीर शुष्क झालें. स्वामी आजारी पडले. ताप वाढत गेला. एके दिवशीं रात्रीं त्यांच्या घशाला कोरड पडली. सबंध अंगावर घाम निथळूं लागला. गुरुबंधू घाबरून गेले. स्वामींचें शरीर गार पडत चाललें. नाडी हाताला लागेना. गुरुबंधूंनीं प्रार्थना केली कीं, "देवा, आमचें आयुष्य आमच्या पुढाऱ्याला दे." अशी प्रार्थना चालू असतांना पर्णकुटीच्या बाहेर पावलांचा आवाज ऐकूं आला. गुरुबंधू बाहेर आले. तेथें एक साधू उभा होता. कमरेला छाटी, पायांत खडावा, हातांत बटवा, जटेंत चांदीचा चंद्र, अशा त्या साधूला पाहून गुरुबंधूंना आनंद झाला. तो साधू आंत आला. त्यानें स्वामी नरेन्द्रांची प्रकृति पाहिली, बटवींतून मध बाहेर काढला, त्यांत एका पुडींतील औषध घातलें, चाटण तयार केलें आणि स्वामींच्या तोंडांत घातलें. औषधाच्या दोन पुड्या देऊन तो साधू निघून गेला. कांहीं वेळानें स्वामींनीं डोळे उघडले. एका गुरुबंधूनें आपला कान त्यांच्या तोंडाजवळ नेला. स्वामी क्षीण आवाजांत म्हणाले, "मित्रांनो, घाबरूं नका. मला एक स्वप्न

पडलें. त्या स्वप्नांत एक दिव्य पुरुष दिसला. तो मला म्हणाला, " तुला या जगांत महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे. ती कामगिरी झाल्याशिवाय तुझ्या मनाला शांति मिळणार नाहीं."

## एक मुक्त योगी : ६० :

स्वामी मीरतकडे निघाले. ते गुरुबंधूंना म्हणाले, " तुम्ही आपल्या मार्गानें जा. तुम्हांला आपल्या पायांवर उभें रहातां आलें पाहिजे. मी एकटा प्रवास करणार." पुढें स्वामींनीं एक अनुभव सांगितला. ते म्हणाले, " मला कांहीं मुक्त असलेले तपस्वी आढळले. एक तपस्वी माझ्या चांगलाच लक्षांत आहे. तो वेड्यासारखा दिसे. एकदां तो दिगंबर वेषानें रस्त्यांतून चालला होता. रस्त्यांतील मुलें त्याच्या पाठीस लागलीं. त्यांनीं रस्त्यांतील दगड उचलले. त्याच्या अंगावर फेकले. तो तपस्वी रक्तबंबाळ झाला. मानेवरून रक्ताचे ओघळ चाललें होते. त्याला त्याची पर्वा नव्हती. त्याला आंतून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. मीं त्याचा हात धरला. त्याला झोपडींत नेलें. त्याच्या जखमा धुतल्या. चिंधी जाळून ती राख त्याच्या जखमांना लावली. तो तपस्वी अद्वैताच्या आनंदांत निमग्न होता. तो म्हणाला, " ते दगड मारणारे मुलगे आणि मी कशी मजा मारीत होतों. त्या प्रेममय परमेश्वराच्या या सर्व लीला आहेत." स्वामी पुढें म्हणाले, " गुरुबंधूंनो, अशी उग्र तपश्चर्या करण्याकरितां मी एकटा यात्रेला जाणार."

स्वामी मीरतला पोंचले. तेथून दिल्लीला गेले. मोंगल बादशहांचीं कबरस्थानें त्यांनीं पाहिलीं. त्या वेळीं त्यांच्या अंतर्दृष्टीला वाटलें कीं हें ऐहिक वैभव क्षणभंगुर आहे. आत्म्याचें ऐश्वर्य अनुपमेय आहे. हे ऐतिहासिक पुरुष आले आणि गेले. त्या इतिहासाचीं सूत्रें ज्याच्या हातांत आहेत त्या जगत्सूत्रधाराचें चिंतन करणें हें आपलें कर्तव्य होय.

## हलवायाला पडलेलें स्वप्न : ६१ :

दिल्लीहून स्वामींनीं राजपुतान्याकडे मोर्चा वळवला. उन्हाळ्याचे दिवस होते. वाळवंटांतून प्रवास चाललेला. स्वामींच्याजवळ फक्त तिसऱ्या वर्गाचें तिकीट होतें. कमंडलू सुद्धां नव्हता. अकरा वाजले. एका स्टेशन-वर गाडी उभी राहिली. एक बनिया आंत आला. पांढऱ्या जटा विंचर-लेल्या, रेशीमकांठी धोतर, हरदासी अंगरखा, चढाव, हळदी रंगाची पगडी, हातांत सोन्याचीं कडीं अशा थाटांत तो तुंदिलतनु व्यापारी बांकावर बसला. त्याचें सामान आंत आलें. गार पाण्याचा खुजा, मेवा-मिठाईचा डबा आणि कापडाचे गठ्ठे. शेवटीं तोंडभर बुरखा घेतलेली आणि डाव्या हाताची कमान कपाळावर धरून किलकिलें पहाणारी शेटजींची पत्नी आपला घेरदार लहंगा सावरीत आंत आली, शेटजींच्या पायांजवळ बसली आणि त्यांचें चरणसंवाहन करूं लागली.

स्वामींनीं खिडकींतून पाणी मागितलें; पण जे लोक पैसा देत त्यांना पाणीवाला पाणी देई. गाडी चालू झाली. स्वामींना भूक लागली होती. तहान लागली होती. जवळच तो बनिया मेवामिठाई खाऊं लागला. नंतर खुजांतील गार पाणी पितांना तो म्हणाला, " अहो संन्यासीबुवा, कांहीं उद्योग करा. फुकट भीक कां मागतां? उद्योग केल्यावर मग मेवामिठाई व गार पाणी मिळतें." स्वामी नरेन्द्रांनीं हें बोलणें शांतपणें ऐकून घेतलें. इतक्यांत स्टेशन आलें. स्वामी खालीं उतरले. त्यांनीं इंजिनकडे पाहिलें तर एक पोक्त मनुष्य प्रत्येक डबा तपाशीत चालला होता. त्याचे पाय भाजत होते. एका हातांत पाण्याचा खुजा होता. दुसऱ्या हातांत एक थाळी होती. त्या थाळींत गरम पुऱ्या, भाजी व मेवामिठाई ठेवलेली होती. तो मनुष्य पाहात पाहात स्वामींच्याजवळ आला. त्यानें स्वामींच्याकडे निरखून पाहिलें. थाळी त्यांच्यापुढें ठेवली.

साष्टांग नमस्कार घातला आणि म्हणाला, " स्वामी, आपण भोजन करा." स्वामी म्हणाले, " माझी येथें ओळख नाहीं. आपली कांहींतरी चूक होते आहे. मी ही मिठाई खाणार नाहीं. " हें संभाषण तो श्रीमंत बनिया ऐकत होता. तो पोक्त मनुष्य म्हणाला, " स्वामी, मी एक हलवाई आहें. मी रामाचा भक्त आहें. मीं रामाला नैवेद्य दाखवला व भोजन केलें. नंतर झोपीं गेलों. त्या झोपेंत मला स्वप्न पडलें. एक आगगाडीचा डबा होता. त्या डब्याजवळ तुमच्यासारख्या चेहेऱ्याचा एक संन्यासी बेशुद्ध पडला होता. इतक्यांत श्रीरामचंद्र तेथें प्रकट झाले आणि मला म्हणाले, ' हे स्वामी उपाशी आहेत. तहानेनें व्याकुळ झाले आहेत. ताजे पदार्थ कर. स्टेशनवर जा. त्यांना जेऊं घाल. त्यांचा अंतरात्मा तृप्त झाला म्हणजे तूं दाखविलेला नैवेद्य मला पोंचेल. ' मी रामचन्द्रांना नमस्कार करण्याकरतां पुढें वांकलों. इतक्यांत जागा झालों. हें कांहींतरी स्वप्न आहे असें समजून पुन्हां झोपीं गेलों. पुन्हां तेंच स्वप्न पडलें. मग जागा झालों. पुऱ्या तळल्या. भाजी केली. मिठाई तयार होतीच. हें सर्व घेऊन येथें आलों. स्वप्नांत मला जे स्वामी दिसले तेच आपण आहांत. महाराज, आपण भोजन करा. " स्वामी नरेन्द्रांनीं दाशरथी रामाला नमस्कार केला आणि भोजनास सुरवात केली. हा अद्‌भुत प्रकार पहात असलेल्या बनियानें स्वामींच्या पायांवर डोकें ठेवलें.

## चोर संन्यासी झाला : ६२ :

याच प्रवासांत स्वामींना एक संन्यासी भेटला. त्याच्या तेजस्वी मुखावर उग्रपणाची झाक दिसत होती. दोघांचें नामस्मरण, योग, अद्वैत या विषयांवर संभाषण सुरू झालें. होतां होतां पतित, वेश्या, चोर यांबद्दल बोलणें निघालें. तो संन्यासी कातर आवाजांत बोलूं लागला. तो म्हणाला, " स्वामी, तुम्हांला पवहारी बाबा माहीत आहेत का ? त्यांच्या

गुहेंत चोर शिरला. रात्रीची वेळ होती. बाबा जागे झाले. चोर गाठोडें टाकून पळाला. बाबा गाठोडें घेऊन त्याच्यामागें धांवले. बाबा चोराच्या पायां पडले. ” स्वामी म्हणाले, “ बाबांनीं अद्वैत अनुभविलें होतें. सैतान आणि साधु यांमध्यें त्यांना फरक दिसत नव्हता. ” संन्यासी म्हणाला, “ पण स्वामीमहाराज, त्या चोराचें पुढें काय झालें हें तुम्हांला माहीत आहे काय ? तो चोर सन्मार्गाला लागला. पवहारी बाबांच्या उपदेशानें पावन झालेला तो चोरच सध्यां आपल्याशीं बोलत आहे. ” हें बोलणें ऐकून स्वामी आश्चर्यचकित झाले. नंतर त्यांच्या लक्षांत आलें कीं आजचा सैतान हा उद्यांचा साधु आहे-- Saints have past and sinners have future.

## सहा भावांत एक बायको : ६३ :

पुढील प्रवासांत एका तिबेटी कुटुंबांत राहण्याचा स्वामींना प्रसंग आला. त्या कुटुंबांत सहा भाऊ होते. त्या कुटुंबाच्या थोरल्या भावानें त्यांचें स्वागत केलें. दुपारीं सात पानें मांडलीं. स्वामी जेवावयास बसल्यावर ते साहीजण जेवावयास बसले. मध्यम वयाची एकच स्त्री वाढीत होती. जेवतांना स्वामींनीं मुलांबाळांची चौकशी केली आणि थोरल्या भावाला सहज विचारलें, “ आपल्या सर्व भावांचीं लग्नें झालीं आहेत का ? ” थोरला भाऊ म्हणाला, “ स्वामी, सर्वांचीं लग्नें झालीं आहेत. आम्हां सहाही जणांत एकच बायको आहे.” हें ऐकून स्वामींना धक्का बसला. त्यांनीं बहुभर्तृत्वाच्या चालीचा कडक निषेध केला. तो निषेध ऐकून थोरला भाऊ संतापला आणि म्हणाला, “ स्वामी, तुम्हीं स्वतःला साधु म्हणवितां आणि दुसऱ्याला आप्पलपोटेपणाच्या गोष्टी शिकवितां हें कसें काय ? इतर पदार्थांप्रमाणेंच आम्हीं बायकोची सुद्धां समाईकपणानें वांटणी केली आहे.” ‘ तुमची विचारसरणी तर्कशास्त्राच्या

दृष्टीनें सदोष आहे ' असें स्वामींना दाखवितां आलें असतें; पण त्या भावांचा सरळपणा पाहून स्वामी इतकेंच म्हणाले, " प्रत्येक प्रश्नाला दुसरी बाजू असतेच." या प्रसंगामुळें स्मामींची जगाकडे पहाण्याची दृष्टि बदलली. कोणत्याही राष्ट्रांतील, प्रांतांतील किंवा समाजांतील राहाणीकडे, नीतिमत्तेकडे आणि चालीरीतीकडे त्या समाजांतील लोकांच्या दृष्टीनें पहाण्याचा प्रयत्न केला पाहिजे हें स्वामींच्या लक्षांत आलें.

## मुसलमानाच्या घरीं भोजन घेतलें : ६४ :

१८९१ साल सुरू झालें होतें. स्वामी अलवारला पोंचले. दवाखान्यावरील अधिकारी गुरुचरण यांनीं त्यांना उतरण्यास जागा दिली. गुरुचरणबाबूंचा एक विद्वान् मौलवी मित्र होता. तोही स्वामींना भेटण्यास आला. कुराणाबद्दल बोलणें सुरू झालें. थोड्याच वेळांत मौलवीची खात्री झाली कीं या हिंदु संन्याशाला आपल्यापेक्षां कुराणाची अधिक माहिती आहे. स्वामी म्हणाले, " कुराणासंबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. गेल्या बाराशें वर्षांत कुराणाचें मूळचें शुद्ध स्वरूप अद्याप जसेंच्या तसें कायम आहे." मौलवी घरीं गेले. दुसऱ्या दिवसापासून हिंदूंबरोबर मुसलमानांचीही स्वामींच्या दर्शनाकरितां गर्दी होऊं लागली. बायबल, कुराण आणि पुराण यांच्या आधारानें स्वामींचीं प्रवचनें सुरू झालीं.

प्रवचन चालू असतांना एकानें विचारलें, " महाराज, आपला देह कोणत्या जातींत जन्माला आला आहे ? " यत्किंचितही न संतापतां स्वामींनीं उत्तर दिलें, " हा देह कायस्थाच्या कुलांत जन्माला आला आहे. " विश्वामित्राप्रमाणें स्वामी हे ब्रह्मर्षि या पदवीकडे चालले होते.

एक दिवस प्रवचन संपल्यावर एक मौलवी स्वामींच्यापुढें आले आणि म्हणाले, " महाराज, आपण माझ्या घरीं उद्यां पुढील यावें. आपण आल्यानें या मुसलमानाला आपलें जीवन कृतार्थ झालें असें वाटेल."

स्वामी मुक्त पुरुष होते. ते जातिभेद मानीत नव्हते. त्यांनीं भोजनाचें आमंत्रण स्वीकारलें. दुसरे दिवशीं त्या मौलवीनें ब्राह्मण बोलावले. दिवाणखाना सारवला. ब्राह्मणांनींच सर्व शिधा व भाजी आणली. सोवळें नेसून सैंपाक केला. स्वामी भोजनास आले. मौलवी व त्यांचे मित्र हात जोडून लांब उभे राहिले. ब्राह्मणांनीं वाढलें, मौलवीनें दिलेला हार स्वामींनीं गळ्यांत घातला. जेवण होईपर्यंत मौलवी हात जोडून उभा होता.

## राजेसाहेबांच्या फोटोवर थुंका : ६५ :

अलवारचे दिवाण रामचन्द्रजी हें स्वामींना भेटण्यास आले. भेट झाल्यावर त्यांच्या मनांत आलें कीं, "आपल्या संस्थानचे महाराज मंगलसिंहजी हे पाश्चिमात्य पद्धतीनें राहतात. राज्याकडे त्यांचें लक्ष नाहीं. देवाची पूजा करीत नाहींत. स्वामींची व त्यांची भेट झाली तर त्यांच्या स्वभावांत बदल होईल." हा विचार मनांत आल्यावर दिवाण राजवाड्यांत गेले, राजेसाहेबांना स्वामींची माहिती सांगितली व त्यांना भेटण्यास येण्याची विनंति केली. राजेसाहेबांनीं मानेला किंचित् हेलकावा देऊन विनंति मान्य केली. दुसरे दिवशीं सकाळचे दहा वाजले. दिवाणांचा दिवाणखाना सुशोभित केला होता. मध्यभागीं राजेसाहेबांचा फोटो होता. स्वामी आले. दिवाणसाहेबांनीं त्यांना एका उच्च आसनावर बसविलें. नंतर महाराज मंगलसिंहजी आले. त्यांनीं स्वामींना नमस्कार केला. अनेक दरबारी आणि हुजरे मुजरे करून उभे राहिले. स्वामी आणि राजेसाहेब यांचें बोलणें सुरू झालें. राजेसाहेब म्हणाले, "स्वामी, आपण जाडे विद्वान् आहांत. आपण उद्योग केल्यास हजार रुपये महिना मिळवाल. असें असतां हा भिकाऱ्याचा वेष कां धारण केला?" स्वामींनीं उत्तर म्हणून एक मर्मभेदक प्रश्न विचारला, "आपण आपला

राज्यकारभार न पहातां गोऱ्या पाहुण्यांबरोबर शिकार करण्यांत वेळ घालवतां याचें कारण काय ? " दरबारी लोक स्तंभित झाले. पण राजेसाहेबांना राग आला नाहीं. त्यांनीं दुसरा प्रश्न विचारला, " स्वामी-महाराज, माझा मूर्तिपूजेवर विश्वास नाहीं. दगडाच्या मूर्तीची मी पूजा करीत नाहीं. पुढील जन्मीं मी अधोगतीला जाईन काय ? " दिवाणजी पाहूं लागले कीं मूर्तिपूजक स्वामी आतां काय उत्तर देतात. स्वामींनीं सभोंवतीं पाहिलें. राजेसाहेबांचा फोटो त्यांच्या दृष्टीस पडला. त्यांनीं दिवाणजींना प्रश्न केला, " दिवाणजी, हा फोटो कोणाचा आहे ? " दिवाणजींनीं उत्तर दिलें, " आमच्या राजेसाहेबांचा. " स्वामी म्हणाले, " दिवाणजी, या तजबिरीवर थुंका. " हें ऐकतांच राजेसाहेबांच्या कपाळावर आंठ्या दिसूं लागल्या. दरबारी लोक भीतीनें कांपूं लागले. स्वामी पुन्हां म्हणाले, " दिवाणजी, हा फोटो म्हणजे कागदाचा कपटा नव्हे काय ? याच्यावर थुंकणें तुम्हांला इतकें अवघड कां वाटतें ? " दिवाणजी कांपऱ्या आवाजांत म्हणाले, " स्वामी, आपण हें काय सांगतां ? हा फोटो आमच्या राजेसाहेबांचा आहे. " स्वामी म्हणाले, " पण या फोटोंत महाराजांचें रक्त, मांस इत्यादि सप्तधातु आहेत काय ? हा फोटो बोलत नाहीं, चालत नाहीं. तरी सुद्धां या फोटोवर थुंकणें तुम्हांला जड वाटतें. याचें कारण या तजबिरींत तुम्हांला राजेसाहेब दिसतात. या कागदाच्या कपट्यांत तुम्हांला राजेसाहेब दिसतात. या फोटोवर थुंकणें म्हणजे राजेसाहेबांचा अपमान करणें अशी तुमची भावना आहे. " हे शब्द ऐकून दिवाणजींच्या जिवांत जीव आला. नंतर स्वामी राजेसाहेबांना म्हणाले, " तुमच्या फोटोबद्दल दिवाणजींना आदर वाटतो त्याचप्रमाणें भक्ताला दगडाच्या मूर्तीबद्दल आदर वाटतो. पूजा करतांना भक्त असें म्हणतो का, कीं हे दगडा, मी तुझी पूजा करतों. तो भक्त

मूर्तीच्या ठिकाणीं परमेश्वराची भावना ठेवून पूजा करतो." हें भाषण राजेसाहेब लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांच्या रागाचें भक्तीमध्यें रूपान्तर झालें होतें. ते हात जोडून म्हणाले, "स्वामीमहाराज, आज मला मूर्ति-पूजेचें रहस्य समजलें. महाराज, मजवर कृपा असावी." स्वामी म्हणाले, "कृपानिधि परमेश्वराशिवाय अन्य कोण कृपा करणार? त्या दयाघनाला अनन्यभावानें शरण जा म्हणजे तो दयेची वृष्टि करील."

अलवार तेथील शाळेंतील विद्यार्थी व इतर तरुण स्वामींच्याकडे संस्कृत शिकण्यास येऊं लागले. त्यांना संस्कृत भाषेच्या अध्ययनाचें महत्त्व सांगतांना स्वामी म्हणाले, "आपला इतिहास इंग्रजांनीं लिहिला त्यामुळें आपलीं मनें दुबळीं झालीं. म्हणून श्रुति, स्मृति, पुराणें यांचा अभ्यास करा. तसेंच अर्वाचीन भौतिक शास्त्रांचा अभ्यास करा. या दोहोंच्या आधारें स्वदेशाचा प्रमाणभूत, उत्साहवर्धक आणि स्फूर्तिदायक असा इतिहास लिहिण्याचा संकल्प करा. पाश्चात्य ग्रंथकार म्हणतात कीं शिवाजी लुटारू होता; पण स्वदेशप्रेमाच्या नेत्रांनीं शिवाजीकडे पहा म्हणजे तुम्हांला कळेल कीं शिवाजी ही राष्ट्रीय विभूति होती. भारताचा इतिहास भारतवासीयांनींच लिहिणें जरूर आहे. भारतवासीयांना आपल्या प्राचीन इतिहासाची माहिती करून देणें हेंच राष्ट्रीय शिक्षण होय. आपल्या संस्कृतीची माहिती होण्याकरतां संस्कृत भाषेचा पायाशुद्ध आणि सखोल अभ्यास करा."

## शिवस्वरूप : ६६ :

अलवार येथील मुक्काम संपवून स्वामी पुढें निघाले. टहला या गांवांत पोंचले. तेथें नीलकंठाच्या देवालयांत सर्वांनीं मुक्काम केला. स्वामींनीं आंघोळ केली. छाटी वेढून घेतली. अंगाला विभूति लावली. स्वामी नीलकंठासमोर ध्यानस्थ बसले. नीलकंठ या नांवामुळें समुद्रमंथनाचा

पौराणिक प्रसंग त्यांच्या मनश्चक्षूंसमोर उभा राहिला. त्या कथेच्या रहस्याचा ते विचार करूं लागले. सर्व जीव या मायारूप भवसागराचें मंथन करीत असतात. या मंथनांतून इंद्रियांना संतोष देणारीं बहुमोल रत्नें वर येतात. शेवटीं सर्वस्वाचा नाश करणारें कालकूट विष उत्पन्न होतें. या विषाचा योगिराज नीलकंठावर परिणाम होत नाहीं. त्याच-प्रमाणें 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असा बुद्धीचा निश्चय असलेला संन्यासी विषयाच्या कालकूटांत न सांपडतां त्यापासून अलिप्त रहातो. मी देह नसून चिदानन्दस्वरूप शिव आहें हा अनुभव आल्याशिवाय मानवाला शांति मिळणार नाहीं. नंतर 'चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहं' असा जयघोष करून स्वामींनीं नीलकंठाला नमस्कार केला.

## पाणिनीचें व्याकरण : ६७ :

तेथून लहान मोठीं गांवें पहात स्वामी जयपूरला पोंचले. तेथें एक सुप्रसिद्ध वैय्याकरणी रहात होते. स्वामी त्यांना भेटले आणि म्हणाले, "मला पाणिनीची अष्टाध्यायी शिकवा." शिकवण्यास सुरुवात झाली. पहिल्या सूत्रावरील भाष्य तीन दिवस चालू होतें. स्वामींचें समाधान होईना. व्याकरणाचे पंडित रागावले व म्हणाले, "येथें शिकून तुमचा फायदा होणार नाहीं. मी सांगतों तें तुमच्या डोक्यांत शिरत नाहीं." स्वामी परत गेले. ते अष्टाध्यायी घेऊन बसले. त्यांनीं मनांत निश्चय केला कीं पहिल्या सूत्राचा अर्थ लागेपर्यंत अन्न ग्रहण करावयाचें नाहीं. स्वामी तीन तास मन एकाग्र करून बसले. त्या सूत्राचा अर्थ त्यांना समजला. नंतर ते पंडितजींच्याकडे गेले आणि तो अर्थ त्यांनीं पंडित-जींना सांगितला. पंडितजी चकित झाले. पुढें सुमारें आठ दिवसांत स्वामींनीं सबंध अष्टाध्यायीचा अभ्यास पुरा केला. एका शिष्यानें विचारलें, "स्वामी, हा अभ्यास तुम्हीं गुरूच्या मदतीशिवाय कसा

केला ? " स्वामी म्हणाले, " दृढनियानें. एखाद्या विषयावर मन एकाग्र केलें कीं त्या विषयाचा उलगडा होतो. निश्चयाचें बळ तेंचि फळ ! "

## खेतडीचे महाराज : ६८ :

स्वामींनीं अबूचा पहाड पाहिला. जैनांच्या मंदिरांत जाऊन प्रार्थना केली. तेथून ते अजमीरास गेले. चिस्ती नामक मुसलमान फकीराचा दर्गा पाहिला. तेथून पुष्कर क्षेत्राकडे वाट चालूं लागले. त्या क्षेत्राचें दर्शन घेतल्यावर ता. १४ एप्रिल १८९१ रोजीं स्वामी नरेन्द्र आबूला परत आले. येथें खेतडीच्या महाराजांचे दिवाण त्यांना बोलावण्यास आले. स्वामी खेतडीला गेले. खेतडीच्या राजांनीं प्रश्न विचारला, " स्वामी, जीवित म्हणजे काय ? " स्वामींनीं उत्तर दिलें, " प्रतिकूल परिस्थितींत स्वत:चा विकास करून घेण्याची जीवाच्या ठिकाणची नैसर्गिक प्रवृत्ति म्हणजे जीवित. " " शिक्षण म्हणजे काय ? " राजांनीं दुसरा प्रश्न विचारला. स्वामींनीं उत्तर दिलें, " आपल्या नसानसांतून भिनून गेलेलें विशिष्ट कल्पनांचें साहचर्य म्हणजे शिक्षण. " खेतडीचे महाराज स्वामींचे शिष्य बनले. ते आपल्या प्रजेच्या देखत स्वामींची सेवा करीत. संस्थानांतील लोक सुखी होते; पण राजेसाहेब दु:खी होते. त्यांना पुत्र नव्हता. राजेसाहेब आणि त्यांच्या पत्नी यांनीं एक दिवस अश्रुपूर्ण नय-नांनीं आणि भक्तियुक्त अंत:करणानें प्रार्थना केली कीं, " स्वामी, आमच्या पोटीं एक सुपुत्र जन्माला येईल असा आशीर्वाद द्या. " स्वामी म्हणाले, " जगन्नियंत्याच्या कृपेनें तुमचे हेतू पूर्ण होतील. "

खेतडीला एक संस्कृत पाठशाळा होती. तेथें नारायणदास या नांवाचे पंडित वेदाध्ययनांत निमग्न असत. स्वामी त्या पाठशाळेंत गेले. स्वामींनीं नारायणदासांना विनंति केली कीं, " मला पातंजलभाष्य शिकण्याची इच्छा आहे. आपण कृपा करून शिकवाल काय ? " नारायणदास

म्हणाले, " स्वामी, आपल्यासारखा शिष्य मिळण्यास पुण्याई लागते. पातंजलभाष्याचा अभ्यास सुरू झाला. पंधरा दिवसांत हा अभ्यास संपला. एके दिवशीं नारायणदास म्हणाले, " स्वामी, मला येत होतें तें सर्व तुम्हांला शिकवलें. आतां मजजवळ कांहीं राहिलें नाहीं. " स्वामींनीं गुरुजींना नम्रतापूर्वक नमस्कार केला आणि त्यांचा निरोप घेतला.

## नर्तकीनें विश्वप्रेम शिकविलें : ६९ :

खेतडीचे महाराज आपल्या दिवाणखान्यांत बसले होते. त्यांना करमेना म्हणून त्यांनीं एका नर्तकीला गाणें म्हणण्यास सांगितलें. तिनें गाणें म्हणण्यास आरंभ केला. नर्तकीनें मीराबाई आणि सूरदास यांचीं पदें पाठ केलीं होतीं. राजेसाहेबांनीं स्वामींना दिवाणखान्यांत येण्याची विनंती केली. स्वामी आले. राजेसाहेबांनीं उठून त्यांचें स्वागत केलें. स्वामी नरेन्द्र गाणें ऐकणार म्हणून नर्तकीच्या हृदयांत हर्षाच्या लहरी निर्माण झाल्या. इतक्यांत स्वामी राजेसाहेबांना म्हणाले, " नर्तकीचें गाणें ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. " हें ऐकून नर्तकीला फार वाईट वाटलें. स्वामी निघून जाणार इतक्यांत नर्तकीनें हात जोडले आणि आर्त स्वरानें भक्तश्रेष्ठ सूरदासाचें पुढील पद म्हटलें– " प्रभु मोरे अवगुण चित न धरो. " त्याचा भावार्थ असा होता कीं, " हे प्रभो, माझे अवगुण मनांत आणूं नकोस. तुझें नांव समदर्शी आहे. एका प्रवाहाला नदी म्हणतात; दुसऱ्याला घाणेरडा नाला म्हणतात; पण हे दोन्ही प्रवाह गंगेमुळें पावन होतात. लोखंडाच्या एका तुकड्याची मूर्ति तयार करतात; दुसरा तुकडा सुरा होऊन खाटकाच्या घरीं पडतो; पण परीस हा आपल्या स्पर्शानें दोघांचेंही सोनें बनवितो. त्याप्रमाणें हे समदर्शी, मी जरी अवगुणी आहें तरी तूं मला पावन कर."

त्या नर्तकीनें हें पद भक्तियुक्त अंतःकरणानें कळवळून गाऊन

दाखविलें. बाहेर निघालेले स्वामी आसनावर बसले. त्यांच्या मनांत आलें कीं, " भूतमात्राच्या ठिकाणीं एकच चैतन्य भरलेलें आहे हें या नर्तकीनें आज मला पटवून दिलें. हाच का माझा संन्यास ? मी स्वामी आणि ही नर्तकी ही भेदबुद्धि अजून माझ्या ठिकाणीं कायम आहे. " असा विचार चालू असतांना स्वामी उठून उभे राहिले आणि त्यांनीं त्या नर्तकीला अत्यंत आदरानें नमस्कार केला.

## शाक्तांच्या बंदिवासांत : ७० :

खेतडी, अजमीर, अहमदाबाद, बढवाण हीं ठिकाणें पहात स्वामी लिमडीला पोंचले. हें एक संस्थान आहे. तेथील महत्त्वाचीं ठिकाणें स्वामींनीं पाहिलीं. भिक्षेवर निर्वाह करीत स्वामी पुढें चालले. त्यांना एक धर्मशाळा दिसली. बाहेर एक चौदा वर्षांचा मुलगा बसला होता. त्याला स्वामींनीं विचारलें, " येथें रहाण्याची सोय होईल का ? " तो म्हणाला, " आंत या. सर्व सोय होईल. " स्वामी आंत गेले. त्यांच्याकरतां भोजन तयार होतें. त्या मुलाला स्वामींच्या सहवासांत अतिशय आनंद वाटत होता. त्याला स्वामींच्याबद्दल आदर निर्माण झाला. त्यानें स्वामींना वाढलें. जेवण झालें. नंतर प्रवासाच्या श्रमांमुळें स्वामींना झोंप लागली. रात्रीं बारा वाजतां स्वामी जागे झाले. तों त्यांना काय दिसलें ? दारांना कड्या व कुलपें लावलीं होतीं. दहा बारा गलेलठ्ठ बैरागी कोंडाळें करून चिलमीचे झुरके मारीत होते. कांहींच्या तोंडाला दारूचा वास येत होता. समोरच्या खोलींत कांहीं वारयोषिता बसलेल्या दिसत होत्या. मागील बाजूनें एका बैराग्यानें एका तरुण स्त्रीला बळजबरीनें ओढीत पलीकडे नेलें. नंतर त्यांचा पुढारी स्वामींच्याकडे आला आणि म्हणाला, " महाराज, आपल्या चेहेऱ्यावर तपश्चर्येचें तेज झळकत आहे. आपण कडकडीत ब्रह्मचर्य पाळलेलें दिसतें. आम्ही उद्यां रात्रीं कांहीं सिद्धि प्राप्त करून

घेणार आहोंत. त्या वेळीं तुम्हांला आपलें ब्रह्मचर्य व्रत मोडलें पाहिजे." हें सांगून तो शाक्तपंथी महंत निघून गेला. स्वामी थरथर कांपूं लागले. ते मनांत म्हणाले, "परमेश्वरा, धर्माच्या नांवाखालीं हे काय अनाचार चालले आहेत. हे गुरुदेव, हे रामकृष्ण परमहंस, या संकटांतून माझी सुटका करा. प्रसंग पडला तर मी प्राण देईन पण माझ्या व्रताचा भंग होऊं देणार नाहीं." असा विचार करीत स्वामी स्वस्थ पडून राहिले. होतां होतां पहाट झाली. तो चौदा वर्षांचा मुलगा स्वामींच्याकडे आला. तो स्वामींच्याकडे गुरुभक्तीनें पाहूं लागला होता. स्वामींनीं आपली मन:स्थिति त्याला सांगितली. तो मुलगा म्हणाला, "महाराज, आपल्या सुटकेकरतां आपण सांगाल तें धाडस करण्यास मी तयार आहें." हें बोलणें चालू असतां स्वामींना तहान लागली म्हणून त्यांनीं पाणी मागितलें. मुलगा पाण्याचा खुजा घेऊन आला. पाणी प्याल्यावर स्वामींना एक कल्पना सुचली. त्यांनीं पलीकडच्या चुलींतील एक कोळसा घेतला आणि त्या खुजावर एक पत्र लिहिलें.

श्रीमंत महाराज, संस्थान लिमडी, यांस—

सा. न. वि. वि.

मी आपल्या गांवांतील धर्मशाळेंत तुरुंगांत आहें. हे अघोरपंथी लोक आहेत. मी यात्रेकरू म्हणून आपल्या राज्यांत आलों आहें. शिपाई धाडून माझी सुटका करा. वेळेवर मदत न आल्यास मला माझे प्राण विसर्जन करावे लागतील.

मदतीची याचना करणारा,

एक संन्यासी
स्वामी नरेन्द्र.

तो खुजा स्वामींनीं मुलाजवळ दिला. तो मुलगा महंतांच्या पहाऱ्यांतून पाणी आणण्याकरतां खुजा घेऊन बाहेर गेला. तो राजवाड्यांत पोंचला. त्यानें खुजावर लिहिलेलें अद्‌भुतम्य पत्र राजेसाहेबांना दिलें. राजेसाहेब संतप्त झाले. त्यांनीं शिपाई पाठविले. तो महंत आणि त्याचे साथीदार यांना गिरफदार केलें. स्वामींची सुटका केली. स्वामींना दरबारांत बोलावून त्यांचा बहुमान केला. या ठिकाणीं एका भक्तानें त्यांना हळूच प्रश्न विचारला कीं, " आपण संन्यासी आहांत. मग संस्थानिकाकडे कां उतरतां ? " स्वामींनीं उत्तर दिलें कीं, " संस्थानिकांच्या हातांत सत्ता आहे, पैसा आहे. एक संस्थानिक अनुकूल झाला कीं त्याच्या द्वारें मला हजारों गरिबांचें कल्याण साधतां येतें. "

## समुद्राच्या किनाऱ्याजवळ : ७१ :

लिमडी, भावनगर हीं ठिकाणें पाहिल्यावर स्वामी जुनागडला पोंचले. येथील स्तूप, स्तंभ, लेणीं, शिळा, देवळें इत्यादि आर्य संस्कृतीचे भग्न अवशेष त्यांनीं पाहिले. उत्तरेस असलेल्या गिरिनारच्या पहाडावर गेले. पलीकडे साडेतीन हजार फूट उंचीची एक टेकडी आहे. त्या टेकडीच्या शिखरावर उभे राहिले. चारी दिशांना तीर्थें दिसत होतीं. स्वामींना वाटलें कीं आसेतुहिमाचल विस्तारलेला भारतवर्ष एक प्रचण्ड तीर्थ आहे. स्वामी खालीं उतरले. प्रवास करीत सोमनाथला पोंचले. तेथील त्रिवेणीसंगमावर स्वामींनीं स्नान केलें. नंतर ते समुद्राजवळ गेले. दूरवर पहात उभे राहिले. समुद्राच्या लाटा खळाळत युरोपकडे वहात होत्या. स्वामींना समुद्रावरून उड्डाण करणाऱ्या हनुमंताची आठवण झाली. आपल्यालाही हा विशाल सागर ओलांडून अमेरिका किंवा युरोपांत जातां येईल काय ? असा विचार त्यांच्या मनांत आला.

जुनागड, पोरबंदर हीं शहरें पाहून स्वामी द्वारकेला पोंचले. एके

दिवशीं संध्याकाळ झाली. स्वामी समुद्राच्या कांठाशीं आले. त्यांच्या मनांत विचार आले कीं यादवीच्या समुद्रांत द्वारका बुडाली. द्वारकेप्रमाणेंच साऱ्या भरतखंडाची आज स्थिति झाली आहे. समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर धाडकन् आपटत आहेत. पाश्चात्य संस्कृतीच्या लाटांनीं सनातन धर्माची द्वारका वाहून जाणार काय ? असे विचार मनाला त्रस्त करूं लागल्यावर स्वामींनीं द्वारकाधीशाची प्रार्थना केली–" हे भगवन् , भारताच्या भाग्याला भरती येवो. "

## लोकमान्य टिळकांची भेट : ७२ :

द्वारकेनंतर बडोदें, खाण्डवा, इंदूर हीं शहरें स्वामींनीं पाहिलीं. इंदूरला अहिल्याबाईच्या स्मारकाचें दर्शन घेतांना स्वामी म्हणाले, " हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि सोमनाथापासून जगन्नाथापर्यंत आपल्या धर्मनिष्ठेचे आणि दानशूरत्वाचे ध्वज उभारून मराठ्यांच्या नांवाला उज्ज्वलता आणणारी देवी अहिल्याबाई धन्य होय ! " इंदूरच्या प्रवासानंतर स्वामी लोकस्थिति पहात पहात मुंबईला पोंचले. येथें गुरुबंधु अभेदानन्दांची भेट झाली. स्वामी नरेन्द्रांचें प्रखर तेज पाहून अभेदानन्द म्हणाले, " स्वामींच्या शरीराचा आश्रय करून सारा हिंदुस्थान आत्मोन्नतीकरितां तळमळत आहे. स्वामी नरेन्द्र मला ज्वालामुखी पर्वताप्रमाणें भासले. त्यांच्या ठिकाणीं सामर्थ्याचा आणि उत्साहाचा इतका उत्कर्ष झाला आहे कीं शरीराचीं बंधनें तोडून तो बाहेर पडणार कीं काय अशी मला भीति वाटते. " मुंबई पाहिल्यावर स्वामींनीं लोकमान्य टिळकांच्या पुण्यनगरींत प्रवेश केला. टिळकांच्याकडे दहा दिवस पाहुणचार घेतला. या दोन युगपुरुषांचे राष्ट्राच्या उन्नतीविषयीं अनेक वादसंवाद झाले. दोघांनीं भगवद्गीतेचा सखोल अभ्यास केलेला. पिण्ड-

ब्रह्मज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्त्वें गीतेमध्यें असंदिग्ध रीतीनें सांगितलीं आहेत. संसारांत भांबावून गेलेल्या मनास निष्काम-कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा गीतेसारखा दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांत सांपडणें दुर्मिळ होय. रहस्यकार टिळक आणि स्वामी नरेन्द्र यांचे गीतेच्या सामर्थ्याबद्दल जे संवाद झाले असतील ते योगयुक्त चित्तानें ऐकले तरच समजतील.

पुणें पाहिल्यावर महाबळेश्वर, बेळगांव हीं ठिकाणें पाहिलीं. या वेळीं इंग्रज सरकारचे चित्रगुप्त त्यांच्याबरोबर प्रवास करीत होते. इंग्रज सरकारला वाटे कीं हा नुसता देवभोळा संत नाहीं, तर हा आपल्याला बाधक ठरणारा राष्ट्रसंत आहे— He is a dangerous patriot saint. या गुप्त हेरांना पाहून स्वामी म्हणाले, “ ही सुद्धां त्या प्रेममय परमेश्वराची लीला आहे.” दुसरेही असेच गमतीदार अनुभव आहेत. एका घरांत स्वामी भिक्षेला गेले. मालक गुरगुरत बाहेर आला आणि म्हणाला, “या घरांत संन्यासी आणि चोर यांना आश्रय मिळत नाहीं.” स्वामी पुढें गेले. पुढच्या घरांत जेवण मिळालें; पण भोजनांत इतकें तिखट होतें कीं स्वामींना चिंचेचा बळक प्यावा लागला. एका गांवीं लोक त्यांचीं प्रवचनें ऐकण्यास येत; पण तीन दिवस झाले तरी जेवणाची व्यवस्था कोणीच बघेना. हें एका चांभारानें ओळखलें. स्वामींनीं त्याच्याजवळ चपात्या मागितल्या. त्या चांभारानें भक्तिभावानें चपात्या करून आणल्या. स्वामींचा अंतरात्मा तृप्त झाला.

## बाबू मित्रांना उपदेश : ७३ :

बेळगांवास असतांना फॉरेस्ट ऑफिसर बाबू मित्र यांचा परिचय झाला. परिचयाचें प्रेमांत आणि प्रेमाचें भक्तींत रूपांतर झालें. त्यांच्याशीं बोलतांना इंग्रजींतील विनोदी वाङ्मयाबद्दल चर्चा सुरू झाली. स्वामींनीं

पिक्‌विक्‌ पेपर्स या कादंबरींतील एक उतारा म्हणून दाखविला. बाबूजींनीं विचारलें, “ आपण हें पुस्तक किती वेळां वाचलें ? ” स्वामी म्हणाले, “ फक्त दोन वेळां. मीं चित्ताची एकाग्रता करून वाचतों. मनाची एकाग्रता प्राणायामानें वाढते; पण अनेक लोक प्राणशक्तीचा विषय-सुखांत अपव्यय करतात.”

बाबू मित्र नेहमीं आजारी असत. अनेक प्रकारचीं औषधें घेत. वरच्या अधिकाऱ्यांबद्दल कुरकुर करीत. हें पाहिल्यावर स्वामी म्हणाले, “ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी । ही गोष्ट अनुभवसिद्ध नाहीं काय ? तुम्ही आपलें काम प्रामाणिकपणानें आणि देवाला स्मरून करा. दोष देण्याची प्रवृत्ति सोडून द्या. सर्व लोकांशीं प्रेमानें वागा; म्हणजे तेही तुमच्यावर प्रेम करूं लागतील. निंदा करूं नका. निंदा केलेली ऐकूं नका. आपल्या ठिकाणचें देवत्व प्रकट करून गरिबांना मदत करा; मदत कसली करतां ? गरिबांची सेवा करा. गरिबांची सेवा करण्याची संधि मिळाली म्हणून परमेश्वराचे आभार माना. भिकाऱ्याच्या रूपानें स्वयंनारायण आपल्या दारावर आला आहे अशी भावना ठेवण्याचा अभ्यास करा. अनेक रोग मनाच्या दुबळेपणा-मुळें उत्पन्न झालेले असतात. पवित्र आचरणानें मन सुप्रसन्न ठेवा म्हणजे आपोआप प्रकृति सुधारेल. आणि प्रकृति सुधारली नाहीं आणि मृत्यु आला म्हणून कोठें बिघडलें ? एखादा मनुष्य मेला म्हणून चन्द्राला खळें का पडणार आहे ? मृत्यूची भीति सोडून द्या. एखादी अभिसारिका आपल्या प्रियकराचें किती आतुरतेनें स्वागत करते ! तितक्याच आतुरतेनें मृत्यूचें स्वागत करा. ”

## डब्यांतील मारामारीचा प्रसंग : ७४ :

स्वामी पुढील प्रवासाला निघाले. एका भक्तानें दुसऱ्या वर्गाचें

तिकिट काढून दिलें. स्वामी डब्यांत बसले. दंड कोपऱ्यांत ठेवला. कांहीं स्टेशनें गेल्यावर दोन इंग्रज अधिकारी डब्यांत चढले. त्यांना वाटलें या संन्याशाला इंग्रजी येत नसेल. म्हणून त्यांनीं सिगारेटचीं धूम्रवलयें डब्यामध्यें फिरत असतांना स्वामींचीं टवाळी करण्यास आरंभ केला. कांहीं वेळानें एक स्टेशन आलें. स्टेशन मास्तर समोरून चालले होते. स्वामींनीं त्यांना इंग्रजींत विचारलें कीं, गाडी येथें किती वेळ थांबते ? हें ऐकून ते उद्दाम अधिकारी चपापले आणि म्हणाले, " स्वामी, तुम्ही इंग्रजी शिकलेले आहांत हें आम्हांला इतका वेळ कां सांगितलें नाहीं ? " स्वामी म्हणाले, " इंग्रजी शिकलेल्या पढतमूर्खांशीं बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग नाहीं." हें उत्तर ऐकल्यावर ते दोघेजण स्वामींना मारण्यास धावले. स्वामींनीं आपला दण्ड हातांत घेतला आणि त्यांच्या-कडे रोखून पाहिलें. ते अधिकारी मागें सरले. आपल्या जागेवर सावरून बसले. त्यांनीं स्वामींची क्षमा मागितली.

स्वामी कोल्हापूरला पोंचले. राणीसाहेबांचे पाहुणे म्हणून राहिले. दरबारांत सन्मान झाला. राणीसाहेबांनीं दोन छाट्या आणि एक मौल्य-वान् नजराणा स्वामींच्यापुढें ठेवला. स्वामींनीं नजराणा परत केला. ते म्हणाले, " या दोन छाट्यांचा मात्र मी स्वीकार करतों; कारण माझ्या छाट्या जीर्ण झाल्या आहेत." यानंतर स्वामींनीं कोल्हापूरचा निरोप घेतला. गोवें, बंगलोर हीं ठिकाणें पाहात स्वामी म्हैसूरला पोंचले. राजे-साहेबांची भेट झाली. स्वामींच्या उज्ज्वल विचारांनीं राजेसाहेब दिपून गेले.

## दरबारांतील स्पष्टोक्ति : ७५ :

एके दिवशीं राजेसाहेबांनीं स्वामींना दरबारांत बोलावलें. स्वामी आले. सर्वांनीं उभें राहून त्यांचें स्वागत केलें. स्वामी आपल्या आसनावर बसले. नंतर संभाषणाच्या ओघांत राजेसाहेबांनीं सहज प्रश्न विचारला, " या

दरबारी लोकांबद्दल तुमचें काय मत आहे?" स्वामींनीं उत्तर दिलें, "राजेसाहेब, आपलें अंत:करण थोर आहे, पण आपणाभोंवतीं या दरबारी लोकांचा गराडा पडला आहे ही दु:खाची गोष्ट आहे. दरबारी हे कोठेंही दरबारीच असावयाचे!" स्वामींची स्पष्टोक्ति ऐकून राजेसाहेब स्तंभित झाले. दरबारी लोक संतापले. राजेसाहेबांनीं दरबार बरखास्त केला. ते स्वामींना घेऊन आपल्या खासगी दिवाणखान्यांत गेले आणि म्हणाले, "स्वामीमहाराज, आपल्या स्पष्टवक्तेपणामुळें जीव धोक्यांत येईल." हें ऐकतांच स्वामी सात्त्विक संतापानें म्हणाले, "सत्य सांगण्याकरतां प्राणास मुकावें लागलें तरी चालेल. कल्पना करा कीं उद्यां युवराजानें मला विचारलें कीं, 'बाबांच्या स्वभावाबद्दल तुमचा काय अभिप्राय आहे?' तरी मी तुमचे दोष लपवून ठेवीन असें तुम्हांला वाटतें काय? तोंडपुजेपणा करणें हें दरबाऱ्याचें काम आहे आणि स्पष्ट बोलणें हें संन्याशाचें कर्तव्य आहे."

## पांच हजार रुपये नाकारले : ७६ :

म्हैसूरचे दिवाणही स्वामींचे भक्त बनले. स्वामी त्रावणकोरला निघाले असें पाहून दिवाण म्हणाले, "स्वामीमहाराज, कृपा करून येथील प्रसिद्ध सराफाच्या दुकानांत जा आणि आपल्याला पाहिजे ती वस्तु निवडा. माझ्याकडून एखादी भेट तरी स्वीकारा." स्वामी म्हणाले, "बरें आहे." दिवाणांनीं सही केलेला कोरा चेक खाजगी कारभाऱ्याजवळ दिला आणि पांच हजार रुपयांपर्यंत स्वामी सांगतील ती वस्तु विकत घेण्यास सांगितलें. स्वामी सराफाच्या दुकानांत गेले. सराफानें सोन्याचे, मोत्यांचे व हिऱ्यांचे बहुमोल दागिने दाखविले. स्वामींना एकही दागिना पसंत पडला नाहीं. स्वामी दुसऱ्या दुकानांत निघाले. कारभाऱ्याला वाटलें, किती हजार खर्च होतात कोणास ठाऊक! इतक्यांत स्वामी

म्हणाले, "मला एक उंची सिगारेट पाहिजे." कारभाऱ्यांनीं आठ आण्यांची एक सिगारेट घेतली; स्वामींना दिली. स्वामींनीं ती सिगारेट पेटवली, स्वैरपणानें दोन चार झुरके मारले आणि स्वामी म्हणाले, "कारभारी, दिवाणाच्या घरीं चला. मला पसंत असलेली वस्तु मिळाली आहे." स्वामींचा हा निर्लोभीपणा पाहून दिवाण चकित झाले; पण त्यांना माहीत नव्हतें कीं सुवर्णाला मृत्तिका मानणाऱ्या रामकृष्णांचे स्वामी नरेन्द्र हे पट्टशिष्य होते. याच वेळीं राजेसाहेबांनीं बोलावणें पाठविलें. स्वामी राजवाड्यांत गेले. राजेसाहेब म्हणाले, "स्वामी, मी तुमचा अमेरिकेचा सर्व खर्च देतों." स्वामींनीं एक पैसाही घेतला नाहीं. दंड आणि कमंडलू घेऊन त्रावणकोर, त्रिवेन्द्रम्, मदुरा, रामेश्वर इत्यादि ठिकाणें पाहिलीं. नंतर ते कन्याकुमारीच्या देवालयाकडे निघाले. खाडीजवळ आले. लहान लहान होड्या उभ्या होत्या; पण स्वामींच्या जवळ होडीवाल्यास देण्यास एक पैसाही नव्हता. स्वामींनीं सूर मारला आणि पोहोण्यास सुरवात केली. खाडीच्या मध्यावर एक सुसर पाणी कापीत चालली होती. पण स्वामींचें तिकडे लक्ष नव्हतें. थोड्याच वेळांत स्वामी कांठाशीं आले. त्यांनीं देवळांत प्रवेश केला आणि मातृभूमीचा जयजयकार करीत जगदंबेला नमस्कार केला. भारतरूपी महातीर्थाची यात्रा पुरी झाली. स्वामी कन्याकुमारीपुढें ध्यानस्थ बसले आणि म्हणाले, "जगदंबे, माझ्यावर कृपा कर. भारतांतील दरिद्रीनारायणाकरितां, वैभवांत लोळणाऱ्या पाश्चात्य राष्ट्रांना ऋषींचा संदेश पोचविण्याकरितां, मी महासागर ओलांडून विलायतेला जात आहें."

## रामकृष्णांनीं दर्शन दिलें : ७७ :

कन्याकुमारीनंतर मद्रास, पॉंडिचेरी, हैदराबाद या शहरांतील परिस्थितीचें निरीक्षण केलें. हैदराबादच्या धर्मशील नबाबांनीं स्वामींची भेट

घेतली. ईश्वराच्या सगुण आणि निर्गुण स्वरूपाबद्दल चर्चा केली. नंतर नवाबांनीं अमेरिकेच्या प्रवासखर्चाकरतां एक हजार रुपये दिले. स्वामींनीं ते पैसे साभार परत केले. हैदराबादेहून स्वामी मद्रासकडे परतले. मद्रासमध्यें ते समुद्रकिनाऱ्यावर जात आणि परमेश्वराचा आदेश केव्हां मिळेल याची वाट पहात बसत. एके दिवशीं स्वामींना अर्धवट झोंप लागली. त्या झोपेंत त्यांना एक स्वप्न पडलें. वाळवंट पसरलें. किनारा दिसूं लागला. एक तपस्वी किनाऱ्यावरून समुद्रावर चालूं लागला. निरखून पहातांच लक्षांत आलें कीं हे रामकृष्ण आहेत. त्यांनीं स्वामींना बोलावलें. स्वामी पुढें गेले. त्यांनीं समुद्रांत उडी टाकली. —इतक्यांत स्वामी नरेन्द्र जागे झाले. हर्षाच्या आणि उत्साहाच्या लाटा त्यांच्या अंत:करणांत उसळत होत्या. त्यांनीं रामकृष्णांच्या पत्नीला-शारदादेवींना—पत्र पाठविलें. देवींचें उत्तर आलें कीं, " बेटा नरेन्, तूं अमेरिकेला जा. मला रामकृष्णांचा तसा साक्षात्कार झाला आहे. तूं विजयी होशील. माझा तुला आशीर्वाद आहे."

## स्वामी विवेकानन्द अमेरिकेला निघाले : ७८ :

१८९३ साल चालू होतें. स्वामींना तिसावें वर्ष लागलें. याच वेळीं खेतडीच्या राजेसाहेबांना मुलगा झाला. गादीला वारस मिळाला. त्यांनीं मोठा आनन्दोत्सव सुरू केला. त्यांचे दिवाण स्वामींना बोलावण्यास आले. आग्रह करून घेऊन गेले. स्वामी खेतडीला पोंचतांच राजेसाहेबांनीं त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवलें. मोठा दरबार भरविला. आपल्या पुत्राकरितां स्वामींचा आशीर्वाद घेतला. अमेरिकेला जाण्यास योग्य असा पोशाक स्वामींना दिला आणि नम्र विनंति केली कीं, " स्वामीमहाराज, आपण आजपासून विवेकानन्द या नांवाचा स्वीकार करा."

खेतडीचे दिवाण मुंबईपर्यंत आले. त्यांनीं पेनिन्शुलर नामक आगबोटीचें पहिल्या वर्गाचें तिकीट काढून ठेवलें. पुढील खर्चाला पुरेल

इतकी थैली अर्पण केली. ३१ मे उजाडण्यास अजून आठ दिवस अवकाश होता. हे आठ दिवस स्वामी विवेकानन्दांनीं भगवंताचें भजन, पूजन आणि चिंतन करण्यांत खर्च केले. प्रयाणाचा पुण्यदिवस उगवला. दिनराज विस्तीर्ण आकाशांत डौलानें वर येत होता. १८९३ मे ३१ हा दिनांक सुरू झाला. स्वामींनीं आंघोळ केली. नामस्मरण केलें. रामकृष्णांच्या फोटोला वंदन केलें. भुवनेश्वरी मातेला मनांतल्या मनांत नमस्कार केला. विजार आणि शर्ट घातल्यावर हुरमुजी रंगाचा रेशमी झगा वर चढवला. त्याच रंगाचा रेशमी साफा मस्तकावर बांधला. भगवद्गीता हातांत घेतली आणि स्वामी विवेकानंदांनीं आगबोटीवर पाय ठेवला. नांगर वर उचलला गेला. बोट चालूं लागली. स्वामी डेकवर उभे राहिले. हळूहळू किनारा दिसेनासा झाला. माता, मातृभूमि, गुरुदेव, गुरुबंधू, आर्य-संस्कृति यांच्या आठवणींनीं स्वामींचें हृदय विह्वल झालें. " माझी पवित्र त्यागभूमि सोडून मी भोगभूमीकडे जात आहें " असें म्हणून स्वामींनीं दीर्घ निःश्वास टाकला.

समुद्रा, तुझ्या पाठीवरून तो पराक्रमी कोलंबस अमेरिकेला गेला. त्यानें शस्त्रांच्या जोरावर अमेरिकेंत पाय ठेवला. निग्रोंना गुलाम केलें. आज आगबोटींत बसलेला कोलंबस वेदान्ताचें शस्त्र घेऊन निघाला आहे. त्याला कोणालाही गुलाम करावयाचें नाहीं; हाला बंधनांत पडलेल्या धार्मिक विचारांना स्वतंत्र करावयाचें आहे. समुद्रा, तूं अनंत काळापासून गर्जना करतो आहेत. तुझें महान् संगीत भगवद्गीत ऐकणारा एक संन्यस्त प्रवासी ऐकत आहे. समुद्रा, अनेक नद्या तुला भेटायला येतात. अनेक धर्मांचे विचार या प्रवाशाच्या मनांत आहेत. तुझ्या पृष्ठभागावर डोंगर-लाटा निर्माण होत आहेत. या प्रवाशाच्या मनांत धर्मविचाराच्या लाटा हेलावत आहेत. तूं परमेश्वराचें प्रतीक आहेस. तूं ईश्वराचें सिंहासन आहेस. अनेक जहाजें तुझ्या वक्षस्थळावर निर्भयपणानें संचार करतात.

त्यांतील कांहीं तूं बुडवतोस; पण समुद्रा, अगस्तीचा तारा या आगबोटींचें मार्गदर्शन करीत आहे हें लक्षांत ठेव. तुला रत्नाकर म्हणतात; पण विवेकानन्दांसारखें रत्न तुझ्याजवळ आहे काय ?

## मंतरलेला ताईत : ७९ :

स्वामींची कप्तानाशीं ओळख झाली. इतर प्रवासी कुतूहलानें पहात होते. वेळ सांपडला कीं तो कप्तान स्वामींना समुद्राची माहिती सांगे. आगबोटींतील सर्व यंत्रें दाखवी. बोट कोलंबोला थांबली. तेथें स्वामींनीं एका मंदिरांत भगवान् बुद्धाचें दर्शन घेतलें. पुढें पिनांग, सिंगापूर, हॉंगकांग हीं बंदरें लागलीं. चिनी संस्कृतीवर लोकसंख्येमुळें आणि दारिद्र्यामुळें आलेली प्रेतकळा पाहून स्वामींना वाईट वाटलें. पण त्या राष्ट्राचें गूढ सामर्थ्य ओळखून स्वामी म्हणाले, " भावी इतिहासांत हें राष्ट्र चमकल्याशिवाय राहाणार नाहीं. " हॉंगकांगपासून ऐशीं मैल असलेलें कंतान शहर स्वामींनीं पाहिलें. तेथील देवळें पहात ते एका मठांत शिरले. बरोबरचा दुभाष्या म्हणाला, " येथें जाऊं नका. चोप खावा लागेल." तरीही स्वामी व इतर प्रवासी आंत गेले. इतक्यांत दुभाष्या म्हणाला, " पळा, ते पहा चिनी महंत सोटे घेऊन आले." इतर प्रवासी पळाले. स्वामींनीं दुभाष्याला हिंदी योगी या शब्दांना चिनी शब्द विचारले. महंत आल्यावर स्वामींनीं ते दोन शब्द उच्चारले. त्याचा अद्भुत परिणाम झाला. चिनी महंतांनीं स्वामींना साष्टांग नमस्कार घातला. दुभाष्यामार्फत बोलणें सुरू झालें. महंत म्हणाला, " अहो योगी, आम्हांला भुतांपासून रक्षण करणारा मंतरलेला ताईत द्या. " स्वामी देतों म्हणाले. आतां काय करावें ? या मानवी भुतांचें निवारण कसें करावें ? स्वामींना युक्ति सुचली. त्यांनीं खिशांतून कागद काढला. त्याचे आठ

तुकडे केले. प्रत्येक तुकड्यावर ओम् हें अक्षर लिहिलें. कांहीं मंत्र पुटपुटण्याचा देखावा करून त्या तुकड्यांच्या गोळ्या केल्या. स्वामी म्हणाले, "या गोळ्या आठ ताइतांत घाला. ते ताईत गळ्यांत बांधा. म्हणजे भुतें पळून जातील." महंतांनीं स्वामींना पुन्हां नमस्कार केला. देवळें दाखविलीं. तेथें स्वामींना कांहीं संस्कृत भाषेंत असलेले शिलालेख पहाण्यास मिळाले. आर्यसंस्कृतीचा एक धागा सांपडला.

## अमेरिका पाहून गोंधळून गेले : ८० :

चीन आणि जपान येथील प्रदेश पाहिल्यावर स्वामी अमेरिकेच्या शिकागो या स्टेशनावर उतरले. या प्रवासाबद्दल फ्रेंच लेखक रोमां रोलां म्हणतात, "This journey was an astonishing adventure. The young Swami went into it with his eyes shut. He had heard vaguely of a Parliament of Religions to be opened some day somewhere in America; he knew nothing, neither the exact date, nor the conditions of admissions. He did not take a single credential with him. The whole way was strewn with his feathers, for he was a marked prey for the fleecer."

स्वामी थंडीनें कुडकुडत होते. त्यांच्याजवळ गरम कपडे नव्हते. सर्वधर्मपरिषद् अमेरिकेला भरणार आहे येवढेंच त्यांना माहीत होतें. कोणत्या तारखेला भरणार ? प्रवेश कसा मिळणार ? कोणाची शिफारस लागते का ? याची कांहीं माहिती नाहीं. बरोबर सामानाचें ओझें; आजपर्यंत दण्ड व कमंडलू यांचें ओझें माहीत. आतां हें सामान वाहण्यास हमालांनीं अवाच्या सवा पैसे घेतले. पैशाला स्पर्श न करणारा हा संन्यासी या ऐहिक वैभवाच्या देशांत गोंधळून गेला. तशांत तांबड्या पोशाकामुळें रस्त्यांतील मुलें मागें लागलीं. कसेतरी एका हॉटेलमध्यें पोंचले. ट्रंका ठेवल्या. हमालांचे पैसे दिले. खोलीचें दार लावलें. सुटकेचा निःश्वास-

टाकला. कपडे काढले. तोंड धुतलें. पद्मासन घातलें आणि जगदंबेची प्रार्थना केली.

## धर्मपरिषदेंत प्रवेश मिळणार नाहीं : ८१ :

दुसरे दिवशीं स्वामी तेथील विश्वप्रदर्शन पहाण्यास गेले. पाश्चात्यांचें व्यवहारचातुर्य, कल्पकता व कर्तबगारी त्यांनीं पाहिली. हजारों लोकांच्या समुदायांत हिंडत असतां आपण एकटे आहोंत ही गोष्ट स्वामींच्या मनांत वारंवार येत होती. जुलई महिना चालू होता. स्वामी सर्वधर्म-परिषदेच्या ऑफिसांत गेले.

व्यवस्थापक—आपल्याला काय पाहिजे ?

विवेकानन्द—परिषद् केव्हां सुरू होणार ?

व्यवस्थापक—सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत. आपलें नांव काय ? आपण कोणत्या संस्थेतर्फे आलांत ?

विवेकानन्द—माझें नांव स्वामी विवेकानन्द. मी कोणत्याही संस्थे-तर्फे आलों नाहीं. या परिषदेंत भाग घेण्याची माझी इच्छा आहे. माझें नांव दाखल करून घ्या.

व्यवस्थापक—कोणत्यातरी संस्थेतर्फे आल्याशिवाय जमणार नाहीं. शिवाय नांव दाखल करण्याची तारीख उलटून गेली. तुम्हांला या धर्म-परिषदेंत प्रवेश मिळणार नाहीं.

## प्रो. राइट यांची भेट : ८२ :

हें भाषण ऐकल्यावर विवेकानन्दांना धक्का बसला. पैशाची अडचणही वाटत होती. ऊबदार कपडेही नव्हते. सहानुभूतीनें बोलणारा मित्र दिसत नव्हता. स्वामी उदासीन झाले. अशा वेळीं त्यांना कोणींतरी सुचविलें कीं बोस्टन येथें जाऊन रहा, म्हणजे खर्च कमी येईल.

स्वामींनीं बोस्टनचें तिकीट काढलें. गाडींत बसले. त्याच डब्यांत एक प्रौढ वयाच्या श्रीमंत बाई येऊन बसल्या. स्वामींची तेजस्वी मुद्रा पाहून त्यांना वाटलें कीं यांची ओळख व्हावी. त्यांनीं स्वामींची चौकशी केली. त्यांना आपल्या घरीं राहण्यास बोलावलें. स्वामींनीं तें मान्य केलें. स्टेशन आलें. बाईंच्या हवाशीर बगल्यांत स्वामी पाहुणचार घेऊं लागले. आर्थिक ताण कमी झाला; पण मानसिक ताण वाढतच गेला. त्या बाईंचे अनेक मित्र येत आणि स्वामींच्याकडे एक प्रदर्शनीय वस्तु म्हणून पहात. मूर्तिपूजक म्हणून त्यांची चेष्टा करीत. वेडेवांकडे प्रश्न विचारून त्यांना भंडावीत. बाहेर फिरावयास गेले तर रस्त्यांतलीं पोरें त्यांच्या मागें लागत; त्यांच्या पोशाकाची टवाळी करीत. हा त्रास चुकविण्याकरितां स्वामींनीं अमेरिकन पद्धतीचे कपडे केले. केंसांचें मुंडन न करतां अमेरिकन् पद्धतीनें केंसांची निगा राखली. याच वेळीं त्यांना एका स्त्रीसमाजांत व्याख्यानाकरितां बोलावणें आलें. स्वामींची ओळख वाढत चालली. हॉवर्ड विश्वविद्यालयांतील प्रो. राइट त्यांना भेटण्यास आले. पंधरा मिनि-टांची मुलाखत ठरली होती; पण चार तास झाले तरी प्रो. राइट यांना ही मुलाखत संपावी असें वाटेना.

प्रो. राइट—स्वामी विवेकानन्द, शिकागोच्या धर्मपरिषदेला हिन्दु-स्थानचे प्रतिनिधि म्हणून तुम्ही उपस्थित रहा, म्हणजे तुमची योग्यता आमच्या राष्ट्राला समजेल.

विवेकानन्द—पण माझ्याजवळ प्रतिनिधित्वाचा दाखला नाहीं. त्यामुळें मला तेथें प्रवेश मिळणार नाहीं असें व्यवस्थापकांनीं सांगितलें.

प्रो. राइट—काय ? तुम्हांला प्रवेश मिळणार नाहीं ? तुमच्याजवळ प्रतिनिधित्वाचा दाखला मागणें म्हणजे सूर्याला असें विचारण्यासारखें आहे कीं हे सूर्या, तुला प्रकाशण्याचा काय हक्क आहे ?

प्रो. राइट यांनीं स्वामींना शिकागोचें तिकीट काढून दिलें. परिषदेच्या अध्यक्षाला पत्र दिलें. त्या पत्रांत असें लिहिलें होतें कीं "पत्र घेऊन येणारे स्वामी विवेकानन्द इतके विद्वान् आहेत कीं येथील सर्व प्रोफेसरांची विद्वत्ता एकत्र केली तरी त्यांच्या विद्वत्तेच्या पासंगाला पुरणार नाहीं." हें पत्र घेऊन स्वामी आगगाडींत बसले. दुसऱ्या स्टेशनवर एक व्यापारी भेटला. तो म्हणाला, "मी तुम्हांला परिषदेची कचेरी दाखवीन." हें ऐकून स्वामींना वाटलें, आतां सर्व त्रास संपला. रात्र झाली. गाडी शिकागो स्टेशनवर आली. तो व्यापारी कामाच्या गर्दींत स्वामींना विसरला. तो खालीं उतरला व त्या मनुष्यांच्या अरण्यांत दिसेनासा झाला. स्वामी थोडे चरकले. खालीं उतरले. नंतर खिसे चाचपूं लागले. तों काय ? प्रो. राइट यांनीं दिलेलें परिचयपत्र सांपडेना. परिषदेचा पत्ता सांपडेना. ते स्टेशनच्या दाराशीं आले; तिकीट देऊन बाहेर पडले. 'मला परिषदेचा पत्ता सांगतां का ?' असें विचारीत पुढें चालले. त्या शहरांतील लक्षाधीशांचे प्रासाद दोन्ही बाजूंनीं दिसत होते; पण कुणीही दार उघडेना; नीट उत्तर देईना. एका बंगल्याजवळ उभे राहिले. घंटा वाजवली. एक म्हातारा बाहेर आला. You nigger, get out असें खेकसला आणि त्यानें धाडदिशीं दरवाजा लावून घेतला. स्वामी हताश झाले. परत स्टेशनाकडे फिरले. रात्रीचे अकरा वाजले होते. त्यांनीं इकडे तिकडे पाहिलें. प्लॅटफॉर्मवर एक मोठें खोकें पडलें होतें. स्वामी त्या खोक्यांत गेले, बॅग उशाला घेतली आणि आकाशाचें पांघरूण घेऊन हा भारताचा राष्ट्रसंत कुडकुडत झोपीं गेला. दुसऱ्या दिवशीं परिषदेला प्रारंभ होणार म्हणून देशोदेशींचे प्रतिनिधी आपापलीं अभ्यास-जड भाषणें नाटकी आवाजांत पाठ करण्यांत दंग झाले होते. अध्यक्ष आपल्या स्वप्नांत दंग होऊन म्हणत होते कीं उद्यां आपला ख्रिस्ती धर्म जगांतील सर्व धर्मांत अग्रस्थान मिळवणार ! आणि हा रामकृष्णांचा पट्टशिष्य

भगवान् खिस्तदेवाच्या पवित्र भूमींत एका खोक्यांत उघड्यावर एकाकी झोप घेत होता. विधिलिखित कोणालाही चुकवितां येत नाहीं.

## मिसेस हेल यांची भेट : ८३ :

सकाळ झाली. स्वामी जागे झाले. उठून उभे राहिले. आतां काय करावें ? तोंड कुठें धुवावें ? स्वामी पुढें निघाले. संन्यासधर्माप्रमाणें त्यांनीं भिक्षा मागितली; पण कोठेंही भिक्षा मिळेना. कुणीही परिषदेचा पत्ता सांगेना. तोंड धुण्याकरतां पाण्याच्या नळाचा आश्रय मिळेना. गाडीवाले, मोटारवाले टवाळी करूं लागले. स्वामी दमले. एका झाडाला टेकून बसले. त्यांनीं कुमारी मेरी आणि येशू खिस्त यांचें श्रद्धापूर्वक स्मरण केलें. इतक्यांत समोरच्या बंगल्याची खिडकी उघडली गेली. एका बाईनीं स्वामींच्याकडे पाहिलें. त्या बाई रस्त्यावर आल्या. त्या परिषदेकडे निघण्याच्या बेतांत होत्या. स्वामींच्याकडे पहात त्या म्हणाल्या, "महाराज, आपल्याला धर्मपरिषदेला जावयाचें आहे काय ?" स्वामींनीं आपली सर्व कहाणी निवेदन केली. मिसेस हेल— त्या बाईचें नांव— म्हणाल्या, "स्वामी, आमच्या बंगल्यांत चला, आंघोळ करा, कपडे बदला, माझ्या घरांतील भोजनाचा स्वीकार करा. मग आपण धर्मपरिषदेच्या सभागृहांत जाऊं." स्वामींनीं त्या पाहुणचाराचा स्वीकार केला. आनंदाश्रूंनीं त्यांचे डोळे भरून आले. त्यांनीं हृदयस्थ परमेश्वराचें स्मरण केलें. अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशील दो करानें ? ।

## धर्मपरिषदेच्या मंडपांत : ८४ :

११ सप्टेंबर १८९३ या दिवशीं सकाळीं सर्वधर्मपरिषदेस सुरुवात झाली. या प्रसंगाचें वर्णन करतांना विनायकराव पेण्डसे म्हणतात कीं, " कोलंबस स्मारक मंदिरांत आर्ट पॅलेस नांवाचा प्रचंड मंडप उभारला होता. त्यांत सुमारें सहा सात हजार स्त्री-पुरुष बसले होते. सर्व बाजूंनीं

हंड्या व झुंबरें लटकत होतीं. देशोदेशींचीं निशाणें फडकत होतीं. सुमारें दोनशें लोकांना बसतां येईल असें व्यासपीठ उभारलें होतें. निरनिराळ्या धर्मांतील थोर थोर लोकांचे पुतळे तेथें उभे होते. व्यासपीठाच्या वरच्या बाजूस कोलंबस अमेरिकेच्या भूमीवर पहिलें पाऊल टाकीत आहे असें भव्य तैलचित्र टांगलें होतें.

" बरोबर दहा वाजतां परिषदेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. बरोज हे सभेचे अध्यक्ष कार्डिनल गिबन्स यांना बरोबर घेऊन सभागृहांत आले. अध्यक्ष सभागृहांत येतांच सर्वांनीं त्यांचें स्वागत केलें. अध्यक्षांच्या पाठोपाठ कार्डिनल मॅसारिक व अन्य प्रतिनिधी होते. ते सर्व घंटांच्या निनादांत काहींशा समारंभानें सभागृहांत श्रोत्यांना उजवी घालून व्यास-पीठावर जाऊन बसले. मध्यभागीं कार्डिनल गिबन्स हे आसनस्थ झाले होते. त्यांच्या उजव्या हाताला कार्डिनल मॅसारिक व ख्रिश्चन धर्मांतील निरनिराळ्या पंथोपपंथांतील धर्मगुरू मखमलीचे झगे पांघरून बसले होते. त्यांच्या डाव्या हाताला चीन, जपान, इराण, हिंदुस्थान इत्यादि पौर्वात्य देशांतील प्रतिनिधी दिसत होते."

डॉ. बरोज यांनीं प्रास्ताविक भाषण केलें. Lead Me Kindly Light ही प्रार्थना म्हटली. नंतर एका प्रतिनिधीला पुढें बोलावलें व परिचयात्मक प्रास्ताविक भाषण करण्यास सांगितलें. एकेक प्रतिनिधि आपल्या विशिष्ट पोशाकांत आणि ओढलेल्या आवाजांत पाठ केलेलें जडजंबाल भाषण म्हणून दाखवूं लागला. एक म्हणाला, " प्रौढप्रताप धर्मगुरु, लोकछन्दानुवर्ती स्वतंत्र राष्ट्रांतील धर्मधूरिण हो." दुसऱ्यानें आरंभ केला, " धर्मभास्कर तत्त्वविवेचक महानुभाव अध्यक्षमहाराज, विविध राष्ट्रांतील साधक आणि अमेरिकेंतील आदर्श लोकशाहींत वावर-णाऱ्या सुशिक्षित सभ्य स्त्रीपुरुष हो." हीं दोन भाषणें संपल्यावर तिसरा व्यासपीठाजवळ गेला आणि म्हणाला, " सर्वश्रेष्ठ आसनस्थ मूर्ते, पवित्र

धर्मतत्त्वांच्या अनभिषिक्त राजर्षे, हे सभाधिपते आणि देवभूमींतील देव-देवतांनो, प्राचीनतम अशा सर्वधर्मसहिष्णु भूमींतून आपला प्रसाद संपादन करण्यासाठीं आम्ही आलों आहोंत." तिसरें भाषण संपलें. अध्यक्षांनीं स्वामी विवेकानंदांना बोलण्यास पाचारण केलें. स्वामी म्हणाले, " आणखी कांहीं भाषणें होऊं द्या. " याप्रमाणें संध्याकाळपर्यंत चाललें होतें. स्वामींना बोलण्यास धीर होईना. त्यांचा घसा कोरडा पडला. डॉ. बरोज यांना वाटलें कीं स्वामी आज कांहीं बोलत नाहींत. शेवटीं त्यांनीं स्वामींना सांगितलें कीं तुम्हांला आतां बोललेंच पाहिजे.

## पहिलें भाषण : ८५ :

स्वामी आपल्या आसनावरून उठले. व्यासपीठाजवळ गेले. त्यांचा केशरी पोशाक आणि भगवा फेटा यांकडे सर्वांचें लक्ष लागलें. उंच देहयष्टि, मजबूत बांधा, कमलासारखे डोळे, ब्रह्मचर्याचें तेज यांमुळें सर्व श्रोते स्तब्धपणें पहात होते. स्वामी कसे दिसत होते हें सांगतांना रोमां रोलां म्हणतात, "He was tall, square shouldered, broad chested, stout, rather heavily built. His arms were muscular and trained to all kinds of sports. He had an olive complexion, a full face, vast forehead, strong jaw, a pair of magnificent eyes dark and prominent with heavy lids. Nothing escaped the magic of his glance. But his pre-eminent characteristic was kingliness."

स्वामींच्या समोर जगांतील सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि बसले होते. कवि, शास्त्रज्ञ, कलावन्त, तत्त्वज्ञानी, सेनानी, मुत्सद्दी, राजकारणी, धर्मज्ञ असे त्या त्या शाखांतील परिणतप्रज्ञ महर्षि विवेकानन्दांकडे पहात होते; पण स्वामींच्या तोंडून शब्द निघेना. टांचणी टाकली तर ऐकूं येईल इतकी गाढ शांतता निर्माण झाली. स्वामींनीं मागें वळून पाहिलें. त्यांच्या अन्तश्चक्षूंना असा भास झाला कीं तमसेच्या तीरावर तपश्चर्या करणारे व्यास

आणि वाल्मीकि, वसिष्ठ आणि वामदेव यांसारखे तपस्वी कापसासारख्या ढगांवर उभे राहून आपल्याकडे डोळे लावून बसले आहेत. त्या ऋषींच्या अलीकडे एका जराजीर्ण तपस्व्यानें आपला वरदहस्त पुढें केला. स्वामींच्या लक्षांत आलें कीं आपल्यामागें भगवान् रामकृष्ण परमहंस उभे आहेत.

विद्युत्संचार झाला. स्वामी विवेकानन्दांनीं समोर पाहिलें. रामकृष्णांचें आणि सरस्वतीचें स्मरण केलें आणि भाषणास सुरवात केली: " माझ्या अमेरिकेंतील बंधूंनो आणि भगिनींनो ! " –हे शब्द ऐकल्याबरोबर टाळ्यांचा कडकडाट झाला. कांहीं श्रोते बेहोष होऊन ' ओहोऽऽ ' असें ओरडले. कांहींनीं उभें राहून आपले हातरुमाल उंच केले. एका पौर्वात्य राष्ट्रसंतानें हृदयाच्या गाभार्‍यांतून निनादित केलेला तो भ्रातृभावनेचा उद्गार होता. ती लोकशाहीची ऋचा होती. सर्वधर्मपरिषदेंतील आधुनिक शाक्य मुनीची मानव्याची ललकारी होती. त्या शब्दांत पाठांतराचें अंतर नव्हतें; जडजंबाल शब्दांची घोडदौड नव्हती; खिस्ती धर्मातील खावंदांच्या चरणारविंदी मिलिंदायमान होणार्‍या गुलामाची लाचारी नव्हती. ते शब्द स्वामींच्या हृदयांतून आले आणि श्रोत्यांच्या हृदयांत ज़ाऊन पोंचले. श्रोत्यांनीं टाळ्यांचा कडकडाट थांबवल्यावर स्वामी म्हणाले, " भारतांतील संन्याशांचा वैदिक संप्रदाय वेदकाळापासून चालत आला आहे. त्या अतिप्राचीन संप्रदायाच्या वतीनें मी आपलें स्वागत करतों. हिंदुस्थान हें पुराणतम राष्ट्र आहे; त्या माझ्या राष्ट्राच्या वतीनें मी आपल्या बालराष्ट्राचें अभिनन्दन करतों. येथें सर्व धर्मांचे प्रतिनिधि जमले आहेत. देव सर्वत्र आहे आणि सर्व धर्मांत देवाकडे जाण्याचे मार्ग सांगितले आहेत. म्हणून भिन्नधर्मीयांनीं परस्परांचा द्वेष करण्याचें बिलकुल प्रयोजन नाहीं. हें सर्वसंग्राहक तत्त्व हिंदु धर्मानेंच सर्व धर्मांना शिकविलें आहे. सर्व धर्मांच्या मातृत्वाचा मान हिन्दु धर्माकडेच आहे. एक भक्त करुणासागर परमेश्वराला म्हणतो,

नद्या ओढे नाले मिळति समभावें जलधिला ।
असाधू वा साधू शरण रिघतां पावति तुला ॥

"I fervently hope that the bell tolled this morning in honour of this convention, may be the death knell of all fanaticism, of all persecution with the sword or with the pen." या सर्वधर्मपरिषदेनें एकांतिक मताचा अंत होईल. तरवारीनें किंवा लेखणीनें निर्माण केलेलें धर्मवेड आणि धार्मिक जुलूम सर्वसंग्राहक विचारामधें विरून जातील !

## कोट्यधीशाचा पाहुणचार : ८६ :

भाषण संपलें. वृत्ति सद्गदित होऊन स्वामी आपल्या आसनावर बसले. श्रोत्यांनीं त्यांच्या नांवाचा प्रचंड जयघोष केला. परिषदेचें वातावरण दैविक संचारानें भारून गेलें होतें. श्रोत्यांमधील द्वैताची भावना मावळली. ज्ञानप्रधान अद्वैताची भावना निर्माण झाली. विवेकानन्दांच्या अस्खलित भाषणांतील कळकळ, औदार्य, सारसंग्राहकबुद्धि आणि सर्वात्मभावना हें पाहून अमेरिकन राष्ट्र मंत्रमुग्ध झालें. अनेक श्रोत्यांनीं पुढें येऊन फुलें दिलीं, हार घातले. कित्येकांनीं भारावलेल्या अन्तःकरणानें या पौर्वात्य राष्ट्रसन्ताला नमस्कार केला. या गर्दींतून एक वृद्ध गृहस्थ पुढें आला. तो भक्तिभावानें म्हणाला, "स्वामीमहाराज, आज आपण माझ्याकडे रहाण्यास या. माझ्यावर हा अनुग्रह करा." स्वामींनीं तें आमंत्रण स्वीकारलें. रात्र झाली होती. स्वामी त्या गृहस्थांच्या मोटारींत बसले. काल ज्या ठिकाणीं त्यांना भिक्षा मिळणें अशक्य झालें होतें, ज्या रस्त्यावर वर्णद्वेषामुळें त्यांची हेटाळणी झाली होती, त्याच राजरस्त्यावरील एका सातमजली भव्य राजवाड्यांत मोटारीनें प्रवेश केला. स्वामींचा सत्कार करणारे वृद्ध गृहस्थ अमेरिकेंतील एक कोट्यधीश होते.

जेवण झालें. एका सुशोभित आणि भव्य दिवाणखान्यांत स्वामी येऊन पोंचले. कोट्यधीश म्हणाले, "महाराज, आतां शांतपणानें झोंप घ्या. Good night." स्वामी एकटेच राहिले. ते दमले होते तरी त्यांना झोंप येईना. सभोंवतीं इन्द्राचें ऐश्वर्य दिसत होतें; पण अन्तश्चक्षूंना भारताचें दैन्य आणि दारिद्र्य दिसत होतें. त्यांच्या हातांतील मऊ आणि ऊबदार उशी अश्रूंनीं भिजून गेली. स्वामी गच्चीमध्यें आले. त्यांनीं प्रार्थना केली, "हे कालीमाते, माझी भरतभूमि पारतंत्र्यांत आणि दारिद्र्यांत पिचत असतांना हे कीर्तीचे भारे घेऊन मी काय करूं? त्यांचें करुणाक्रन्दन कोण ऐकणार? त्यांच्या खपाटीं गेलेल्या पोटांत अन्नाचा घास कोण घालणार? विश्वजननी, मला मार्ग दाखीव" ही आर्त प्रार्थना संपल्यावर विदेही विवेकानन्द एका जाजमावर शांतपणें झोपीं गेले.

परिषद् पंधरा दिवस चालली होती. एक हजार निबंध वाचले गेले. कांहीं वेळीं श्रोते कंटाळत; उठून जाऊं लागत. अशा वेळीं अध्यक्ष उठून सांगत कीं आतां पांच वक्ते बोलल्यावर शेवटीं स्वामी विवेकानन्द बोलतील. असें सांगितल्यावर स्वामींचें भाषण ऐकण्याकरतां श्रोते इतर वक्त्यांचीं कंटाळवाणीं भाषणें ऐकत ताटकळत ऐकत बसत. न्यूयॉर्क हेरल्ड या पत्रानें लिहिलें कीं, He is undoubtedly the greatest figure in the Parliament of Religions. After hearing him, we feel how foolish it is to send missionaries to this learned nation.

## हिन्दु धर्म : ८७ :

१९ तारखेला हिंदु धर्म या विषयावर स्वामींनीं निबंध वाचला. स्वामी म्हणाले, "निरनिराळ्या धर्मकल्पनांचा उदय होतो तो एकच सत्य निरनिराळ्या प्रकारांनीं सिद्ध करतांना होतो. आत्मा स्वतंत्र, पवित्र,

अजर आणि अमर आहे. तो आत्मा स्थिरचर व्यापुनि दशांगुळें उरलेला आहे. तो एक असून अनेक दिसतो, अमर्याद असून समर्याद दिसतो, याचें कारण मायेचा आभास होय. आत्मप्राप्तिकरतां चित्तशुद्धि व्हावी लागते. या चित्तशुद्धीच्या पूर्णत्वाकरितां अनेक जन्म घ्यावे लागतात. आत्मा एक आहे असा साक्षात्कार झाल्यावर जगद्रूपानें तोच नटला आहे ही गोष्ट पटते. मी व माझें हें अहंकाराचें ओझें नष्ट झाल्यावर आत्मसाक्षात्कार होतो, आपल्या सर्वव्यापक व्यक्तित्वाची जाणीव होते, मृत्यूचें भय वाटत नाहीं, आणि मृत्यु म्हणजे काय तर एक शरीर सोडून दुसऱ्या शरीराचा आश्रय करणें.

अमेरिकन् बंधूनो आणि भगिनींनो, तुम्ही शाश्वत सुखाचे वारसदार आहांत. कोणीही हिंदु तुम्हांला पापात्मे म्हणणार नाहीं. तुम्ही परमेश्वराचीं लेकरें आहांत. तुम्ही नित्यानन्दस्वरूप आहां. प्रकृति तुमची दासी आहे. सर्व दृश्यांमधील जें सत्तत्त्व, तोच परमेश्वर. त्याचीं सगुण आणि निर्गुण अशीं दोन रूपें आहेत. अव्यभिचारी भक्तीनें त्याची प्राप्ति होते. द्वैताच्या पायावर उभारलेली भक्ति अद्वैतज्ञानांत समरस झाली कीं तिलाच मुक्ति म्हणतात.

हिंदु धर्म हा आत्मसाक्षात्काराचा धर्म आहे. अगदीं रानटी अवस्थेंतील मनुष्यापासून तों सुसंस्कृत मनुष्यापर्यंत सर्वांना अधिकारानुसार परमेश्वरप्राप्ति करून घेण्याचीं साधनें उपलब्ध असावीं लागतात. अशीं साधनें हिंदु धर्मांत उपलब्ध आहेत.

ज्या धर्माचें स्तोत्र आतां मीं तुमच्यापुढें गाइलें तो धर्म तुम्ही सर्व जगाला अर्पण करा म्हणजे सर्व जग तुमच्या मागोमाग आनंदानें येईल. अशोक आणि अकबर यांनीं हा प्रयत्न करून पाहिला. आज अमेरिकेचें महद्भाग्य समजलें पाहिजे कीं सर्व धर्मांमध्यें परमेश्वरप्राप्तीचे मार्ग सांगितले

आहेत व सर्वांचें ध्येय एकच आहे हें जगाला जाहीर करण्याचा मान या परिषदेच्या योगानें अमेरिकेला मिळाला आहे.

ज्याला बुद्धधर्मीय बुद्ध म्हणतात, यहुदी लोक जिहोवा म्हणतात, पारशी लोक अहूरमज्द म्हणतात, खिस्ती लोक आकाशांतील पिता म्हणतात आणि हिंदु लोक ब्रह्म असें संबोधतात, तोच तुम्हांला तुमची उदात्त कल्पना यशस्वी करून दाखविण्याचें सामर्थ्य देवो. हे अमेरिकन राष्ट्रा, तूं स्वातंत्र्याची भूमि आहेस. तुझा विजय असो. आधुनिक संस्कृतीच्या आघाडीवर एकतेचा विश्वध्वज हातीं घेऊन डौलानें दौड करण्याचें पवित्र कार्य त्या विश्वचालकानें तुझ्यावर सोंपविलें आहे. "

परिषद् संपली. स्वामींचें कार्य संपलें नाहीं. त्यांनीं हिंदु धर्माला अभिनव जन्म दिला. स्वामींनीं असा संदेश सांगितला कीं खोट्यापासून खऱ्याकडे मानवाची धाव नसून हिन्दुधर्मानुसार पायरीपायरीनें एकाहून एक वरचढ सत्य मानव गांठीत असतो. मनुष्याला देवाचा साक्षात्कार करून घेतां येतो. धार्मिक उन्नतीची पराकाष्ठा म्हणजेच मुक्ति. शतकाशतकांत अधिकारी महात्म्यांनीं शोधून काढलेल्या नियमांचें भांडार म्हणजे वेद. इष्टदेवतेची उपासना करण्याची मोकळीक हा या वैदिक मातृधर्माचा विशेष होय.

खिस्तानंतर पाश्चात्य देशांत धर्मप्रसाराकरितां गेलेले स्वामी हे पहिलेच आचार्य होत. त्यांच्या मुखानें भारताचा अंतरात्मा बोलत होता.

## आधुनिक शुकाचार्य : ८८ :

संयुक्त संस्थानांतील महत्त्वाच्या शहरांत स्वामींनीं व्याख्यानें दिलीं. त्यांचें अलौकिक वक्तृत्व ऐकण्यासाठीं लोकांच्या झुंडी जमूं लागल्या. एका शहरांत व्याख्यान संपल्यावर ते अतिथिगृहांत गेले. कांहीं वेळानें एक

मोटार तेथें आली. त्या मोटारींतून एका लक्षाधीशाची सौन्दर्यसंपन्न तरुण कन्या खालीं उतरली. ती स्वामींना भेटली. थोडा वेळ बोलणें झाल्यावर स्वामींना ती कशाकरतां आली आहे हें समजेना. शेवटीं स्वामींनीं विचारलें कीं, " माझी भेट घेण्याचा आपला उद्देश काय ? " ती रूप-संपन्न युवती तुटक शब्दांत बोलूं लागली. ती म्हणाली, " महाराज, मी आपली सर्व संपत्ति आणि माझा देह आपल्या चरणांवर अर्पण करण्यास आलें आहें. माझ्याशीं विवाह कराल काय ? " स्वामी म्हणाले, " माते, जगांतील सर्व महिला मी मातेप्रमाणें मानतों. भारतांतील अर्धपोटीं असणाऱ्या मातांची सेवा घडावी म्हणून मी येथें आलों. त्या कार्याला अमेरिकेंतून मला कांहीं मदत मिळेल अशी आशा आहे. " हें भाषण ऐकून त्या तरुणीनें शुकदेवाला वंदन केलें आणि विह्वल अंत:करणानें ती निघून गेली.

स्वामींचें वैभव कांहीं ख्रिस्ती धर्मगुरूंना बघवेना. त्यांनीं स्वामींची नालस्ती केली. त्यांच्याबद्दल अफवा उठविल्या. वर्तमानपत्रांतून लेख लिहिले. कांहीं स्त्रियांना पैसे देऊन स्वामींना भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. या सर्व विरोधाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. विरोध वाढल्यामुळें स्वामींची आध्यात्मिक शक्ति वाढत चालली. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं विचारलेल्या प्रश्नांना उत्तरें देतांना स्वामी म्हणाले, " जगामध्यें बुद्ध धर्माचा प्रसार झाला. त्याकरतां तरवारीचा उपयोग करण्यांत आला नाहीं. तुम्हीं तरवारीचा उपयोग करून ख्रिस्ती धर्म वाढविला. या देशांत धर्माच्या नांवाखालीं शुद्ध ढोंग चाललें आहे. आज येशू ख्रिस्त जर या अमेरिकेंत अवतरला तर डोकें टेकायला एक धोंडा सुद्धां त्याला मिळणार नाहीं. येशू ख्रिस्त हा आमच्यांतला होता; पौर्वात्य होता. त्याच्या दयामय चारित्र्याचें मर्म तुम्हां जडवाद्यांना कसें समजणार ?

## धैर्याची परीक्षा
: ८९ :

एका खेडेगांवांत पशुसंवर्धन करणारे कांहीं लोक होते. त्या रगेल आणि रंगेल लोकांनीं स्वामींची फजिती करण्याचें ठरविलें. त्याकरतां एक योजना तयार केली. नंतर गंभीरपणानें ते पशुसंवर्धक स्वामींना भेटले आणि म्हणाले, "महाराज, आमच्या गांवांत 'धर्माची आवश्यकता' या विषयावर आपण बोलावें अशीं विनंति आहे. स्वामींनीं तें मान्य केलें. ठरलेल्या वेळीं स्वामींना नेण्यास मोटार आली. स्वामी मोटारींतून त्या गांवांत पोंचले. एक मोठें खोकें पालथें घालून व्यासपीठ तयार केलें होतें. सभोंवतीं ते पशुसंवर्धक बसले. एका पशुपालानें ओळख करून दिली. स्वामींनीं व्याख्यानास आरंभ केला. स्वामी भाषणांत रंगून गेले. ते म्हणाले, "परमेश्वर सगळीकडे भरलेला आहे. तो ज्याचा पाठीराखा आहे त्याला कशाचीही भीति वाटण्याचें कारण नाहीं." याप्रमाणें व्याख्यानाचा ओघ चालला असतांना एका टवाळानें खूण केली. दुसरा स्वामींच्या मागें उभा राहिला. त्यानें कांहीं अंतरावरून पिस्तूल रोखलें आणि सहा गोळ्या उडवल्या. त्या गोळ्या स्वामींच्या कानाजवळून गेल्या. स्वामी दचकले नाहींत, हालले नाहींत. त्यांनीं शांतपणानें आपलें व्याख्यान संपविलें. व्यवस्थापक म्हणाले, "स्वामी विवेकानन्द मोठे वक्ते आहेत; तसेच ते साहसी आहेत. त्यांचें भाषण आम्हांला आवडलें; पण भाषणापेक्षां त्यांचें धैर्य अधिक बोलकें होतें."

## निग्रोंबद्दल भ्रातृभाव
: ९० :

दुसऱ्या एका शहरीं व्याख्यानाकरतां गेले. गांवांत गेल्यावर एका सलूनमध्यें दाढी करण्याकरतां गेले. स्वामी गोरे असले तरी अमेरिकन लोकांच्या दृष्टीनें काळेच दिसत. त्या सलूनचा मालक म्हणाला, "येथें निग्रोची दाढी केली जात नाहीं." हा वर्णद्वेष पाहून स्वामींना वाईट

वाटलें; पण 'मी निग्रो नाहीं' असें वाक्य त्यांच्या मुखांतून निघालें नाहीं. संध्याकाळीं त्यांचें व्याख्यान झालें. तें ऐकणाऱ्यांमध्यें तो सलूनचा मालक आला होता. व्याख्यान संपल्यावर तो स्वामींना भेटला व म्हणाला, " स्वामी, मला क्षमा करा. मीं तुम्हांला निग्रो समजून अपमान केला." स्वामींनीं त्याचे आभार मानले व ते स्टेशनवर गेले. तेथेंही अनेक लोकांनीं त्यांचा सत्कार केला. त्यांच्या गळ्यांत हार घातले. त्या स्टेशन-वर एक निग्रो पोर्टर काम करीत होता. तो मनांत म्हणाला, " एका विद्वान् निग्रोचा हे गोरे लोक सत्कार करीत आहेत. आमच्या निग्रो जातींतील हा थोर मनुष्य माझ्याशीं हस्तान्दोलन करील काय ? " असा विचार करीत गर्दींत घुसून तो स्वामींच्यापुढें उभा राहिला. स्वामींनीं त्याचें मनोगत ओळखलें. ' भाई ' अशी जिव्हाळ्यानें हांक मारून स्वामींनीं त्याच्याशीं हस्तान्दोलन केलें.

## माझा देश

: ९१ :

१४-२-१८९४ या दिवशीं डेट्राइट या शहरांत स्वामींचें व्याख्यान झालें. मिसेस मेरी सी. फंके ही एक खानदानी घराण्यांतील महिला होती. तिनें या व्याख्यानाबद्दल असें म्हटलें कीं, " १४-२-१८९४ रोजीं या महात्म्याचें, या अध्यात्मज्ञानकेसरीचें, मला दर्शन झालें. दोन वर्षांनंतर मीं त्यांचें शिष्यत्व स्वीकारलें. त्या व्याख्यानाला प्रचण्ड जन-समुदाय जमला होता. स्वामींची राजतेजसंपन्न मूर्ति व्याख्यानपीठावर येतांच टाळ्यांचा कडकडाट झाला. श्रोत्यांनीं उभें राहून त्यांचें मनःपूर्वक स्वागत केलें. त्यांचा आवाज सारंगीच्या स्वराप्रमाणें कर्णमधुर होता. श्रोत्यांमध्यें गंभीर शांतता निर्माण झाली. तेथें श्रोतृसमुदाय जमलेला नसून एकच श्रोता बसलेला आहे असा भास होऊं लागला. स्वामींच्या व्याख्यानांतील सर्वांनीं प्रशंसा केलेला मोठा गुण म्हणजे त्यांचा उत्कट

देशाभिमान होय. 'माझा देश' हे शब्द स्वामी अशा तऱ्हेनें उच्चारतात कीं ऐकणाऱ्याच्या हृदयाचें पाणी होऊन जातें. शिकागो-पासून न्यूयॉर्क-पर्यंत आणि बोस्टनपासून बाल्टिमोरपर्यंत स्वामींनीं परिभ्रमण केलें.

## मनाचे गूढ चमत्कार : ९२ :

या काळांत स्वामींना रोज सोळा तास काम करावें लागलें. मनावर अतिशय ताण पडला. कांहीं वेळीं उद्यांचे व्याख्यानांत कोणता विषय घ्यावा हें सुचेनासें होई. अशा वेळीं अप्रकट मनांत विचारांचा कोलाहल माजून जाई. या काळांत त्यांना मनाच्या गूढ शक्तीचे चमत्कार दिसून आले. ऐन मध्यरात्रीं त्यांना असा भास होई कीं कोणीतरी मोठ्यानें बोलत आहे, विचार सुचवीत आहे. दुसरे दिवशीं त्याच विचारांचा ते अनुवाद करीत. एखाद्या रात्रीं दूर अंतरावरून एक आवाज येई. कांहीं वेळानें तो आवाज त्यांच्या कानांजवळ येई. एकदां त्यांना वाटलें कीं आपल्या बिछान्याजवळ कोणीतरी उभें राहून अस्खलित व्याख्यान देत आहे. दुसऱ्या एखादे वेळीं दोन तत्त्वज्ञानी एखाद्या गहन सिद्धान्तावर वादविवाद करीत आहेत असें वाटे. पूर्वीं न ऐकलेल्या कल्पना ऐकूं येत. जागे झाल्याबरोबर स्वामी त्या कल्पनांचीं टिपणें करीत. एके दिवशीं सकाळीं स्वामी खोलीच्या बाहेर आले. शेजारचा एक गृहस्थ पुढें आला आणि म्हणाला, " स्वामी, काल रात्रीं तुम्ही एवढ्या जोरानें कोणाबरोबर वादविवाद करीत होतां ? आम्ही तर आश्चर्यचकित होऊन गेलों. " स्वामी म्हणाले, " हे आपल्याच गूढ शक्तीचे खेळ आहेत. " स्वामींच्या ठिकाणीं योगशक्तीचा विकास झाला होता. दूर अंतरावर घडणाऱ्या गोष्टी त्यांना सहज समजत. मनुष्याचा नुसता चेहेरा पाहिल्यावर त्याचें पूर्वचरित्र त्यांना समजे. पण या सिद्धीच्या जाळ्यांत स्वामी गुरफटून गेले नाहींत.

## बडानगरांतील गुरुबंधु : ९३ :

स्वामींच्या अमेरिकेंतील विद्युत्संचाराचीं वर्णनें हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालीं. सर्वधर्मपरिषदेंत त्यांचा जो जयजयकार झाला तो ऐकून जनतेच्या हृदयांत आनंदाचा सिंधु हेलावला. विवेकानन्दांचा सन्मान हा हिंदुस्थानाचा सन्मान. भरतखंडांत ठिकठिकाणीं लोकांनीं सभा भरवल्या; स्वामींचें अभिनन्दन केलें; अमेरिकेचे आभार मानले. सभेंत पास झालेले ठराव अमेरिकेंत पाठविले. एक थोर वक्ता म्हणाला कीं रोमनें तलवारीच्या जोरावर ग्रीस देश जिंकला; पण पुढें ग्रीक लोकांच्या कला, वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांचा स्वीकार केला. या दृष्टीनें ग्रीक लोकांनीं रोमन लोकांना जिंकलें. जितांनीं जेत्यांचा पराभव केला. त्याचप्रमाणें पाश्चिमात्यांनीं शस्त्रबलानें हिंदुस्थान जिंकलें आहे; पण स्वामी विवेकानन्दांनीं अध्यात्माचें शस्त्र घेऊन पाश्चिमात्यांचें मन जिंकलें आहे. बडानगर येथील मठांत रहाणाऱ्या स्वामींच्या गुरुबंधूंना परिषदेची माहिती समजली. त्यांचा आनंद गगनांत मावेना. त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. अष्टभाव जागृत झाले. रामकृष्णांचा बेटा नोरेन् त्रिखंडांत कीर्तिमान् झाला होता. हें भविष्य रामकृष्णांनीं पहिल्या भेटींतच केलें होतें. बडानगरांतील त्या प्रेमळ गुरुबंधूंनीं रामकृष्णांच्या फोटोला वंदन केलें आणि त्यांनीं गर्जना केली कीं, ‘जगद्गुरु श्रीरामकृष्ण परमहंस की जय !’

## अभ्यासाचे वर्ग : ९४ :

स्वामींनीं न्यूयॉर्कमध्यें अध्यात्मविद्येच्या अभ्यासाचे मोफत वर्ग सुरू केले. एका पथिकाश्रमांतील दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत हे वर्ग चालत. श्रोत्यांची संख्या वाढूं लागली. जागा पुरेना. कपड्यांचें कपाट, जेवण्याचें मेज, धुण्याचें पीप, सज्जा आणि जिना हीं सर्व

श्रोत्यांनीं भरून गेलीं. स्वामींच्या वक्तृत्वानें त्या खोलींतील कोनाकोपरा आणि श्रोत्यांचीं हृदयें भरून गेलीं. स्वामी म्हणाले, " अध्यात्मज्ञान ही विकत देतां येणारी वस्तु नव्हे. मानवाला हवी तितकी हवा विनामूल्य मिळते; त्याचप्रमाणें वेदान्तज्ञान विनामूल्य मिळालें पाहिजे. माझ्या पुण्यवान् राष्ट्रांतील, माझ्या परमप्रिय हिंदुस्थानांतील सांदीपनीसारखे गुरु विद्यार्थ्यांना आपल्याच घरीं जेऊं घालीत. ते आपल्या बोलण्यानें आणि कृतीनें वेदान्ताचें ज्ञान देत. त्यांनीं विद्यार्थ्यांकडून सुवर्णाची अपेक्षा केली नाहीं. श्रीकृष्णासारखे राजाधिराज आणि सुदामासारखे दरिद्री हे दोघेही भक्तियुक्त अंतःकरणानें गुरुगृहीं शिक्षण घेत. "

## म्लेच्छ या शब्दानें अधःपात झाला : ९५ :

या काळांत स्वामींनीं आपल्या गुरुबंधूंना पाठविलेलीं पत्रें उदात्त विचारांनीं रसरसलेलीं आहेत. त्या पत्रांत स्वामी लिहितात कीं, " गुरुबंधूंनो, परमेश्वरावर प्रेम करणारे लोक कोणत्याही धर्माचे असोत, मी त्यांच्या सेवेला सादर आहें. आगींत उडी घालावी लागली तरी चालेल, लोकांचीं मनें परमेश्वराकडे वळवा. आपल्या हीनदीन, वस्त्रहीन, अज्ञान, भुकेनें व्याकुळ झालेल्या अशा देशबांधवांच्याकरतां आपण प्रत्येकानें रात्रंदिवस ईश्वराची प्रार्थना करणें अगत्याचें आहे. या दीनदुबळ्यांनाच तुम्ही देवाप्रमाणें माना. जे रंजले आहेत, गांजले आहेत, त्यांना जो आपले म्हणतो, तोच संत होय. कोट्यवधी लोकांना पोटभर अन्न मिळत नाहीं. या संत्रस्त बांधवांच्यापुढें सुशिक्षित म्हणून मिरवणारे लोक देशद्रोही आहेत. एकमेकांना साह्य देण्याचें शिक्षण देणारी महान् संघटना स्थापन होणें जरूर आहे. हिंदी लोकांनीं म्लेच्छ हा शब्द ज्या दिवशीं शोधून काढला आणि परक्यांशीं संबंध ठेवणें ज्या दिवशीं बंद केलें त्याच दिवशीं हिंदुस्थानाच्या नाशाचें शिक्कामोर्तब झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. "

## राजयोगावरील प्रवचनें : ९६ :

१८९५ साल सुरू झालें. स्वामींनीं अनेकांना संन्यासदीक्षा दिली. याच वेळीं मद्रास येथें ब्रह्मवादिन् नांवाचें मासिक स्वामींच्या प्रेरणेनें सुरू करण्यांत आलें. अमेरिकेंत राजयोगावर प्रवचनें सुरू झालीं. अभ्यास-वर्गांतील शिष्यांनीं तीं टिपून घेतलीं. स्वामी म्हणाले, " राजयोग हा एक मोक्षमार्ग आहे. मनाची अस्वस्थता नाहींशी करणें, इंद्रियांना ताब्यांत ठेवणें आणि जीवनक्रम अध्यात्मपर बनविणें, हें राजयोगाचें ध्येय होय. साधकाची साधना मनोनिग्रहावर अवलंबून असते. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि ह्या मनोनिग्रह साध्य करणाऱ्या आठ प्रक्रिया आहेत. उत्कट ध्यान हें राजयोगाचे महत्त्वाचें अंग होय. ध्यान सिद्ध होऊं लागलें कीं सिद्धि प्राप्त होतात, मोहांत पाडूं लागतात. जे मोहांत न सांपडतां पुढें जातात त्यांना परमतत्त्वाचें सुख अनुभवण्यास सांपडतें. या अनुभवालाच निर्विकल्प समाधि असें म्हणतात.

## संन्याशाचें गाणें : ९७ :

१८९५ सालांतील जून महिना उजाडला. स्वामींना विश्रांति घेण्याची आवश्यकता भासूं लागली. त्यांच्याबरोबर बारा शिष्य होते. या प्रसंगाचें वर्णन करतांना एक शिष्या म्हणाली, " सेन्ट लॉरेन्स नदीच्या भव्य पात्रांत थाउजंड आयलंड पार्क या नांवाचें एक महाद्वीप आहे. या द्वीपांतील एका बंगल्यांत आम्ही स्वामींना घेऊन गेलों. तीनशें मैलांचा प्रवास करावा लागला. बंगल्यासभोंवतीं गर्द झाडी पसरलेली होती. पक्ष्यांचीं मंजुळ गाणीं, कीटकांचे किणकिण शब्द, वनलतांच्या पानांतून बाहेर पडणारे वायूचे मृदुमंद निःश्वास, नदीच्या वाहत्या पाण्यांत दिसणारें चंद्राचें प्रतिबिंब अशा वातावरणांत विश्रांतीकरतां आलेले स्वामी

अध्यात्माचे धडे देत. आमच्या आयुष्यांतील महद्भाग्याचे हे सात आठवडे केव्हां संपले हें समजलें सुद्धां नाहीं. पूर्ववयांत अध्यात्मज्ञानप्राप्तीसाठीं त्यांच्या जीवाला कशी तळमळ लागली होती हें आम्हांला समजलें. परमहंसांचा आत्माच स्वामींच्या मुखानें बोलत होता. बोलतां बोलतां स्वामींची तंद्री लागे. आम्ही त्यांच्यासमो बसलेले आहोंत याचें भानही ते विसरत. त्यांचे शब्द श्रोत्यांच्या अंतःकरणांत अग्निशलाकेनें लिहिल्याप्रमाणें वज्रलेप होऊन जात. वेदान्तसूत्रें, शंकराचार्य, रामानुज आणि मध्व यांचीं भाष्यें, नारदाचीं भक्तिसूत्रें, रामकृष्णपरमहंसांचें चरित्र, इत्यादि विषय स्वामींनीं आपल्या निरूपणांत सांगितले." मिसेस फंके या नांवाची एक महिला अनेक दिवसांचा प्रवास करीत एका काळोख्या रात्रीं धुमधार पाऊस पडत असतांना या महाद्वीपावर स्वामींना भेटण्यास आली. ती म्हणाली, "येशू ख्रिस्त पृथ्वीवर हयात असता तर त्याच्याकडे आम्ही ज्या भावनेनें गेलों असतों त्याच भावनेनें आम्ही आपल्याकडे आलों आहोंत." स्वामींनीं त्या बाईंना आपल्या आध्यात्मिक वर्गांत प्रवेश दिला. मूर्तिमंत ज्ञानाग्नि स्वामींच्या रूपानें पृथ्वीवर अवतरला होता. एके दिवशीं त्यागाचें महत्त्व हा विषय चालला होता. संन्याशाच्या स्वतंत्र वृत्तीचें वर्णन करतां करतां स्वामी खोलींत निघून गेले. त्यांनीं सहज स्फूर्तीनें एक 'संन्याशाचें गाणें' लिहिलें :

Strike off thy fetters, Bonds that bind thee down,
Of shining gold, or darker, baser ore;
Love, hate, good, bad, and all the dual throng,
Know, slave is slave, caressed or whipped or free:
For fetters, though of gold, or not less strong to bind,
Then, off with them. Sannyasin bold! say
"OM tat sat OM!"

They know not truth, who dream such vacant dreams,
As father, mother, children, wife and friend.
The sexless self ! Whose father He ? Whose child ?
Whose friend, whose foe is He who is but one ?
The self is all in all, none else exists;
And thou art that Sannyasin bold ! Say—
"OM tat sat OM !"

बारा कडव्यांचें हें प्रतिभासंपन्न भावगीत संन्याशांच्या विरागी ऐश्वर्याचें स्तोत्र आहे.

## गोपाळाची गोष्ट : ९८ :

याच वेळीं भक्तियोगांतील शुद्ध अंतःकरणाचें महत्त्व सांगतांना स्वामींनीं गोपाळाची गोष्ट सांगितली. महाद्वीपांत संध्याकाळचे सात वाजले होते. नदीवरील लाटा शांततेचा भंग करीत होत्या. भगवी कफनी घातलेले स्वामी एका आसनावर बसले. त्यांचे काळेभोर केंस इतस्ततः रुळत होते. शिष्यांना वाटलें कीं स्वामींच्या नीलकमलासारख्या डोळ्यांत आपल्याला अनंताचें दर्शन मिळत आहे. स्वामी म्हणाले, "बालपणांत ही गोष्ट मीं अनेक वेळां ऐकली. आज त्या बालभक्ताची गोष्ट तुम्हांला सांगावी असें मला वाटतें. गोपाळ नांवाचा एक ब्राह्मणाचा लहान मुलगा होता. त्याचे वडील वारले. आई देवावर भार घालून काळ कंठूं लागली. बालकृष्णाच्या ठिकाणीं तिची अनन्यभक्ति होती. ज्या स्वरूपांत आपण देवाची भक्ति करूं त्या स्वरूपांत देव आपल्याला दर्शन देतो असें श्रुतिवचन तिनें ऐकलें होतें. देव्हाऱ्यांतील बालकृष्णाची मूर्ति जणूं कांहीं सजीव आहे असें तिला वाटे. याच भक्तिभावामध्यें गोपाळ वाढत होता. गोपाळ सात वर्षांचा झाला. आईनें त्याला शाळेंत घातलें. गोपाळ म्हणाला, "आई, वाटेंत रानांतून शाळेंत एकटें जाण्याची मला भीति वाटते. इतर

मुलांच्याबरोबर नोकर असतात. माझ्याबरोबर कोण येणार ? " आईला हें ऐकून वाईट वाटलें. गोपाळाला पाटी घेऊन देण्याला सुद्धां तिच्या-जवळ पैसे नव्हते. तिच्या चित्तासमोर अंधार दिसूं लागला. इतक्यांत त्या अंधारांतून गोपाळकृष्णाची बालमूर्ति दिसूं लागली. ती मुलाला म्हणाली, " बाळ, भिऊं नकोस. या रानांत तुझा एक भाऊ रहातो. त्याचें नांव बन्सीधर. गोपाळ, तुला भीति वाटली तर तूं त्याला 'दादा' म्हणून हांक मार. तो तुला मदत करील. "

गोपाळ हा सश्रद्ध मातेचा मुलगा होता. आईच्या बोलण्यावर त्याचा दृढ विश्वास होता. पाटी घेऊन तो शाळेंत निघाला. रानांत भीति वाटूं लागली. तो म्हणाला, " दादा, लौकर ये. आईनें सांगितलें कीं तूं येथें आहेस. " झाडींतून शब्द आला कीं, " माझ्या लहानग्या भावा, भिऊं नकोस. मी तुझा पाठिराखा आहें. " कांहीं वेळानें एक बालमूर्ति झाडीं-तून बाहेर आली. कमरेला धोतर, खांद्यावर घोंगडी, एका हातांत वेळूची काठी, दुसऱ्या हातांत बांसरी, डोक्यावर मोरपिसांचा मुगुट अशा पोशाकांत तो झाडींतला दादा गोपाळाला घेऊन शाळेजवळ गेला. नंतर परत गेला.

शाळा सुटल्यावर गोपाळ घरीं आला. ' मला बांसरीवाला दादा भेटला ' असें त्यानें आईला सांगितलें. आपल्या मुलाला प्रत्यक्ष बाळ-कृष्णानें दर्शन दिलें हें पाहून आईच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. गोपाळाला मात्र आई किंवा शाळा यांपैकीं कोणाचीच आठवण होईना. त्याला दादाचा ध्यास लागला.

एके दिवशीं गुरुजींच्या घरीं कांहीं धार्मिक कृत्य होतें. वर्गांतील मुलांनीं गुरुजींना कांहीं वस्तु भेट देण्याचें ठरविलें. मुलें घरीं गेलीं. गोपाळ घरीं गेला. त्याला वाईट वाटलें. आपण गुरुजींना काय भेट

देणार ? तो आईला म्हणाला, "आई, उद्यां सकाळीं शाळेंत कसा जाऊं ? बरोबर काय नेऊं ?" आई म्हणाली, "बाळ, तुझ्या बांसरी-वाल्या दादाला विचार." गोपाळाला आनंद झाला. तो सकाळीं उठला. त्यानें तोंड धुतलें. आंघोळ केली. गंध लावलें. देव्हाऱ्यांतील मूर्तीला वंदन केलें. तो शाळेंत निघाला. मधें रान लागलें. त्यानें दादाला हांक मारली. बन्सीवाला दादा बाहेर आला आणि म्हणाला, "माझ्या लहानग्या भावा, मी तुझ्याजवळ असतांना तूं कष्टी कां ? तुला काय पाहिजे ?" गोपाळ म्हणाला, "दादा, मला गुरुजींना देण्यासाठीं कांहींतरी वस्तु दे." दादानें एक वाटीभर दूध दिलें. ती वाटी घेऊन गोपाळ शाळेंत गेला. गुरुजी आसनावर बसले होते. एका मुलानें परडीभर फुलें दिलीं. दुसऱ्यानें चंदनाची सहाण दिली. तिसऱ्यानें एक रेशमी शाल दिली. चवथ्यानें फळें अर्पण केलीं. एका मुलानें सुवर्णदक्षिणा दिली. एकानें तांदुळाचें गाठोडें पुढें ठेवलें. या सर्व देणग्या पाहून गोपाळ गोंधळून गेला. आपल्या भिकारड्या देणगीला कोण विचारणार ? मुलें आपल्याला हसतील. गुरुजी वाटींतलें दूध घेतील का ? "बांसरीवाल्या दादा, मी आतां काय रे करूं ?"—असा विचार करीत गोपाळ पुढें गेला. कांपऱ्या हातानें त्यानें ती वाटी गुरुजींच्या चरणांजवळ ठेवली. इतर मुलें खो खो हसूं लागलीं. गुरुजींनाही ती देणगी आवडली नाहीं. त्यांनीं ती दुधाची वाटी घेतली आणि एका मोठ्या पातेल्यांत ओतली. वाटी खालीं ठेवली. तों काय चमत्कार ! ती वाटी पुन्हां दुधानें भरून गेली. याप्रमाणें अनेक वेळां वाटी रिकामी केली. पातेलें दुधानें भरून गेलें. वाटी भरलेलीच होती. खो खो हसणाऱ्या टवाळ मुलांच्या ध्यानांत आलें कीं गोपाळानें सर्वांच्यापेक्षां वरचढ अशी देणगी आणली आहे. गोपाळ मात्र दुधाची वाटी देणाऱ्या दादाचें नामस्मरण करण्यांत दंग झाला होता. गुरुजी म्हणाले, "गोपाळ, हें दूध तुला कोणीं दिलें ?"

गोपाळ म्हणाला, " रानांत रहाणाऱ्या बांसरीवाल्या दादानें. " गुरुजी म्हणाले, " चल, मला तुझा बांसरीवाला दादा दाखव. "

गुरुजी आणि गोपाळ रानांत गेले. गोपाळनें दादाला हांका मारल्या; पण दादा बाहेर येईना. गोपाळ रडूं लागला. तो आर्तस्वरानें म्हणाला, " बांसरीवाल्या दादा, आजच असा अंत कां पहातोस ? तूं दिसला नाहींस तर गुरुजी मला खोटा ठरवतील. दादा, दादा ऽ ऽ लवकर धावत ये आणि गुरुजींना सांग कीं मींच ही दुधाची वाटी गोपाळाला दिली. " गोपाळाची ही आर्त प्रार्थना चालू असतांना झाडींतून एक गंभीर ध्वनि ऐकूं आला. बांसरीवाला दादा झाडींतून म्हणाला, " बाळ, तुझ्या आणि तुझ्या मातेच्या निर्मल भक्तीनें मी तुला भेटलों; पण तुझ्या गुरुजींना सांग कीं माझी भेट होण्यास त्यांना अनेक जन्म घ्यावे लागतील. "

## निर्भीड भाषण : ९९ :

स्वामी बोस्टन शहरांत आले. ' माझे सद्गुरु ' या विषयावर त्यांचें व्याख्यान ठरलें. संध्याकाळचे सहा वाजले. सभागृहाबाहेर मोटारींच्या रांगा उभ्या राहिल्या. व्यापारी, डॉक्टर, वकील, कलावन्त, इत्यादि वरच्या वर्गांतील श्रोते सभागृहांत आले. सभागृह कांठोकांठ भरून गेलें. स्वामी विवेकानन्दांनीं प्रवेश केला. श्रोत्यांनीं टाळ्या वाजवून स्वागत केलें. त्यांना वाटलें कीं आतां तासभर करमणूक होणार. स्वामी व्यास-पीठाजवळ उभे राहिले. त्यांनीं समोर पाहिलें. अधार्मिकता, विषयान्धता, सत्तामद, संशयी वृत्ति, स्वार्थीपणा इत्यादि दुर्गुणांनीं धुंद झालेले चेहरे पाहून स्वामींचा विचार बदलला. ते संतापले. त्यांना प्रसंगाचें भान राहिलें नाहीं. ते म्हणाले, " सभ्य स्त्री-पुरुष हो, रामकृष्णांचे चरित्र

ऐकण्याची तुमची पात्रता नाहीं. तुम्ही सत्तावारुणीनें धुंद झालेले आहांत. विहित आणि अविहित कर्म यांचा विचार तुमच्या ठिकाणीं नष्ट झाला आहे. कनक आणि कामिनी यांचा अनावर लोभ तुमच्या डोळ्यांतून ओसंडत आहे. अर्थवादानें तुमच्या जीवनांत अनर्थ निर्माण केला आहे. पावित्र्याची कल्पना तुम्हांला स्वप्नांतही करतां येणार नाहीं. जडवादाची आत्यंतिक उत्क्रान्ति हीच तुमची संस्कृति आहे. परलोकाचा विचारही तुमच्या चित्ताला शिवलेला नाहीं. येथें निग्रोंना ठार मारतात. ही तुमची भ्रातृभावना ! देह हाच तुमचा आत्मा आहे. इंद्रियांच्या लालसा पूर्ण करणें हीच तुमच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

श्रोत्यांना हे वाक्प्रहार असह्य झाले. हळू हळू जागा रिकाम्या होऊं लागल्या. कांहींनीं धि:कारयुक्त आवाज काढले. विरोधाच्या खडखडाटांत सभा संपली. दुसऱ्या दिवशीं कांहीं वर्तमानपत्रांनीं स्वामींना दोष दिला. पण कांहींनीं स्वामींची कळकळ आणि साहस यांची मुक्तकंठानें स्तुति केली.

## देवी भुवनेश्वरी : १०० :

याच सुमारास ‘ हिंदु स्त्रियांचें ध्येय ’ या विषयावर फक्त महिलांसाठीं व्याख्यान झालें. वेद, स्मृति, पुराणें व संस्कृत नाटकें यांच्या आधारानें स्वामींनीं आपला विषय रंगवला. शेवटीं शेवटीं मातृत्वाची महती सांगतांना स्वामींनीं भुवनेश्वरी मातेचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. स्वामी म्हणाले, “ मीं संन्यासाश्रम स्वीकारला. माझ्या मातृभूमीची सेवा केली. या कार्याचें सर्व श्रेय माझ्या मातेच्या, देवी भुवनेश्वरीच्या, नि:स्वार्थसेवेला आहे. माझी माता ही एक तपस्विनी आहे. तिच्या प्रेममय कर्तव्यनिष्ठेनें माझ्या स्वभावाची जोपासना झाली. एकदां एक व्रत करतांना तिनें चौदा दिवसांचा उपवास केला. तिचें शुद्ध चारित्र्य

आणि निःस्वार्थी प्रेम यांनीं माझ्या जीवनांतील प्रत्येक कार्यांत मला स्फूर्ति मिळालेली आहे."

या व्याख्यानांतील मातृप्रेमाचा श्रोत्यांवर फार परिणाम झाला. नाताळचा सण जवळ आला. त्यांनीं कुमारी मेरीच्या मांडीवर बाल येशू खिस्त खेळत आहे असें एक चित्र आणि एक पत्र भुवनेश्वरीला कलकत्त्याच्या पत्त्यावर पाठविलें.

१८९५ बोस्टन.

मातोश्री भुवनेश्वरी यांचे सेवेसी प्रणामपुरस्सर विज्ञापना—

आपण स्वामी विवेकानंदांची माता आहांत. नाताळच्या दिवसांत जगाच्या कल्याणाकरतां मेरीनें जगाला दिलेल्या पुत्राच्या नांवानें मोठा उत्सव करण्याचा आमचा रिवाज आहे. यंदाच्या उत्सवप्रसंगीं आम्हांला आपली आठवण उत्कटतेनें होत आहे. आपले भाग्यशाली चिरंजीव इल्लीं आमच्या संनिध आहेत. आपल्या अमृतोपम धर्मोपदेशानें आम्हांला शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखवीत आहेत. एका स्फूर्तिदायक व्याख्यानांत त्यांनीं हिंदु मातांच्या ध्येयाचें वर्णन केलें. आपल्या सर्व सत्कर्मांचें पुण्य स्वामींनीं आपल्या चरणीं वाहिलें. त्या वेळीं स्वामींचें हृदय सश्रद्ध मातृ-भक्तीनें ओसंडून चाललें होतें. त्यांच्या भाषणामुळें इतरांनाहि मातृभक्त होण्याची स्फूर्ति होईल.

देवी भुवनेश्वरी, स्वामी विवेकानन्दांच्या चारित्र्याचें संवर्धन करून आपण जगावर उपकार केले आहेत. ऐक्य आणि भ्रातृभाव यांची या जगामध्यें अभिवृद्धि व्हावी ही परमेश्वरी इच्छा सफल होण्याचा समय जवळ येत आहे याची आठवणही आपल्या चिरंजीवांनींच आम्हांला करून दिली. आपल्याला कृतज्ञतापूर्वक अनंत प्रणाम.

आपले विनम्र नागरिक

( बोस्टन शहर ).

## स्वामींचे कांहीं शिष्य : १०१ :

स्वामींनीं जगभर वेदान्ताचा प्रसार केला. या कार्यांत त्यांना शत्रु, मित्र, शिष्य आणि गुरुबंधु या सर्वांचें साहाय्य झालें. मिस् वाल्डो यांनीं स्वामींचें शिष्यत्व पत्करलें. त्या स्वामींचीं भांडीं घाशीत, सैंपाक करीत, आजारीपणांत शुश्रूषा करीत. राजयोगासारखा कठिण विषयही त्यांनीं आत्मसात् केला. स्वामींच्या गैरहजेरींत वेदान्ताचा प्रचार केला. स्वामींनीं त्या बाईचें ' हरिदासी ' असें नांव ठेवलें.

दुसरा शिष्य जे. गुडविन. हा तेवीस वर्षांचा तरुण एक निष्णात लघुलेखक होता. स्वामींचीं व्याख्यानें उतरून घेण्याकरतां तो पगारी नोकर म्हणून राहिला. पंधरा दिवस झाले. व्याख्यानांतील परातत्त्वाचा स्पर्श गुडविनच्या हृदयाला झाला. तो विवेकानन्दांना म्हणाला, " स्वामी-महाराज, मला पगार नको. माझा शिष्य म्हणून स्वीकार करा. " स्वामींनीं त्याला संन्यासाची दीक्षा दिली. स्वामींचीं भाषणें लघुलिपीनें लिहून घेणें, त्यांच्या वर्तमानपत्रांकरता प्रती करणें, स्वामींचीं व्याख्यानें ठरविणें, त्यांचा पत्रव्यवहार सांभाळणें, प्रवासाची तयारी करणें इत्यादि कामें रात्रंदिवस कष्ट करून गुडविन करीत असे. तो स्वामींच्याबरोबर हिंदुस्थानांत आला, आणि स्वामींच्या कार्याकरतां कष्ट करीत असतांना हा कट्टा कर्मयोगी सव्वीसाव्या वर्षीं अकालीं मरण पावला.

भगिनी ख्रिस्ताईन यांनीं कलकत्त्याला स्त्रीशिक्षणाचें कार्य केलें. मिस्टर आणि मिसेस सेव्हियर यांनीं मायावतीचा आश्रम चालविला. भगिनी निवेदिता ( मिस् मार्गरेट नोबल ) यांच्या कार्याची महती सांगावी तितकी थोडीच. स्वामींच्या संदेशाचें आणि अवतारकार्याचें महत्त्व त्यांनीं बरोबर ओळखलें. त्यांनीं हिंदु धर्माचा स्वीकार केला. आहार-विहार, आचारविचार, पोशाक इत्यादि दृष्टींनीं त्या हिंदुस्थानशीं समरस

झाल्या. या पुण्यभूमीला त्यांनीं आपली मातृभूमि मानलें. विवेकानन्दांच्या विचारांशीं त्या इतक्या समरस झालेल्या होत्या कीं त्यांनीं लिहिलेला लेख नांवाशिवाय प्रसिद्ध केला तर तो विवेकानन्दांनीं लिहिलेला आहे असें वाटे. विवेकानन्दांच्या चरित्राचें हृद्गत समजून घ्यावयाचें असेल तर My Master as I Saw HIM हा ग्रंथ वाचकानें वाचलाच पाहिजे. महादेवभाई देसाई हे ज्याप्रमाणें महात्माजींच्या विचारांशीं समरस झाले होते त्याप्रमाणें भगिनी निवेदिता विवेकानन्दांच्या विचारांशीं समरस झाल्या होत्या. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीचे प्रो. चेन म्हणतात, "'माय मास्टर ॲज आय सॉ हिम' या ग्रंथाची गणना जगांतील उत्कृष्ट धर्म-ग्रंथांमध्यें करण्यास मला बिलकुल संकोच वाटत नाहीं. सेन्ट ऑगास्टिनचें आत्मनिवेदन किंवा सबाटियरकृत सेन्ट फ्रान्सिसचें चरित्र यांच्याच जोडीला एकाच खणामध्यें बायबलादि पवित्र पुस्तकांच्या खालोखाल माझ्या ग्रंथसंग्रहालयांत मीं सदर ग्रंथाला स्थान दिलेलें आहे."

मिसेस ओलबुल, मिस म्यूलर, मिस्टर स्टर्डी, मिस मॅकलिऑड इत्यादि शिष्यांना असें वाटे कीं स्वामी हे अवतारी पुरुष आहेत. खिस्ताचा आत्मा नवीन देह धारण करून स्वामींच्या रूपानें आपल्याला दिसत आहे. याप्रमाणें अमेरिकेमध्यें आणि युरोपमध्यें स्वामींच्या असंख्य भक्तांची संख्या दिसून येत होती. अमेरिकेंतील वेदान्तप्रसाराचें कार्य आपल्या शिष्यांवर सोपवून स्वामी पॅरीसला गेले. नेपोलियनची स्मृति जागृत ठेवणारीं ऐतिहासिक स्मारकें त्यांनीं पाहिलीं. स्वामी लंडन शहरीं आले. आरंभीं त्यांच्या मनामध्यें इंग्रज लोकांबद्दल द्वेष धुमसत होता. पुढें अनुभवानें तो कमी झाला. इंग्रजांचें संघटित जीवन, राष्ट्रप्रेम आणि क्षत्रिय बाणा यांची स्वामींनीं मुक्तकंठानें स्तुति केली. १ मे १८९६ या दिवशीं लंडन शहरांत वेदान्ताच्या अभ्यासाचे वर्ग सुरू झाले. ज्ञानयोग या विषयावर स्वामींनीं व्याख्यानें दिलीं. ब्रह्मविद्याश्रमांत मिसेस

बेझंट यांनीं स्वामींना निमंत्रण दिलें. तेथें 'भक्ति' या विषयावर स्वामींचें व्याख्यान झालें. त्या वेळीं थिऑसॉफिकल सोसायटीचे एक संस्थापक कर्नल ऑल्कॉट हेही हजर होते.

## प्रो. मॅक्स मुल्लर : १०२ :

२८ मे १८९६ या दिवशीं ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटींतील मुल्लर यांनीं स्वामींना भेटीस बोलावलें. त्या भेटीचें वर्णन करतांना स्वामी म्हणतात, "प्रो. मॅक्स मुल्लर हे प्राच्यभाषाविशारद जर्मन पंडित एक लोकोत्तर पुरुष आहेत. मी त्यांच्या दर्शनाला गेलों होतों. प्रोफेसर-साहेबांच्या लहानशा घराभोंवतीं एक बाग होती. त्यांची सत्तरी उलटून गेली होती. त्यांचे केंस पांढरे शुभ्र झाले होते. सौम्य आणि शांत चेहऱ्यावर आध्यात्मिकता दिसत होती. त्यांच्या वृद्ध पत्नीही पतीच्या जीवनाशीं एकरूप झालेल्या दिसत होत्या. तेथलीं तीं झाडें व फुलें, तें स्वच्छ व निरभ्र आकाश, ती गंभीर शांतता अवलोकन केल्यावर आम्हांला असें वाटलें कीं आम्ही वसिष्ठ आणि अरुंधती यांच्या आश्रमांत आलों आहोंत. 'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याचा रोज अनुभव घेणारे प्रो. मॅक्स मुल्लर हे एक महात्मे आहेत. सर्व विश्वाशीं तादात्म्य पावण्याची त्यांच्या ठिकाणीं शक्ति आहे. हा विलक्षण बुद्धिमान् व निरलस पंडित गेलीं पन्नास वर्षें हिंदी विचारांच्या वातावरणांत श्वासोच्छ्वास करीत आहे. भारतीय संस्कृति त्यांच्या रोमरन्ध्रांत भिनून गेली आहे. रामकृष्ण-परमहंसांबद्दल प्रोफेसरसाहेबांना अतिशय आदर वाटत होता.

"भेट संपल्यावर आम्ही निघालों. आम्हांला पोंचविण्याकरतां ते आगगाडीच्या स्टेशनावरही आले होते. आम्हांला इतका सन्मान देण्याचें कारण आम्हीं त्यांना विचारलें तेव्हां ते म्हणाले, 'रामकृष्णपरमहंसांच्या शिष्यांची भेट होण्याचा योग कांहीं नेहमीं येत नसतो.'"

लंडन शहरांत रहात असतांना स्वामींच्या ठिकाणीं आध्यात्मिक वृत्तीचा प्रकर्ष झाला. प्राणिमात्रांविषयीं व वस्तुमात्रांविषयीं त्यांचें अंतः-करण प्रेमानें व सहानुभतीनें भरून गेलें. या सुमारास मि. लेगेट यांना लिहिलेल्या पत्रांत स्वामींचें हें विश्वप्रेम दिसून येतें.

## पापाची कल्पना ही भ्रामक आहे : १०३ :

६ जुलई १८९५.
लंडन.

मि. फ्रान्सिस एच्. लेगेट यांस सप्रेम आशीर्वाद.

हल्लीं व्याख्यानांचे वर्ग बंद केले. शरीर थकून गेलें आहे. या भूमींत शिकण्यासारखे धडे मी शांतपणें शिकत आहें. सैतानावरही प्रेम कर-ण्याला मी शिकत आहें. त्या मार्गावरही मी हळूहळू पावलें टाकीत आहें.

माझ्या वयाच्या विसाव्या वर्षीं मी सहानुभूतिशून्य असा माथेफिरू होतों; पण आज तेहेतिसाव्या वर्षीं माझ्यांत काय विलक्षण बदल झाला आहे पहा. आज विश्वयोषिता ज्या घरांत रहातात त्या घरांतही निंदेचें अवाक्षर न काढतां मी आनंदानें राहीन. पापाची कल्पनाही भ्रामक आहे असें माझ्या दृष्टीला दिसतें. ज्या प्रेमसागरानें मला जन्माला घातलें त्यानेंच माझ्या हातून घडणाऱ्या शुभाशुभ कृत्यांवर सारखी नजर ठेवली आहे. त्या सर्वशक्तिमान् प्रभूच्या हातांतील मी बाहुलें आहें. तो प्रेममय परमेश्वर विश्वरचनेच्या नाटकांत हास्याचे आणि शोकाचे प्रवेश दाखवीत असतो. या विश्वरूपी क्रीडांगणावर जगांतील विविध माणसें शाळेंतील मुलांप्रमाणें क्रीडा करीत असतात. हा सर्व ईश्वरी खेळ असल्यामुळें कोणाला वंदावें आणि कोणाला निंदावें ? प्रेम ही भावना वाचेच्या, विद्वत्तेच्या आणि बुद्धीच्या पलीकडे आहे. हे प्रेममद्याचे प्याले ओतप्रोत भरून टाक, म्हणजे ते पिऊन आपण ईश्वरी प्रेमानें वेडे होऊन जाऊं.

आपला
विवेकानन्द.

विश्रान्ति घेण्याकरतां स्वामी जिनिवाला गेले. मौन्ट ब्लँक पर्वत पाहिला. बर्फाची नदी ओलांडली. सेंट बर्नार्डच्या खिंडींतील मठांत विश्रांति घेतली. नंतर आल्प्स पर्वताजवळील एका खेड्यांत पंधरा दिवस मुक्काम केला. याच ठिकाणीं पहाडांतून जातांना स्वामींच्या हातांतील काठी निसटली. या वेळीं ते खोल दरींत पडले असते पण परमेश्वराच्या कृपेनें सांवरले. याच वाटेवर कुमारी मेरीचें देवालय लागलें. स्वामींनीं तिच्या चरणांवर फुलें वाहिलीं. स्वामी म्हणाले, " मेरी सुद्धां कालीमाताच आहे. " यानंतर स्वामींनीं जर्मनीमधील कांहीं सुप्रसिद्ध स्थळें पाहिलीं. कील युनिव्हर्सिटींतील संस्कृतचे प्रोफेसर श्री. डायसन् किंवा देवसेन यांची भेट घेतली. देवसेन पतिपत्नींच्या सहवासांत स्वामींचा काळ फार आनंदांत गेला.

स्वामी लंडन शहरांत परत आले. या वेळीं ' माया आणि मोह ', ' माया आणि देवत्वाच्या कल्पनेचा विकास, ', ' माया आणि स्वातंत्र्य ' या विषयांवर त्यांचीं अत्यंत परिणामकारक व्याख्यानें झालीं. पण अतिशय श्रमांचा ताण त्यांच्या देहाला सोसवेना. सत्कर्म झालें तरी तें कर्म आहे. तें बंधनकारक आहे, परब्रह्मप्राप्तीच्या आड येणारें आहे, ही परमहंसवृत्तीची विचारसरणी त्यांच्या अंतःकरणांत जोरानें उसळ्या मारूं लागली. या वेळीं लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतात, " कार्याला प्रारंभ करून देण्याचें काम मीं केलें आहे. तें शेवटाला नेण्याची जबाबदारी दुसऱ्यांनीं उचलली पाहिजे. द्रव्याला स्पर्श करणें किंवा मालमत्तेचा संग्रह करणें ही संन्याशाच्या दृष्टीनें अपवित्र असणारी गोष्टही कार्यारंभाकडे दृष्टि देऊन मीं कांहीं काळ केली; पण आतां माझें कांहीं कर्तव्य उरलें आहे असें मला वाटत नाहीं. ' नको या जगद्रूपी नरकाचा संसर्ग ' असें मला झालें असून त्याचा कायमचा त्याग करण्याची तयारी मीं चालविली आहे. "

## मस्त बैल धावून आला : १०४ :

अशा मन:स्थितींत असतांना एक दिवस एक मित्र, मिस् म्यूलर आणि स्वामी असे तिघे एका डोंगराळ प्रदेशांत फिरण्यास गेले. स्वामींनीं केशरी रंगाची कफनी घातली होती. डोक्याला भगवा साफा बांधला होता. वेळ सकाळची होती. पायरस्त्यानें जातां जातां एक कुरण लागलें. रमत गमत हे तिघेही चालले होते. इतक्यांत एक डुरकणी ऐकूं आली. तिघांनीं समोर पाहिलें. एक पांढऱ्या रंगाचा मोकळा सोडलेला मस्त पोळ हुंदड्या देत धावत येत होता. त्याचीं शिंगें बारीक पण टोंकदार होतीं. वाशिंड नसल्यामुळें त्याचा सपाट पृष्ठभाग पोसलेला दिसत होता. त्याच्या कपाळावर एक काळ्या रंगाचा बदामाच्या आकाराचा ठिपका होता. त्याचे डोळे तांबारले होते. खुरांनीं जमीन उकरीत, फुस्कार करीत, डुरकण्या फोडीत तो या प्रवाशांच्या अंगावर चालून आला. स्वामींच्या तांबड्या पोशाकाला तो बिचकला असावा. त्याला पाहून तो इंग्रज प्रवासी पळून गेला. एका शिलाखंडामागें लपला. मिस् म्यूलर घाबरून घसरून पडली. स्वामी मिस् म्यूलरला आपल्या पाठीशीं घेऊन उभे राहिले. त्यांना वाटलें कीं या नंदीची धडक बसतांच आपल्या देहाच्या चिंधड्या होतील. तसें झालें तरी चालेल पण एका अबलेचें संरक्षण झालें पाहिजे असा विचार करून दोन्ही हात छातीशीं बांधून स्वामी निश्चल नजरेनें त्या मस्त बैलाकडे पहात राहिले. तो धावत पुढें आला. दोन हातांवर एकदम थांबला. त्यानें मान वळवली व आला तितक्याच वेगांत निघून गेला. कैलासनाथाचें स्मरण करीत स्वामी शांतपणानें उभे होते.

## निरोपसमारंभ : १०५ :

१३ डिसेंबर १८९६ ही तारीख उजाडली. स्वामी हिंदुस्थानला परत जाणार म्हणून त्यांना निरोप देण्याकरतां लंडन शहरांत सभा भरली

होती. श्रोत्यांची गर्दी झाली. व्यासपीठ लतापल्लवांनीं सुशोभित केलें होतें. स्वामींचें दर्शन घडावें, त्यांचें भाषण ऐकण्यास मिळावें, त्यांच्या अंगांतील पवित्र कपड्यांना स्पर्श करावा, असे विचार त्या श्रोत्यांच्या मनांत येत होते. कांहींच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. हर्षविषादापासून मुक्त असणारे स्वामी अंबरवर्णाच्या पोशाकांत श्रोत्यांच्या जवळून ज्या वेळीं व्यासपीठाजवळ गेले त्या वेळीं सूर्यप्रकाशाचा एक झोत आपल्या अंगावरून गेल्यासारखें त्यांना वाटलें.

निरोपाचीं भाषणें सुरू झालीं. अध्यक्ष मि. स्टर्डी मानपत्र अर्पण करतांना म्हणाले, " स्वामी, वेदान्ततत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा आम्हां विद्यार्थीजनांस फार उपयोग झाला. धर्माचें रहस्य समजलें. आपण निःस्वार्थबुद्धीनें आरंभिलेल्या या उदात्त सत्कार्याबद्दल आम्ही आपणांस शतशः धन्यवाद देतों. आपण जाणार हें ऐकून आम्हांस तीव्र वेदना होत आहेत. हिंदुस्थानावर प्रेम करण्यास आपण आम्हांस शिकविलें. हिंदुस्थानला सर्व प्रकारें मदत करण्यास आम्ही तयार आहोंत."

मानपत्राला उत्तर देतांना स्वामी म्हणाले, " माझें शरीर जरी तुमच्यापासून दूर असलें तरी मनानें मी तुमच्याजवळ आहें. आध्यात्मिक संवेदनेच्या प्रदेशांत वियोगाच्या कल्पनेला थारा नाहीं. मी तुम्हांला लौकरच भेटेन."

मि. हॅमन्ड यांच्याजवळ स्वामी म्हणाले, "कोण जाणे ! इष्टप्राप्तीसाठीं कदाचित् प्रस्तुत शरीराचा उपाधि मला सोडून द्यावा लागेल. सर्वश्रेष्ठ सनातनधर्माचें ज्ञान जगांतील प्रत्येक मनुष्याला प्राप्त होईपर्यंत त्या ज्ञानाचा उपदेश करण्याचें काम मी बंद पडूं देणार नाहीं."

## मातृभूमिप्रेम : १०६ :

निरोपसमारंभानंतर स्वामींनीं रोम शहर व त्याच्या आसपासचा प्रदेश

पाहिला. ३० डिसेंबर १८९६ या दिवशीं स्वामींची बोट नेपल्सहून निघाली. स्वामी आनंदानें बेहोष झाले होते. एका इंग्रज मित्रानें विचारलें, "स्वामी, तुम्ही ऐश्वर्यशाली अशा पाश्चिमात्य देशांत चार वर्षें राहिलांत. आतां तुम्हांला तुमची मातृभूमि कशी आवडणार ?" स्वामी म्हणाले, "पूर्वीं हिंदुस्थानवर माझें निरतिशय प्रेम होतें; आज माझ्या मायभूमींतील नुसता रजःकणही मला पवित्र वाटतो. हिन्दुस्थानासारखें पुण्यक्षेत्र जगांत नाहीं असें मला वाटतें."

स्वामी क्षितिजापर्यंत पसरलेल्या समुद्राकडे डोळे लावून पहात होते. समुद्राच्या लाटा बोटीवर आपटून खळाळत परत जात होत्या. त्या लाटांच्याकडे पहातां पहातां स्वामी स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रमाणें म्हणाले असतील कीं,

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला
भूमातेच्या चरणतला तूं धूतां । मीं नित्य पाहिला होता
नभिं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा । मज भरतभूमिचा तारा
प्रासाद जिथें भव्य परी मज भारी । आइची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा । वनवास तिच्या जरि वनिंचा
भुलविणें व्यर्थ हें आतां
बहु जिवलग गमते चित्ता
तुज सरित्पते जी सरिता
तद्विरहाची शपथ घालितों तुजला । सागरा प्राण तळमळला ॥

## चिलमीचा झुरका : १०७ :

या विचारांत कांहीं दिवस निघून गेले. बोट एडनच्या बंदराला लागली. या ठिकाणाची स्मृति भारतवासीयांच्या अंतःकरणांतून जाणें शक्य नाहीं. या ठिकाणीं एका कारागृहांत प्रसिद्ध क्रान्तिकारक वासुदेव बळवंत फडके यांनीं स्वातंत्र्यदेवतेच्या चरणांवर आपलें जीवनपुष्प अर्पण केलें. एडनचें बंदर पाहिल्यावर स्वामींना वाटलें कीं आपण आतां

आपल्या लोकांत आलों. ते बोटीवरून खालीं उतरले. आपल्या शिष्यांना बरोबर घेऊन तीन मैलांवर असलेलीं तळीं पहाण्यास गेले. वाटेमध्यें एक हिंदी पानवाला हुक्का ओढीत बसला होता. स्वामींनीं आपल्या इंग्रज शिष्यांना मागें टाकलें. ते झपझप पावलें टाकीत पुढें गेले. फारां दिवसांनीं एक देशबंधु त्यांच्या दृष्टीस पडला होता. ते त्याच्याजवळ जाऊन बसले. निकटच्या आप्ताप्रमाणें त्याच्याशीं गप्पा मारूं लागले. कांहीं वेळानें स्वामी म्हणाले, " भय्या, चिलीम भर पाहूं. " त्यानें चिलमींत तंबाखू भरली. तळाशीं ओलें फडकें गुंडाळलें. स्वामींनीं उजव्या हाताचीं पांच बोटें उभीं करून ती चिलीम घेतली. डाव्या हाताच्या बोटांची पकड उजव्या पंजावर चढवली. पानवाल्यानें काडी पेटवून तंबाकूला लावली. स्वामींनीं डोळे मिटून रसकारयुक्त आवाजानें एक जोराचा झुरका मारला. तंबाकूनें पेट घेतला. धुराचे लोट वर जाऊं लागले. स्वामी विवेकानन्द एका हिंदी पानवाल्याच्या सहवासांत भर रस्त्यावर चिलमीचे झुरक्यावर झुरके मारण्यांत दंग झाले होते. इतक्यांत त्यांचे इंग्रज शिष्य तेथें आले आणि थट्टेनें म्हणाले, " वा महाराज, आपण या चिलमींतील धुराच्या लोभानें आम्हांला सोडून इकडे आलांत वाटतें ! "

१५ जानेवारी १८९७ या दिवशीं स्वामींची बोट कोलंबोला पोंचली. हजारों लोक बंदरावर उभे होते. त्यांनीं स्वामींच्या चरणधूलीला स्पर्श केला. घराघरावर निशाणें फडकत होतीं. दोन मैल पायघड्या घातल्या होत्या. राव आणि रंक, सुशिक्षित अशिक्षित, तरुण आणि वरुण या सर्वांनीं स्वामींना भेट म्हणून फळें आणि फुलें अर्पण केलीं. स्वामींचा राजाप्रमाणें सत्कार केला. सीझर, अलेक्झँडर आणि नेपोलियन इत्यादि सेनापतींनीं तरवारीच्या जोरावर जग जिंकलें पण स्वामींनीं अद्वैतसिद्धान्ताचा प्रचार करून विश्वप्रेमाच्या बळावर पौर्वात्य आणि पाश्चिमात्य जगावर स्वामित्व मिळविलें.

## लोक रुळावर पडले : १०८ :

स्वामी कोलंबोहून कँडी येथें पोंचले. तेथून त्यांनीं जाफनाला प्रयाण केलें. नंतर सिलोनमधील अनुराधापूर हें पुरातन शहर पाहिलें. रामनदच्या दरबारांत पोंचेपर्यंत स्वतः राजेसाहेब स्वामींच्या रथापुढें पायीं चालत होते. पुढील मुक्काम मदुरेला झाला. मदुरेपासून त्रिचनापल्लीपर्यंत प्रत्येक स्टेशनवर हजारों लोक स्वागत करीत होते. प्रत्येक ठिकाणच्या मानपत्राला उत्तर देतांना स्वामींचा आवाज बसून गेला. मद्रासच्या अलीकडे दोन स्टेशनें गाडी येत होती. लहान स्टेशनांवर मेल थांबत नाहीं; पण लोकांनीं स्टेशन मास्तरला विनंति केली कीं गाडी थांबवा. त्यानें ती विनंति अमान्य केली. गाडी येत आहे असें दिसतांच लोक रुळावर आडवे पडले. स्टेशन मास्तराची छाती धडधडूं लागली. इतक्यांत प्रसंगावधान ठेवून गार्डानें गाडी थांबविली. स्वामी खालीं उतरले. लोकांनीं त्यांच्यावर फुलें उधळलीं. नंतर स्वामींच्या जयजयकारांत गाडी मद्रासकडे निघाली. उत्साहाची परमावधि मद्रास-मधील सत्कारांत झाली. शहरवासीयांनीं सतरा भव्य कमानी उभारल्या. घोडे सोडून दिले. लोकांनीं भक्तिभावानें स्वामींच्या गाडीचें सारथ्य केलें. तोफांची सलामी दिली. निरनिराळ्या भाषांत चोवीस मानपत्रें दिलीं. सबंद शहर एक आवाजानें स्वामींचा जयजयकार करीत होतें. हा स्वामींचा सत्कार नव्हता तर भारतांतील आध्यात्मिक वृत्तीचा सत्कार होता. In India religious life forms the centre, the key-note of the whole music of national life.

## भारताचा भविष्यकाल : १०९ :

मद्रासमधील मानपत्रांना उत्तर देतांना 'वेदान्ताचा हेतु', 'आपला भविष्यकाल' इत्यादि विषयांवरील महत्त्वाचीं व्याख्यानें स्वामींनीं दिलीं.

ते म्हणाले, "माझ्या भारतीय बंधुभगिनींनो, शारीरिक दुर्बलता हें आपल्या विनाशाचें एक कारण आहे. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । What we want is vigour in the blood, iron muscles and nerves of steel. पौरुष तुमच्या रोमरोमांत खेळूं लागलें तरच उपनिषद्ग्रंथ आणि आत्म्याची उज्ज्वलता यांचें खरें स्वरूप तुमच्या ध्यानांत येईल. तुमचें सामर्थ्य धुळीला मिळालें आहे. आत्मश्रद्धा नष्ट झाली आहे. म्हणून 'शिवोऽहं शिवोऽहं' या मंत्राचा जप करा. प्रत्येक व्यक्तीमध्यें दिव्यत्व आहे. म्हणून आपल्या हीन दीन परित्यक्त अशा देशबांधवांची सेवा हीच ईश्वराची सेवा हें लक्षांत ठेवा. जगांतील लुलेपांगळे, दीनदरिद्री, वेडे आणि खुळे, रोगी आणि महारोगी, पतित आणि पातकी हे सर्व आपल्या मुक्तीसाठींच निर्माण झालेले आहेत. त्यांची सेवा करण्याची तुम्हांला संधि मिळाली म्हणून ईश्वराचे आभार माना. सर्व जग प्रकाशमय करून सोडा.

पण याकरितां शिक्षणाची जरूरी आहे. What is education? Is it book learning? No. The training by which the current and expression of will are brought under control and become fruitful is called education. Education is not amount of information that is put into your brain and runs riot there, undigested, all your life. We must have life-building, man-making, character-making, assimilation of ideas. चारित्र्यसंवर्धन करतें, आत्मविश्वास निर्माण करतें, मर्द मानवाची निर्मिति करतें, तें शिक्षण; पण सध्यां मुलगा शाळेंत गेला कीं तो असें शिकतो कीं माझी आई अडाणी आहे, माझा बाप मूर्ख आहे, माझा आजा तर वेडा होता, माझे गुरु दांभिक आहेत, आणि माझे जुने धर्मग्रंथ बाष्कळ बडबडीनें भरलेले आहेत. या नकारात्मक ज्ञानामुळें स्वतंत्र आणि शोधक बुद्धीचा विद्यार्थी निर्माण होत नाहीं.

म्हणून भारतांतील लक्षावधी मुलांमुलींच्याकरतां लक्ष लावून काम करणारीं गुरुकुलें निर्माण झालीं पाहिजेत.

झोपीं गेलेल्या ज्वालामुखीच्या शिखरावर आज सारें पाश्चात्य जग बसलें आहे. जडवादाचा भयंकर धिंगाणा जगावर चालू आहे. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राशीं युद्ध करतें त्या वेळीं मानवाच्या अंगीं पशुत्वाचा संचार होतो. या जडवादाचा पराजय करण्यास एक अद्वैतज्ञानच समर्थ आहे. तोच आपला ठेवा आहे. इतर धर्म एका व्यक्तीनें निर्माण केले. म्हणून त्यांत गुणदोष आढळतात. हिंदुधर्म हा ऋषिप्रणीत धर्म आहे. तो एका व्यक्तीनें निर्माण केला नाहीं. बौद्ध धर्म हें हिंदु धर्माचें एक बंडखोर बालक आहे आणि खिस्तीधर्म हें बौद्धधर्माचें गोंधळविजा अनुकरण आहे.

प्रत्येकाचें सामर्थ्य त्याच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे. भारताची उन्नति व्हावी अशी तुमची इच्छा असेल तर तीस कोटी इच्छाशक्तींचें समीकरण झालें पाहिजे. या प्रबल आणि पवित्र इच्छाशक्तींचें एक तेजोवलय निर्माण केलें पाहिजे. अथर्ववेदसंहितेंतील एक ऋचा असें सांगते कीं, 'तुम्ही सर्व एकचित्ताचे व्हा. तुम्हां सर्वांच्या हृदयांत एकाच प्रकारचे विचार असूं द्या.' लक्षावधी उपासकांच्या संघटनेंत समाजाच्या सामर्थ्याचें रहस्य सांठविलेलें आहे. भरतभूमीच्या लेकरांनो, जागे व्हा, उठा आणि वेदान्ततत्त्वज्ञानानें जग जिंकण्यासाठीं दण्ड आणि कमण्डलू घेऊन सज्ज रहा."

## रामकृष्ण मिशन स्थापन झालें : ११० :

२८ फेब्रुवारी १८९७ रोजीं स्वामी कलकत्त्याला पोंचले. राजे-महाराजे, पंडित, हुद्देदार आणि प्रतिष्ठित नागरिक या सर्वांनीं स्वामींचें एखाद्या सम्राटाप्रमाणें स्वागत केलें. स्वामींनीं उत्तरादाखल केलेलें भाषण ज्वलन्त राष्ट्रभक्ति आणि अस्खलित वक्तृत्व यांचा नमुना होता. या

भाषणानंतर स्वामी बडानगर येथील गुरुबंधूंना भेटण्यास गेले. त्यांना स्वामींना पाहून आनंद झाला. त्यांना संन्यासधर्म पाळून वैयक्तिक मुक्ति पाहिजे होती. राष्ट्रसेवेची कल्पना त्यांना पसंत पडेना. स्वामी म्हणाले, "आपल्याला श्रीरामकृष्णांनीं सांगितलें तें विसरलांत का? वैयक्तिक मुक्ति हा सुद्धां स्वार्थ आहे. दरिद्रीनारायणाच्या सेवेमध्यें जीवनाचें सार्थक आहे. " Of the Swami's numerous achievements one of the greatest was the conversion of his Gurubhais from the individualistic to the national idea of religious life in which public spirit and service to followmen occupied a prominent place." १ मे १८९७ रोजीं बलराम बोस यांचे घरीं स्वामींचे गुरुबंधू आणि इतर भक्त यांनीं एक सभा भरवली. त्या सभेंत सर्वांच्या संमतीनें रामकृष्ण मिशन स्थापन झालें. तपश्चर्या आणि सेवा करीत असतांना चारी खंडांत वेदान्तज्ञानाचा प्रसार कसा करावयाचा याबद्दल आराखडा तयार झाला.

स्वामी मठांत रहात असतांना त्यांचे बालमित्र बाबू प्रियनाथसिंह हे त्यांना भेटण्यास आले. बोलणें सुरू झाल्यावर कांहीं वेळानें स्वामींनीं बोलण्याचा ओघ 'प्राणायाम' या विषयाकडे वळविला. सुमारें चार तास या विषयाचें विवरण केलें. परत जातांना बाबूजी म्हणाले, "स्वामी, प्राणायाम या विषयावर माहिती मिळविण्याकरतांच मी तुमच्याकडे आलों होतों." स्वामी म्हणाले, "तें मीं योगसामर्थ्यानें तुम्ही आल्याबरोबर ओळखलें होतें." बाबूजी म्हणाले, "आपल्या पूर्वजन्माची स्मृति आपल्याला आहे काय?" स्वामी म्हणाले, "होय, आहे; पण त्याबद्दल सांगणें योग्य नाहीं. तो सिद्धीचा दुरुपयोग होईल."

## लोभी सावकाराचें पिशाच : १११ :

यानंतर दोन तीन दिवस गेले. रात्रीं आठ वाजण्याची वेळ होती.

विवेकानन्द आणि इतर गुरुबंधू बोलत बसले होते. प्रेमानन्द स्वामींच्या डाव्या बाजूला होते. एक लहानसा कंदील लुकलुकत होता. उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत अर्धवट अंधार होता. स्वामी एका संस्कृत ग्रंथाबद्दल कांहीं बोलत होते. बोलतां बोलतां ते एकदम स्तब्ध झाले. प्रेमानन्दांनीं विचारलें, "स्वामी, बोलतांना मधेंच कां थांबलांत ?" स्वामी उजव्या बाजूच्या कोपऱ्याकडे पहात स्वस्थ बसले होते. कांहीं वेळानें ते म्हणाले, "प्रेमानन्द, तुम्हांला या कोपऱ्यांत कांहीं दिसलें नाहीं ?" प्रेमानन्द म्हणाले, "आम्हांला ती दृष्टिच नाहीं. तुम्हांला काय दिसलें ?" स्वामी म्हणाले, "मला या कोपऱ्यांत मस्तक नसलेलें एक भुताचें धड उभें दिसलें. त्यानें हात जोडले आणि मला विनंति केली कीं, 'स्वामी, या भूतयोनींतून माझी मुक्तता करा.' त्याची ती केविलवाणी स्थिति पाहून मला फार वाईट वाटलें. पण हें भूत कोणाचें आहे हें आपल्याला समजेल का ?"

या बोलण्यानंतर भुतांच्याबद्दल खऱ्या खोट्या गप्पा सुरू झाल्या. स्वामींनीं त्यांत भाग घेतला नाहीं. इतक्यांत गुरुबंधु बाहेर गेला. त्यानें शेजारच्या घरांत तपास केला आणि त्या मस्तकहीन पिशाच्चाचें पूर्वचरित्र स्वामींना सांगण्याकरतां तो धावत आला. तो म्हणाला,

"स्वामी, या घरांत एक सावकार रहात होता. तो भयकारी व्याज घेऊन पैसे उसने देत असे. त्याच्याकडून एका गरीब पण धाडसी मनुष्यानें कर्ज काढलें. कांहीं वर्षांनीं त्या पैशाची दामदुप्पट झाली. दिलेल्या रकमेच्या पावत्याही सावकारानें दिल्या नाहींत. सावकारानें फिर्याद केली. त्या गरीब मनुष्याचा संसार लिलावांत निघाला. त्याचा तळतळाट झाला. अनेक गरिबांचीं घरें सावकारानें घशांत घातलीं होतीं. एके रात्रीं तो गरीब पण धाडसी मनुष्य सावकाराच्या घरांत एक सुरा

घेऊन आला. त्यानें त्या सुऱ्यानें सावकाराचें मस्तक धडापासून वेगळें केलें. तोच लोभी सावकार तुम्हांला भुताच्या रूपानें दिसला असावा." हा इतिहास ऐकून स्वामींना वाईट वाटलें. ते दुसऱ्या दिवशीं नदीवर गेले. आंघोळ केली. त्यांनीं सूर्याला अर्घ्य दिलें, व कालीमातेला प्रार्थना केली कीं, "हे माते, या लोभी सावकाराला झाली इतकी शिक्षा पुरे. याच्या शिरविरहित पिशाच्चाला आतां गति देऊन टाक. त्याला मुक्त कर." या प्रार्थनेनंतर त्या भुताची मुक्तता झाली. त्याचा कोणालाही त्रास झाला नाहीं.

## एक महत्त्वाचें पत्र : ११२ :

प्रकृति सुधारण्याकरतां स्वामी अलमोरा येथें गेले. १८९८ साल सुरू झालें होतें. व्याख्यानें, प्रवचनें, दौरे, गांठीभेटी, पत्रें, ग्रंथलेखन हें चालूच होतें. एका बाजूला त्यांच्या विधायक कार्याबद्दल ओव्या रचल्या जात होत्या तर दुसऱ्या बाजूला अमेरिकन मिशनरी त्यांना शिव्या देत होते. या वेळीं लिहिलेल्या पत्रांत स्वामी म्हणतात, " आध्यात्मिकतेच्या बाबतींत जगांतील कोणत्याही राष्ट्राचें तेज हिंदुस्थानापुढें पडणें शक्य नाहीं. पण सज्जनांनीं हालअपेष्टा भोगाव्या आणि बदमाशांनीं ऐष-आरामांत लोळावें हा नियम प्रस्तुतच्या पशुतुल्य जगांत रूढ झाला आहे. पाश्चात्य लोक शास्त्रीय शोधांमध्यें कितीही पुढें गेले तरी उपयोग काय ? आध्यात्मिक विद्येचा ओनामाही त्यांना माहीत नाहीं. चढाओढ आणि अघोरी महत्त्वाकांक्षा हीं भौतिक सुधारणेचीं कटु फळें आहेत. हीं फळें चाखणारें राष्ट्र धुळीला मिळतें.

सर्व जग स्वार्थाच्या मागें लागलें आहे. प्रेम करावयाचें स्वार्थाकरतां, अब्रूला जपायचें स्वार्थाकरतां, फार काय पण जगावयाचेंही स्वार्थाकरतांच. पण माझ्याबद्दल मी असें सांगेन कीं माझें एकही कृत्य स्वार्थानें प्रेरित

होऊन मीं केलें नाहीं. एखादें दुष्ट कृत्य माझ्या हातून घडलें असलें तरी तेंही स्वार्थामुळें घडलेलें नाहीं.

माझा स्वाभाविक कल अभ्यासाकडे आहे. कोठें तरी एकान्तांत शांतपणें बसावें, अध्ययन करावें, मनन करावें, चिंतन करावें, असें मला वाटतें. ही माझी नैसर्गिक प्रवृत्ति आहे; पण केवळ जगन्मातेच्या आज्ञेमुळें मला या व्यवसायांत पडावें लागलें.

माझे कांहीं केंस पांढरे झाले आहेत. कृतान्तकटकामलध्वजजरा दिसों लागली. आतां फार तर तीन चार वर्षेंच माझें आयुष्य शिल्लक आहे. बहुजनसमाजाची उन्नति साधण्याचें कार्य सुरू झालें आहे. आतां मी सुखानें प्राण सोडण्यास तयार आहें. जगांतील कोणत्याही राष्ट्रांतील व धर्मांतील दरिद्री, पापी, दु:खी आणि कष्टी लोकांची अंत:करणपूर्वक सेवा करून त्यांचा उद्धार करणें हें मी माझें पवित्रतम कर्तव्य समजतों."

## निसर्गरम्य काश्मीर : ११३ :

याच वेळीं काश्मीरमधील अनेक संस्थांतून त्यांना पत्रें आलीं कीं, " स्वामीमहाराज, आमच्या प्रांतांत या आणि आपल्या दर्शनानें आम्हांला कृतार्थ करा." सदर विनंतीला मान देण्याचें स्वामींनीं ठरविलें. आलमोरा, भीमताल, काथगोदाम या ठिकाणांहून प्रवास करीत स्वामी बरेलीला पोंचले. अंगांत ताप होता तरी आर्यसमाजानें चालविलेलें एक अनाथगृह पहाण्यास गेले. तेथें विद्यार्थ्यांना उद्देशून अतिशय उद्बोधक असें एक व्याख्यान झालें. त्यांत स्वामी म्हणाले कीं, " आत्म्याची सुधारणा हा सर्व सुधारणांचा आत्मा आहे. "

बरेलीहून अंबाल्यास मुक्काम झाला. त्या ठिकाणीं हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याचें निदर्शक असें एक विद्यालय आहे. स्वामींनीं त्या विद्यालयाला

भेट दिली. त्यानंतर अमृतसर, रावळपिंडी येथील प्रवास संपल्यावर स्वामी काश्मीरकडे निघाले. भारताच्या नंदनवनांत त्यांनीं प्रवेश केला.

तेथील निसर्गशोभा कालिदासाच्या शकुंतलेप्रमाणें आकर्षक होती. रूपांत अप्सरेचा अंश आहे, पण मुद्रेवर तपस्तेज खेळतें तें मात्र पित्याचें. स्वामी पुढें चालूं लागले. हिरव्या निळ्या रंगांचीं मैलोमैल विस्तारलेलीं खोरीं उन्हांत चमकूं लागलीं. अनंत हस्तांनीं दहिवराचें अर्घ्यदान देणाऱ्या ऋषितुल्य देवदारांचा मंत्रघोष ऐकूं आला. हिममंडित गगनचुंबी पर्वतांच्या कटिखांद्यांवरून रजतनील निर्झर नागाप्रमाणें उड्या टाकीत चालले होते. तृणपुष्पांकित हिरवळीचे गालिचे सृष्टिसुंदरीनें हळुवार हातानें उलगडले होते. स्वामी तेथील एका खेड्यांत पोंचले. खेडुतांच्या कारागिरीनें ते स्तिमित झाले; पण त्यांचें दैन्य आणि अज्ञान पाहून स्वामींच्या डोळ्यांत पाणी आलें.

निसर्गरम्य काश्मीर पाहून स्वामींना आनंद झाला. सृष्टिशोभेची उदात्तता, शुचिता, भीषणता आणि कमनीयता पाहून त्यांचें मन ईश्वराचें चिंतन करूं लागलें. रसिकत्वाला परतत्त्वाची जोड दिल्याशिवाय भारतीय आत्म्याचें समाधान होत नाहीं. स्वामी एका पर्वतामधून वाटचाल करीत होते. त्यांचा शिष्य सदानंद मागून येत होता. पहाट झाली. कोवळ्या उन्हांत सारी सृष्टि कांचनाचें तुषारस्नान करूं लागली. दरीचें सौन्दर्य बाजूनें घोंघावत जाणाऱ्या नदीप्रमाणें यौवन उधळीत होतें. पर्वतांच्या शिखरांवर गगनचुंबी देवदारांच्या रांगा उभ्या होत्या. आजूबाजूचे उंचवटे थिजलेल्या हिरव्या लाटांप्रमाणें भासत होते. घनदाट वृक्ष अमृताचीं नि:श्वसनें सोडीत आहेत आणि निरामयतेनें सगळा अवकाश भरून टाकीत आहेत असा प्रत्यय आला. स्वामी एक मोठी चढण चढून पुढें आले. त्या ठिकाणीं पर्वतांच्या घळींत सांचलेल्या बर्फाचे अजस्र थर दिसूं लागले. कुठें त्यांना तडे गेले होते, कुठें भगदाडें पडलीं

होतीं. कुठें त्या भगदाडांतून मदोन्मत्त नद्या खळाळत होत्या. कांहीं पर्वत गालिच्यासारख्या दाट गुबगुबित हिरवळीनें आच्छादलेले होते. नक्षत्रांचा सडा पडावा तशीं विविध आकाराचीं आणि वर्णांचीं तृणपुष्पें त्या हिरवळीवर उमललीं होतीं.

बडामुल्ला, श्रीनगर हीं शहरें आणि या मार्गावरील ऐतिहासिक स्थळें पहात पहात स्वामी जम्मूला पोंचले. काश्मीरच्या महाराजांची भेट झाली. तीन तास मुलाखत चालली होती. धर्म आणि रूढी याबद्दल बोलणें निघालें. स्वामी म्हणाले, "खऱ्या धर्माचा लोप झाला. वेडगळ रूढी वळावल्या. समुद्रप्रवास करूं नको, या लोकांना शिवूं नको, त्या लोकांच्या पंक्तीला बसूं नको, मंगळवारीं रुसूं नको, शनिवारीं हसूं नको, असल्या आचरट आज्ञा धर्माच्या नांवाखालीं थैमान घालूं लागल्या. राष्ट्रधर्माचा लोप झाला म्हणून आपण सातशें वर्षें गुलामगिरींत पडलों. व्यभिचारासारखीं अघोर पातकें केलीं तरी आपली जात बिघडत नाहीं पण खाण्यापिण्यांत जात बिघडते. हें सर्व बदललें पाहिजे. आपले प्रचारक युरोप आणि अमेरिका येथें पाठविले पाहिजेत.

यानंतर प्रचण्ड उंचीवर असलेल्या अमरनाथांच्या गुहेंत स्वामींनीं प्रवेश केला. तेथील हिमलिंगाचें दर्शन घेतलें. या वेळीं स्वामींनीं फक्त कौपीन धारण केली होती. अंगाला विभूति लावली होती. स्वामींचें हृदय भक्तिभावांत विरघळून गेलें आणि त्यांना शंकराचें दर्शन झालें.

## कालीमातेचा बालक : ११४ :

या दर्शनानंतर त्यांना कालीमातेचा ध्यास लागला. स्वामी म्हणाले, "कालीमातेच्या गळ्यांत रुंडमाला घातली आहे. भूकंप, ज्वालामुखी, दुष्टपणा, तमोमयता, परमावधीचें दुःख, सैतानी वृत्ति या सर्वांमध्यें कालीमातेला पहाण्यास शिका. मरणांत अमरपण मिळतें. कालीमातेचा

शाप हें वरदान होय. अंत:करणाच्या श्मशानांतील चिता पेटवा. गर्व, स्वार्थ आणि आशा हे तीन शत्रू त्या चितेमध्यें जाळून टाका म्हणजे कालीमातेची भेट होईल. मला कालीमातेनें दर्शन दिलें. कोणीं हल्ला केला तर मी मातेचें रक्षण करणार का माता माझें रक्षण करणार? माझा राष्ट्राभिमान संपला. मी कालीमातेचा बालक आहें."

## अमेरिकेचा दुसरा प्रवास : ११५ :

स्वामी २० जून १८९९ रोजीं अमेरिकेस निघाले. भगिनी निवेदिता आणि तुरीयानन्द हेही बरोबर होते. तेथें अखंडानंदांचें कार्य तन्मयतेनें चालू होतें. न्यू यॉर्क येथें तुरीयानन्दाची स्थापना झाली. सांताक्लारा येथें १६० एकर जमीन मिळाली. तेथें आश्रम सुरू केला. पण हें सर्व चालू असतांना स्वामी निर्गुणनिराकार अशा ईश्वराच्या चिंतनांत निमग्न झाले होते. ते एका पत्रांत लिहितात, "मी पुन्हां बालक झालों आहें. चळवळ, प्रवास, कांहीं नको. मला रामकृष्णांचा जराजर्जर आवाज पुन्हां ऐकूं येत आहे." पुन्हां प्रवास सुरू झाला. पॅरीस, कान्स्टॅंटिनोपल हीं शहरें पाहिलीं. पण त्यांना आनंद वाटत नव्हता. ते जड जगाला कंटाळले होते, विटले होते. १९०० सालच्या जुलई महिन्यांत स्वामी पॅरिसला गेले. त्यांनीं फ्रेंच भाषेचा अभ्यास केला. फ्रान्समधील ऐतिहासिक धर्मपरिषदेंत भाग घेतला. शरीर काम करीत होतें; पण स्वामींचा आत्मा कशांतच भाग घेत नव्हता. He seemed world weary. एकदम स्वामींना अनंताची हांक ऐकूं आली. पहिल्या बोटीनें १९०० सालच्या डिसेंबर महिन्यांत ते हिन्दुस्थानांत आले. रोमां रोलां म्हणतात, "He brought his body back to the funeral pyre."

स्वामी मायावतीच्या अद्वैत आश्रमांत गेले. त्यांचे पाश्चिमात्य शिष्य सेव्हियर वेदान्ताचें कार्य करीत असतां कैलासवासी झाले. स्वामींनीं

श्रीमती सेव्हियर यांचें सान्त्वन केलें. त्या आश्रमांत स्वामींना आस्थम्यामुळें गुदमरल्यासारखें झालें. यानंतर स्वामी आपल्या आईला भेटले. तिच्याबरोबर पूर्वबंगाल आणि आसाम येथील धर्मक्षेत्रें पाहिलीं. आई कलकत्त्याला घरीं गेली. स्वामी १९०२ च्या आरंभीं बेलूर मठांत पोंचले. या वेळीं स्वामींच्या जीवनयात्रेचें एकोणचाळीसावें वर्ष सुरू झालें.

## बेलूर मठांतील दिनचर्या : ११६ :

१९०२ या वर्षाचा फेब्रुवारी महिना सुरू झाला. स्वामी सकाळीं उठले. मुखमार्जन केलें. त्यांचा आवडता कुत्रा शेपूट हालवीत पुढें आला. हा कुत्रा ग्रहणाच्या वेळीं स्वामींच्याबरोबर गंगेंत आंघोळ करीत असे. स्वामी पुढें गेले. एक करडूं धावत आलें. त्याच वेळीं एक हरिणबालक त्याच्याशीं स्पर्धा करीत आश्रमाला फेऱ्या घालूं लागलें. स्वामी भांडें घेऊन एका शेळीजवळ गेले आणि म्हणाले, "मला चहापुरतें दूध देतेस का?" स्वामींनीं दूध काढलें. चहा करून घेतला. बशींत थोडासा कुत्र्याला दिला. नंतर ते त्या छोट्या करडाबरोबर शिवाशिवी खेळूं लागले. अमेरिकेच्या धर्मपरिषदेंत गर्जना करणारा वनराज एका लहानग्या करडाबरोबर शिवाशिवीचा खेळ खेळूं लागला.

१९०२ चा मार्च महिना सुरू झाला. स्वामींच्या पायांला सूज आली. जलोदराचा विकार सुरू झाला. वैद्यांनीं कडक पथ्य सांगितलें. स्वामींनीं त्यांच्या सांगण्याप्रमाणें अनेक दिवस पाण्याला स्पर्श केला नाहीं. पण रोग हटेना. मधुमेहही शरीरांत घर करून बसला होता. हे सर्व रोग पोटांत ठेवून स्वामी मठांत येणाऱ्या सर्व जिज्ञासूंना धर्मरहस्य सांगत होते.

## तीर्थामुळें ताप उतरला : ११७ :

निर्भयानंद हा मठांतील एक संन्यासी आजारी पडला. त्याचा ताप १०६ डिग्रीपर्यंत वाढला. स्वामी त्याची सेवा करीत होते. त्यांना एकदम

कल्पना स्फुरली. ते धावत एका खोलींत गेले. तेथें एका चांदीच्या भांड्यांत रामकृष्णांच्या अस्थी ठेवलेल्या होत्या. स्वामी विवेकानंदांनीं त्या अस्थींच्या भांड्यांत पाणी ओतलें. तें पाणी कपांत घेतलें. रामकृष्णांचें स्मरण केलें आणि तें तीर्थ निर्भयानन्दाला दिलें. अर्ध्या तासानंतर निर्भयानन्द निर्भय झाला. त्याचा ताप उतरला. स्वामी विवेकानन्द म्हणाले, " श्रीरामकृष्ण आपल्यांतच वावरत आहेत, आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. "

## दरिद्रीनारायणास भोजन : ११८ :

याच वेळीं कांहीं मजूर मठाच्या बागेंत कामाला बोलावले होते. स्वामी त्यांच्यामध्यें जाऊन बसत, त्यांच्याशीं समरस होऊन त्यांच्या सुखदु:खांचा विचार करीत. त्यांमध्यें केस्ता नांवाच्या एका म्हाताऱ्याशीं स्वामी बोलत होते. बोलतां बोलतां तो थांबला आणि म्हणाला, " स्वामी, तुम्ही मठांत जा. मी तुम्हांला आमचीं दु:खें सांगणार नाहीं; कारण तीं ऐकून तुम्ही रडूं लागतां." स्वामी मठांत गेले. दुसऱ्या दिवशीं स्वामींनीं सर्व मजुरांना पक्वान्नाचें भोजन दिलें. जेवण चालू असतांना स्वामी म्हणाले, " आज मठामध्यें दरिद्रीनारायण भोजनास आला आहे."

## विश्वकोशाचे दहा भाग वाचले : ११९ :

१९०२ चा एप्रिल महिना सुरू झाला. स्वामींच्या टेबलावर इंग्रजी विश्वकोशाची नवी आवृत्ति दिसत होती. स्वामींचा शिष्य शरच्चन्द्र म्हणाला, " हे पंचवीस भाग एका जन्मांत वाचून होणार नाहींत. " स्वामी म्हणाले, " यांतले दहा भाग मीं वाचले आहेत. वाचलेल्या भागांतील कोणताही प्रश्न तूं मला विचार. " शरच्चन्द्रानें विश्वकोशाचीं पानें उलटून मधून मधून कांहीं प्रश्न विचारले. स्वामींनीं त्यांचीं बरोबर उत्तरें दिलीं. तें पाहून शरच्चन्द्र म्हणाला, " मला हें मानवाच्या बुद्धीपलीकडचें

आहे असें वाटतें." स्वामी म्हणाले, "असें वाचन करणें प्रत्येकाला शक्य आहे; पण कायेनें, वाचेनें आणि मनानें ब्रह्मचर्याचें पालन झालें पाहिजे. त्याला अध्ययनाची आणि एकाग्रतेची जोड मिळाली कीं कोणताही शास्त्रीय ग्रंथ सहज आत्मसात् करतां येईल. सध्यां हें ब्रह्मचर्याचें व्रत कोणी पाळीत नाहीं म्हणून राष्ट्र निस्तेज झालें आहे...." हें भाषण चालू असतांना दुसरा शिष्य तेथें आला आणि शरच्चन्द्राला म्हणाला, "स्वामी इतके आजारी असतांना तूं त्यांना बोलायला लावतोस काय?" शरच्चन्द्राला वाईट वाटलें. स्वामी म्हणाले, "शिष्यांना उपदेश करतां करतां माझा देह झिजून गेला तरी चालेल."

## मठांतील शिस्त : १२० :

स्वामी नियमितपणानें सर्वांच्याबरोबर ध्यानाला बसत. वेदान्ताचे पाठ घेत. आश्रमांतील खोल्या झाडलेल्या नसल्यास स्वतः केरसुणी घेऊन काम करीत. कांहीं वेळीं स्वतः सैंपाक करीत. ते जितके प्रेमळ तितकेच कडक. एके दिवशीं ध्यानाच्या वेळीं बरेच शिष्य उपस्थित नव्हते. स्वामींनीं त्यांना बोलावलें. त्यांची हजेरी घेतली, आणि म्हणाले कीं, "आज तुम्हांला मठांत भोजन मिळणार नाहीं. बाहेर जाऊन भिक्षा मागा आणि झाडाखालीं सैंपाक करून जेवा." शिष्य भिक्षा मागण्यास गेले. स्वामींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. सांदीपनी गुरूच्या आश्रमाप्रमाणें कुलगुरु विवेकानन्दांचा आश्रम चालला होता.

## स्वामींनीं मठाचें काम दुसऱ्यावर सोपविलें : १२१ :

१९०२ चा मे महिना संपला. स्वामी म्हणाले, "मीं प्रत्येक ठिकाणीं पुढाकार घेणें बरोबर नाहीं. गुरु सारखा पुढाकार घेतील तर शिष्यांचा नाश होईल. मी आतां लवकरच यात्रेला निघणार आहें. आतां मठाची

व्यवस्था तुम्हीं पहा." हे शब्द ऐकल्यावर गुरुबंधूंना रडूं कोसळलें. यानंतर स्वामी विवेकानन्द गंगेच्या कांठीं फिरावयास गेले. डोक्याचें मुंडन केलेलें, अंगाला विभूति फासलेली, कमरेला छाटी गुंडाळलेली, पायांत कांहीं नाहीं, सर्वसंगपरित्याग केलेला, अशी ती स्वामींची कृश मूर्ति अनंताकडे डोळे लावून पिसाटासारखी फिरतांना पाहून शिष्यांचीं अंतःकरणें दुभंग झालीं. शिष्यांना असा भास होत होता कीं आपल्या-समोर एक प्रचंड तेज वावरत आहे आणि स्वामींचें जर्जर शरीर त्या तेजाची छाया आहे.

## दहनाची जागा दाखविली : १२२ :

१९०२ चा जून महिना संपला. स्वामी विवेकानंदांना या मायिक जगाचा विसर पडला होता. रामकृष्णपरमहंस आणि कालीमाता हीं देवतें त्यांना दिसत होतीं. स्वामी थरथरत्या पावलांनीं आपल्या खोलींत गेले. त्यांनीं १९०२ सालचें कॅलेंडर पाहाण्यास मागितलें. एका शिष्यानें एक कॅलेंडर स्वामींच्या हातांत दिलें. स्वामींनीं तें चाळून पाहिलें. थोडा विचार केला आणि १९०२ सालांतील जुलई महिन्यांत चार तारखेला तांबड्या पेन्सिलीनें खूण केली. शांतपणानें तें कॅलेंडर एका खिळ्याला लावून ठेवलें. नंतर स्वामी बाहेर आले. गंगेच्या दिशेनें चालूं लागले. एक शिष्य त्यांच्याबरोबर होता. स्वामींनीं गंगेच्या कांठाजवळील सहा फूट लांब व तीन फूट रुंद असलेली एक जागा त्याला दाखवली आणि म्हणाले, " मीं देहाचा त्याग केल्यावर या जागीं माझ्या देहाचें दहन करा. " हें भाषण ऐकल्यावर तो शिष्य रडूं लागला. स्वामींनीं त्याचें सांत्वन केलें. दुसऱ्या दिवशीं स्वामींनीं पहाटे ध्यान केलें. सकाळीं संस्कृत शिकविलें. त्यांचा आवडता कुत्रा पायांजवळ बसून त्यांचें व्याख्यान ऐकत होता, आणि डोळ्यांच्या पापण्या न हालवतां स्वामींच्या

डोळ्यांकडे पहात होता. अकरा वाजले. जेवणाची वेळ झाली. स्वामींना उपास होता. स्वामींनीं त्या शिष्याला स्वतः वाढलें. त्याचें जेवण झाल्या-वर त्याच्या हातावर पाणी घातलें आणि टॉवेलानें त्याचें हात पुसले. तो शिष्य म्हणाला, " हें काय करतां ? वास्तविक मीं आपली सेवा करा-वयाची." स्वामी म्हणाले, " येशू खिस्तानें मरणापूर्वीं आपल्या शिष्यांचे पाय धुतले होते. "

## ४ जुलई १९०२ : १२३ :

१९०२ सालांतील जुलई महिन्याची ४ तारीख सुरू झाली. सूर्य वर आला. त्याच्याभोंवतीं ढग आले. स्वामींचा कुत्रा कांहींतरी लागल्या-प्रमाणें विव्हळत होता. स्वामींनीं आंघोळ केली. प्रसन्न मुखानें चहा घेतला. आकाशांतील सूर्य निस्तेज दिसत होता; पण रोगजर्जर स्वामींच्या डोळ्यांत सूर्याचें तेज चमकत होतें. स्वामी आपल्या खोलींत गेले. राम-कृष्णांच्या फोटोसमोर सिद्धासन घालून बसले. दृष्टि नासिकेच्या अग्रावर केन्द्रित केली आणि ' चिदानन्दरूपः शिवोऽहम् शिवोऽहम् । ' असा जप सुरू केला. अकरा वाजेपर्यंत परावाणीनें हृदयाच्या गाभाऱ्यांत या मंत्राचा घोष चालला होता. यानंतर स्वामींनीं कालीमातेला उद्देशून एक गाणें म्हटलें. त्याचा आशय असा होता कीं, " हे कालीमाते, तुझी आठ-वण झाल्यावर माझें हृदयकमल उमलूं लागतें. "

स्वामीं तें गाणें गुणगुणत बाहेर आले. अंगणांत हिंडूं लागले. एक शिष्य पलीकडे उभा होता. स्वामींच्या मनांतील विचार बाहेर उसळून आले. ते म्हणाले, " दुसरा विवेकानन्द जन्माला आला तरच तो पहिल्या विवेकानन्दानें काय कार्य केलें हें सांगूं शकेल. आणि तरी सुद्धां योग्य वेळीं किती तरी विवेकानन्द निर्माण होतील ! "

बारा वाजले. जेवणाची वेळ झाली. नेहमीं एकटे बसून जेवणारे स्वामी सर्व गुरुबंधूंच्या बरोबर जेवण्यास बसले. बोलत बोलत भुरके

मारीत जेवण चाललें होतें. सर्व पदार्थ चवीनें खात होते. आपले गुरुजी आज इतक्या चवीनें जेवत आहेत हें पाहून शिष्यांना आश्चर्य वाटलें; पण गुरुजींनीं विश्वमाउलीची भेट घेण्याकरितां महाप्रस्थान ठेवलें आहे हें कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं.

## १ ते ४ वेदान्ताच्या वर्गांत शिकविलें : १२४ :

जेवण झाल्यावर स्वामी म्हणाले, "सुधानंद, वाचनालयांत जाऊन शुक्लयजुर्वेद हें पुस्तक घेऊन ये." पुस्तक आणल्यावर 'सुषुम्णः सूर्यरश्मिः' या श्लोकाचें स्वामींनीं विवरण केलें. एक वाजतां स्वामींचा वेदान्तवर्ग सुरू झाला. वर्गाची खोली तत्त्वज्ञानविचारांनीं आणि संन्याशांनीं भरून गेली. लघुकौमुदी या व्याकरणावरील पुस्तकाचा पाठ झाला. तत्त्वज्ञानांतील एक शंका शिष्यानें विचारली. समर्पक उत्तर मिळालें. नंतर अभ्यास करतांना टिपणें कशीं करावीं याची चर्चा सुरू झाली. स्वामी म्हणाले, "दाशरथी संन्याल नांवाचा माझा एक वर्गमित्र होता. परीक्षा जवळ आली. त्याची 'इंग्रजांचा इतिहास' या विषयाची तयारी नव्हती. आम्हीं रात्रीं आठपासून पहाटे पांच वाजेपर्यंत अभ्यास केला. महत्त्वाचे मुद्दे काढले. सामाजिक, आर्थिक, वैय्यापारिक, भौतिक आणि आत्मिक या दृष्टींनीं त्या मुद्यांची चर्चा केली. विषय तयार झाला. माझा वर्गमित्र इतिहासांत वरच्या वर्गाचे मार्क मिळवून पास झाला.

## देवाचा ध्यास लागला : १२५ :

पांच वाजले. स्वामी प्रेमानन्दावरोबर फिरण्यास निघाले. स्वामींचा आवडता कुत्रा त्यांच्याबरोबर चालला होता. धर्मराजावरोबर असाच एक कुत्रा शेवटपर्यंत वाटचाल करीत होता. स्वामी म्हणाले, "प्रेमानन्द, आपल्याला वैदिक महाविद्यालयाची स्थापना केली पाहिजे." याप्रमाणें बोलत बोलत दोन मैलांचा प्रवास झाला. जीवनाचा प्रवासी तिथें थांबला.

संध्याकाळ झाली. छाटी नेसलेल्या स्वामींच्या शरीरावर अंधार पडूं लागला. सूर्यनारायण जगाचा निरोप घेऊन अस्ताला चालला होता. स्वामींच्या मनांत जड जगताबद्दल अंधार निर्माण झाला होता. या वेळीं स्वामींना वाटलें असेल कीं,

पैल आले हरी । शंखचक्र शोभे करीं
गरुड येतो फडात्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरें
मुकुटकुंडलांच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ती
मेघश्यामवर्ण हरी । मूर्ति डोळस साजिरी
चतुर्भुज वैजयंती । गळा माळ हे रूळती
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा
स्वामी झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ

स्वामी मठांत आले. रात्रींच्या प्रार्थनेची घंटा वाजली. स्वामी आपल्या खोलींत गेले. त्यांनीं सिद्धासन घातलें. नेत्रकमलें मिटलीं. अंतश्चक्षू उघडले. त्या वेळीं स्वामींनीं पुढीलप्रमाणें जगन्मातेची प्रार्थना केली असेल——
अगा ये वैकुंठनायका । अगा ये त्रैलोक्यतारका । अगा जनार्दना जग-व्यापका । अगा पालका माझिया ॥ १ ॥ वसुदेवदेवकीनंदना । अगा ये गोपिकारमणा । विवेकानन्दाच्या जीवना । स्वरूपामाजीं सांठवीं ॥२॥ अगा ये द्रौपदीबांधवा । अगा ये सखया माधवा । रामकृष्णहृदयराजीवा । धाव आतां श्रीहरी ॥ ३ ॥ अगा महेश्वरा महाराजा । कालिमातेच्या उग्र तेजा । विराटरूपा सहस्त्रभुजा । स्वामी शकेना तुज वर्णूं ॥ ४ ॥

## महासमाधि : १२६ :

आठ वाजले. स्वामींनीं जपमाळ घेऊन ‘ चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ’ असा जप सुरू केला. साडेआठ वाजले. स्वामींनीं एका शिष्याला बोलावलें. जेवणाची वेळ झाल्यामुळें गुरुबंधू आणि शिष्य

सैंपाकघरांत पानांची व्यवस्था करीत होते. रामकृष्ण म्हणाले होते कीं, 'नरेन्द्र इच्छामरणी आहे'. रामकृष्णांचे पट्टशिष्य विवेकानन्द आज ब्रह्मानन्दांत निमग्न झाले होते. त्यांनीं जपमाळ खालीं ठेवली. रामकृष्णांच्या फोटोला वन्दन केलें. नंतर ते शिष्याला म्हणाले, "खोलीचीं दारें व खिडक्या उघड्या टाक आणि मला वारा घाल." स्वामी बिछान्यावर झोप घेत आहेत असें शिष्याला वाटलें. तो वारा घालीत होता. नऊ वाजले. स्वामींनीं वारा नको असें हाताच्या खुणेनें सांगितलें. नऊ वाजून आठ मिनिटें झालीं. स्वामींनीं एक दीर्घ श्वास सोडला. त्यांचे डोळे भ्रूमध्याकडे लागले होते. नऊ वाजून दहा मिनिटें झालीं. स्वामी विश्वजननीचें ध्यान करीत होते. त्यांनीं पुन्हा दीर्घ श्वास सोडला. ओठांजवळ, नासिकेच्या अग्राजवळ आणि डोळ्यांच्या कडांजवळ रक्त आल्यासारखा लाल रंग चढला. ब्रह्मरन्ध्राचा भेद करून स्वामींचा आत्मा अनन्तांत अन्तर्धान पावला. जगदंबेचें बालक तिच्या अंकावर शांतपणानें झोपीं गेलें. जिवाशिवाची भेट झाली. भगिनी निवेदिता लिहितात, "On the wings of that meditation, his spirit soared whence there could be no return, and the body was left, like a folded vesture, on the earth."

## अखेरची यात्रा : १२७ :

मठांतील शिष्यांवर वज्राघात झाला. ही समाधि असेल, कांहीं वेळानें उतरेल, असें त्यांना वाटलें. त्यांनीं 'ओम् ओम्' असा स्वामींच्या कानांजवळ जप केला. कलकत्त्याहून प्रसिद्ध डॉक्टरांना बोलावलें. त्यांनीं तपासणी केली. श्वासोच्छ्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण सर्व उपाय संपले. नंतर एक प्रसिद्ध सर्जन बाहेर आले. गुरुबंधू उत्सुकतेनें त्यांच्याकडे पहात होते. ते सर्जन कष्टी आवाजानें म्हणाले, "स्वामी विवेकानंद आपल्याला सोडून गेले".

या वेळीं सगळ्यांना जोराचा हुंदका आला. एक शिष्य म्हणाला, " पूर्वीं रामकृष्ण गेले. त्यांनीं आम्हांला स्वामी विवेकानंदांच्या स्वाधीन केलें. आज स्वामी आम्हांला न कळवतां निघून गेले. आम्ही पोरके झालों." या वेळीं रात्रीचे दोन वाजले. कलकत्त्यांतील तारायंत्राचें काम सुरू झालें. भारतांत, अमेरिकेंत आणि युरोपांत वाऱ्याच्या प्रवाहाबरोबर ही दुःखद वार्ता वहात गेली कीं, "स्वामी विवेकानन्द समाधिस्थ झाले".

ता. ५ जुलई १९०२ हा दिवस सुरू झाला. स्वामींचा देह बाहेर आणून ठेवला. आठ वाजले. या वेळीं भगिनी निवेदिता तेथें येऊन पोंचल्या. त्यांना बोलवेना. दुःखाच्या अतिरेकामुळें अश्रू येईनात. त्या स्वामींच्याजवळ बसल्या. त्यांनीं स्वामींच्या चरणांना स्पर्श केला. माया वेडी असते. त्यांना वाटलें कीं कदाचित् थोडा उबारा असेल; पण स्वामींचें कलेवर काल्याप्रमाणें गार पडत चाललें होतें. निवेदितांनीं आपल्या हातरुमालानें हलुवारपणानें स्वामींचें कपाळ पुसलें. नंतर त्या स्वामींना वारा घालूं लागल्या.

दुपार उलटून गेली. पांच वाजले. मठाचें आवार भरून गेलें. शिष्यांनीं आपल्या पूजनीय स्वामींना आंघोळ घातली. छाटी नेसवली. अंगाला भस्म लावलें. रामकृष्णांच्या अस्थींवर पाणी घातलें आणि तें तीर्थ स्वामींच्या तोंडांत घातलें. तुलसीपत्र वर ठेवलें. गुरुबंधूंनीं स्वामींच्या गळ्यांत हार घातले. भजनें म्हटलीं. आरती केली. भगिनी निवेदिता नीरांजन ओवाळीत उभ्या राहिल्या. एका शिष्यानें स्वामींच्या पायांना एक औषध लावलें आणि रेशमी रुमालावर पायांच्या तळव्यांचे ठसे घेतले. सुगंधी धूप जळत होता.

शवयात्रेची तयारी झाली. भगिनी निवेदितांनीं स्वामींच्या चरणांवर डोकें ठेवलें. शिष्यांनीं साष्टांग प्रणिपात केला. कांहीं टाहो फोडून रडूं लागले. भगिनी निवेदितांना सुद्धां अश्रु आवरेनात. देवळांतील घंटा

वाजूं लागल्या. शंखांच्या गंभीर नादानें त्यांना साथ दिली. वेदमंत्रांचा घोष चालला होता.

'स्वामी विवेकानंदमहाराज की जय' असा जयघोष करून शवयात्रा चालूं लागली. कांहींनीं एकतारीवर तुळशीदासांचीं भजनें म्हटलीं. एका शिष्यानें गुरुप्रेम सांगणारें भजन म्हटलें. त्याचा आशय मराठींत असा सांगतां येईल—

सद्‌गुरूचे चरणीं ठेविला मस्तक । देऊनी हस्तक ऊठवीलें
सद्‌गुरूनें मज आशीर्वाद दिला । हर्ष ओसंडला हृदयांत
हृदयींचा भाव कळला गुरूसी । आनंद उल्हासीं बोले मज
नमस्कार माझा सद्‌गुरूरायाला । शिष्य म्हणे बोला रामकृष्ण ॥ १ ॥

यात्रा पुढें निघाली. स्वामींच्या देहावर फुलांचा वर्षाव चालला होता. 'स्वामी विवेकानंदमहाराज की जय' असा जयघोष निनादत होता. दुसऱ्या एका भक्तानें एकतारी घेऊन पुढील अर्थाचें सूरदासाचें पद म्हटलें—

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते । कोण बोलवीतें हरीवीण
देखवी ऐकवी एक नारायण । तयाचें भजन चुकों नका
मानसाची देव चालवी अहंता । मीच एक कर्ता म्हणोनियां
वृक्षाचेंही पान हाले ज्याची सत्ता । राहिली अहंता मग कोठें
रामकृष्ण माझा भरला सबाही । तया उणें कांहीं चराचरीं ॥ २ ॥

वेलाचें झाड दिसूं लागलें. स्वामींनीं सुचवून ठेवलेली जागा त्याच्या-पलीकडेच होती. जवळच पुण्यपावन गंगामाई वहात होती. स्वामींचा देह खालीं ठेवला. स्वामींनीं सांगितलेली जागा मंत्र म्हणून शुद्ध केली. चंदनाची चिता रचली. स्वामींचा पार्थिव देह चितेवर ठेवला. सर्वांनीं पुन्हां नमस्कार केला. चितेला अग्नि लावला. कांहीं वेळानें ज्वाळा उंच जाऊं लागल्या. काळ्या, निळ्या आणि तांबड्या ज्योतींनीं पार्थिव देह

घेऊन टाकला. तो अस्थमा, तो मधुमेह, तो जलद श्वास हें सर्व जळून खाक झालें. देह पंचत्वांत मिळाला. अस्थि शिल्लक राहिल्या.

चितेजवळ विषण्ण मनानें वर जाणाऱ्या ज्वालांकडे पहात अनेक गुरुबंधू, शिष्य आणि भक्त उभे होते. अशा वेळीं भगिनी निवेदिता पुढें आल्या आणि त्यांनीं भारावलेल्या अंतःकरणानें भाषणास सुरुवात केली. त्यांच्या भाषणाचा आशय पुढीलप्रमाणें असावा असें वाटतें.

## भगिनी निवेदितांचें भाषण : १२८ :

भगिनी निवेदिता म्हणाल्या, " गुरुबंधूंनो आणि भगिनींनो, जगांतील चार खंड ज्यांना स्वामी विवेकानंद म्हणून ओळखत होते त्यांच्या पार्थिव शरीराच्या अस्थि आपल्यासमोर शिल्लक रहातील. या नदीच्या कांठीं एकान्तांत तेवत असणारी ज्ञानाची ज्योत विझून गेली. राष्ट्राराष्ट्रांतून घुमणारा वेदान्तकेसरीचा आवाज मृत्यूच्या भयारांत शांत झाला. भयकारी शारीरिक आणि मानसिक कष्टांमुळें स्वामींचा वज्रदेह खिळखिळा झाला. त्या देहांतील जगद्विजयी आत्म्यानें महासमाधि घेतली. स्वामी योगी होते. त्यांनीं स्वेच्छेनें देहाचा त्याग केला.

आपले बांधव बलवान् आणि तेजस्वी व्हावे अशी त्यांची इच्छा होती. याकरितां त्यांनीं रात्रंदिवस भगीरथप्रयत्न केले. शिक्षक, पिता आणि गुरु अशा त्रिविध भूमिका आळीपाळीनें सजविल्या. काल मृत्यूपूर्वी त्यांनीं तीन तास वेदान्ताचा वर्ग घेतला. जड जीवनांतील विजय आणि पुढारीपण यांची त्यांना पर्वा नव्हती. अमेरिकेंतील सत्ताधीश आणि कोट्यधीश त्यांचे मित्र होते. त्या लक्षाधीशांच्या सहवासांत उदासीन असणारे स्वामी आपल्या भिक्षेच्या झोळीवर संतुष्ट असत.

सर्वधर्मपरिषदेंत स्वामींनीं हिंदु धर्माचें रहस्य सांगितलें. उपनिषदांचा आधार घेऊन पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांचा समन्वय केला

त्यांनीं नवीन कांहींच सांगितलें नाहीं. कोणत्याही पंथाचा पुरस्कार केला नाहीं. त्यांनीं रामकृष्ण मिशन स्थापन केलें. दरिद्रीनारायणाची सेवा केली. प्रत्येक मानवांतलि दिव्यत्वाचा उलगडा केला. हिंदु धर्मांतील साक्षात्काराचें महत्त्व सांगितलें. धार्मिक संघटनेवर राष्ट्राची उभारणी करण्याचा महामंत्र बांधवांना दिला. सैतानांतलि संत आणि ज्वाला-मुखींतील भगवंत लोकांना दाखवून दिला. आध्यात्मिकतेच्या विमल वैभवावर, वैभवशाली पाश्चात्यांच्या हृदयावर राज्य केलें. इष्टदेवतेच्या उपासनेचें महत्त्व समजावून दिलें.

स्वामी म्हणत असत कीं ख्रिस्ती लोकांनीं बुद्धाचे अनुयायी होण्याची जरूरी नाहीं. बौद्धधर्मीयानें ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची आवश्यकता नाहीं. प्रत्येकानें दुसऱ्याच्या धर्मांतलि उदात्त भावना आत्मसात् करावी. आपल्या धर्माचें वैशिष्ट्य कायम ठेवावें. परधर्मीयांना त्रास न देणें ही नकारात्मक सहिष्णुता आहे. त्याच्या पलीकडे जाऊन विवेकानन्द म्हणत कीं स्वधर्मनिष्ठा कायम ठेवून इतर धर्मांबद्दल पूज्यबुद्धि ठेवली पाहिजे.

स्वामींनीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारताचा प्रवास केला. बहुजनसमाजाच्या सर्व थरांत मिसळून सुखदु:खांचा अनुभव घेतला. बौद्ध, जैन, रामानंद, कबीर, तुलसीदास, ज्ञानेश्वर, तुकाराम, अलवार व नयनार, मीराबाई आणि गुरु नानक ह्यांच्या विचारांचें स्वामींनीं मनन आणि चिंतन केलें होतें. उपनिषदें आणि ब्रह्मसूत्रें यांच्या सखोल अभ्यासानें स्वामी विवेकानन्द हे भारताच्या अविनाश वैभवाचे वारसदार झाले. इस्लामी, ख्रिस्ती आणि वैदिक अशा तिन्ही संस्कृतींचा संगम स्वामींच्या विचारांत झाला होता.

स्वामी देहरूपानें आपल्यामधून गेले तरी ग्रंथरूपानें जिवंत रहातील त्यांच्या ग्रंथांमध्यें वीररस रसरसलेला आहे. ते सांगत असत कीं, "उठा, जागे व्हा आणि ध्येय गांठीपर्यंत थांबू नका." हें ध्येय गांठण्याकरतां

मृत्यूनंतरही स्वामींची आपल्याला मदत होईल. एका ओजस्वी भाषणांत ते म्हणाले कीं, "It may be that I shall find it good to get outside my body to cast it off like a worn out garment. But I shall not cease to work. I shall inspire men every where, until the world shall know that it is one with God."

स्वामी विवेकानन्द हा चालताबोलता ज्ञानकोश होता. त्यांनीं लेखणीप्रमाणेंच आपली वाणी राष्ट्राकरतां झिजविली. स्वामींच्या अलौकिक वक्तृत्वाला उपमान सांपडणें कठीण आहे. त्यांच्या भाषणांतील शब्द ज्वालामुखींतून बाहेर पडणाऱ्या तप्त शिलेप्रमाणें भासत. एक लेखक म्हणतो,

"He had a genius for arresting words, and burning phrases hammered out white hot in the forge of his soul so that they transpired thousands. It may justly be said that India's destiny was changed by him, and that his teaching reached throughout humanity."

चारी खंडांत स्वामींचें नांव गाजलें तरी त्यांना गर्वाचा स्पर्श झाला नाहीं. त्यांनीं चढाऊ आणि लढाऊ हिंदु धर्म जगाला सांगितला. जयिष्णु आणि वर्धिष्णु अशी धर्मभावना आपल्या बांधवांमध्यें निर्माण केली आणि वेदान्ताच्या भूमिकेवरून मानवधर्माचें महत्त्व प्रस्थापित केलें. ते नेहमीं सांगत कीं, मीं रामकृष्णांच्या पायांशीं बसून अध्यात्माचे पाठ घेतले. रामकृष्णांनीं विवेकानन्दांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवला. विवेकानन्दांनीं गुरुजींचा सर्वसंग्राहक धर्मसंदेश जगांत सांगितला. स्थलकालाच्या आणि नामरूपाच्या पलीकडे असलेल्या परब्रह्माच्या चिंतनांत स्वामी निमग्न असत. नांव आणि कीर्ति यांबद्दल ते उदासीन होते. वादविवाद करतांना त्यांच्या मुखमंडलावर विलोभनीय शांतता दिसे; पण प्रतिपक्षाशीं झुंज घेतांना त्यांच्या डोळ्यांत विद्युल्लतेचें तेज चमकूं लागे. प्रतिभा, पौरुष

आणि पराक्रम या तीन प्रकारांनीं धगधगणारी मूर्ति म्हणजे स्वामी विवेकानन्द ! गंधर्वलोकांतील स्वरसौन्दर्य त्यांच्या आवाजांत सांठवलें होतें. त्या गंभीर आवाजाला शास्त्रीय गायनाची आणि वैदिक तपश्चर्येची जोड मिळाली होती. व्यासपीठावर दिसणारा तो निर्भय पवित्रा, तो त्यागदर्शक केशरी पोशाक, ते विकसित नीलकमलासारखे डोळे, तें साधेपणांतील राजेश्वराचें ऐश्वर्य, तें भविष्यकाळास कवटाळणारें चैतन्य, तें राष्ट्रीयत्वांत दिसणारें आंतरराष्ट्रीयत्व, ती सुभाषितांची अवतरणसमीक्षता, ती परममंगल राष्ट्रभक्ति, ती निर्लोभ, निर्वैर आणि निरहंकार अशी वृत्ति, ती परमपावन गुरुनिष्ठा— हीं सर्व गुणरत्नें आतां काळसागरांत अंतर्धान पावलीं आहेत.

स्वामी विवेकानन्दांचा विजय असो.

जगद्गुरु श्रीरामकृष्णांचा विजय असो. ”

दा. क्र.

REFBK-0007929

# संदर्भ ग्रंथ

(१) Life of Vivekananda by Eastern & Western Disciples.
(२) Life of Vivekananda by Romain Rolland.
(३) विवेकानन्द चरित्र भाग १ ते १०—रा. ना. मंडलीक.
(४) स्वामी विवेकानन्द यांचे समग्र ग्रंथ भाग १ ते १२—प्रकाशक कुलकर्णी, कर्नाटक प्रेस.
(५) विवेकानन्द आणि इतर गोष्टी—विनायकराव पेण्डसे.
(६) शिवलीलामृत—श्रीधर.
(७) नवनीतरामायण—महादेवशास्त्री जोशी.
(८) आशियाचे धर्मदीप—गोपीनाथ तळवलकर.
(९) काळांतील निबंध—शि. म. परांजपे.
(१०) नवयुगधर्म—फडके.
(११) ज्ञानेश्वरी अंतरंग—डॉ. रा. द. रानडे ( अनुवादक प्रो. गजेन्द्रगडकर कृ. वें.)
(१२) माझी नृत्यसाधना—रोहिणी भाटे.
(१३) माझा संगीतव्यासंग—गोविंदराव टेंबे.
(१४) हिमालयाचा प्रवास—कालेलकर.
(१५) अभंगांचा गाथा—श्रीतुकाराम.
(१६) आम्ही—माधवराव गोळवलकर; सरसंघचालक, रा. स्व. संघ
(१७) पवहारीबाबा—श्रीविवेकानन्द.
(१८) तुकारामचरित्र—ल. रा. पांगारकर.
(१९) सावरकरविशेषांक—सह्याद्रि १९४३.
(२०) काश्मीरविशेषांक—चित्रमयजगत्, १९५२.
(२१) शिकारकथा—प्रसाद, १९५२.
(२२) वर्णनशैलीचे नमुने, साप आणि खार—मोडक.
(२३) धन्य तें व्यासपीठ—ल. पां. फाटक.
(२४) गानमोहिता—गिरीश.
(२५) Teachings of SRI Ramakrishna—Advaita Ashrama.

# आमचें प्रकाशन

| | | | |
|---|---|---|---|
| क्रांति | (कादंबरी) | साने गुरुजी | ३–८–० |
| क्रांति (संक्षिप्त) | ,, | ,, | १–८–० |
| तीन मुलें | ,, | ,, | २–८–० |
| तीन मुलें (संक्षिप्त) | ,, | ,, | १–४–० |
| स्त्री-जीवन–भाग १ व २ | | ,, | ३–८–० |
| राष्ट्रधर्म | | ,, | २–८–० |
| समाजधर्म | | ,, | १–०–० |
| मुलांसाठीं फुलें | | ,, | ०–६–० |
| सुंदर कथा | | ,, | ०–६–० |
| इसापच्या सहवासांत | (कथा) | त्र्यं. ग. बापट | ०–८–० |
| श्रीमहागणपति | | ,, | ०–६–० |
| साने गुरुजी | (चरित्र) | ,, | ०-१०-० |
| श्रीरामकृष्ण परमहंस | ,, | ,, | १–८–० |
| निबंध-संपदा | | ,, | १–०–० |
| स्वामी विवेकानंद | (चरित्र) | ,, | १–८–० |
| पुतळा आणि पारवा | (कथासंग्रह) | ,, | १–४–० |
| गोष्टीरूप बिरबल | ,, | ,, | आगामी |
| मृगाजिन | (साने गुरुजींच्या आठवणी) | ब. ग. कुलकर्णी | १–८–० |
| बोलघेवड्या | (नाटिका) | ना. धों. ताम्हनकर | ०-१२-० |
| माईची माया | ,, | ,, | १–०–० |
| पहिली पायरी | (नाटक) | ,, | १–०–० |
| वत्सराज | (कादंबरी) | वि. कृ. श्रोत्रिय | ०-१०-० |

**प्रकाशक—दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर**

**५२९ सदाशिव पेठ, पुणें २**

[illegible]
[illegible] ....................
[illegible] ১৫৭৬ .................... [illegible]